# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | १९९८ |
| वर्ष | : | तिसरे |
| अंक | : | ६ |
| पृष्ठे | : | ४० पृष्ठे |


**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या "ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : २६**

विद्या प्रसारक मंडळाचे
मासिक

# दिशा



वर्ष तिसरे / अंक ६ / डिसेंबर १९९८

## संपादकीय

### इंटरनेट क्रांती

इंटरनेटने या शतकातील सर्वांत मोठी वैज्ञानिक क्रांती केली आहे. एखाद्या संसर्गजन्य रोगासारखा त्याचा प्रसार अवघ्या गेल्या ७/८ वर्षांत जगभर झाला आहे. अर्थातच इंटरनेटचा सर्वाधिक वापर हा अमेरिकेमध्येच आहे. अमेरिकेमध्ये ५० टक्केपेक्षा अधिक लोकसंख्या, त्यांच्या घरामधून अथवा कार्यालयातून इंटरनेटचा वापर करू शकते. अमेरिकेतील उच्च शिक्षण देणारी विद्यापीठेच नाही, तर अगदी बालवाड्यांपर्यंत इंटरनेटचा वापर सुरु झाला आहे. इंटरनेटचे अस्तित्व हे संगणक आणि दूरध्वनीवर अवलंबून आहे.

दूरध्वनीचा शोध लागल्यापासून त्याचा जगामध्ये प्रसार व्हायला बराच वेळ लागला. त्यामानाने संगणकाचा प्रसार हा बराच झपाट्याने झाला. इंटरनेट म्हणजे जगातील अनेक संगणकांचे एकमेकांच्या संपर्कातून निर्माण होणारे मोठ्ठे जाळे। धर्म, वंश, भाषा या सगळ्यांना छेद देऊन इंटरनेटचा वापर होऊ शकतो. इंग्रजी भाषा हे त्याचे प्रमुख माध्यम असले तरी फ्रेंच, जर्मन, स्पॅनिश, जपानी आणि चिनी या सर्व भाषांतून इंटरनेटचे माध्यम आज उपलब्ध आहे. या महाजालातून माहितीचा स्रोत अखंडपणे वाहत असतो. स्थळ आणि काळ यांचा येथे संकोच झाला आहे. दूरध्वनी, आकाशवाणी किंवा चित्रवाणी यांच्या प्रसारावर विविध राष्ट्रांनी नियंत्रणे आणली होती. इंटरनेटवर कोठलेही राष्ट्र, राजकीय गट किंवा प्रवृत्ती नियंत्रण ठेवू शकत नाही. खऱ्या अर्थाने हे एक अनियंत्रित माध्यम आहे. आणि म्हणूनच यात जेवढे फायदे आहेत तेवढेच तोटेही आहेत. माहिती मिळविणे ही बाब वाटते तेवढी सोपी नाही कारण कितीही वस्तुनिष्ठता आणि तटस्थता स्वीकारली तरी प्रत्येक संस्था जी माहिती देते ती कमी अधिक प्रमाणात पूर्वग्रह, विचारप्रवाह, तत्वज्ञान इत्यादींवर अवलंबून असतेच. आजची वृत्तपत्रे, आकाशवाणी, दूरदर्शन या माध्यमांकडे पाहता ही गोष्ट अधिक स्पष्ट होते. थोडक्यात, माहिती ही शेवटी नियंत्रितच असते. माहिती देण्याची पद्धत बदलली तरी, तिचा उगम मनुष्यच असतो. तंत्रज्ञानातील विकासामुळे या माध्यमांच्या पद्धती किंवा गतीमध्ये फरक होऊ शकेल, पण त्याच्या चांगल्या/वाईट वापरांचे नियंत्रण हे शेवटी माणसाच्याच हातात राहणार आहे. अनियंत्रित किंवा अनिर्बंध स्वातंत्र्य अनेक वेळा स्वैराचाराचे रूप घेते. एकाचे अभिव्यक्तिस्वातंत्र्य, दुसऱ्याच्या स्वातंत्र्याचा संकोच करू शकते. विवेक आणि संयम ही व्यक्तिगत मूल्ये आहेत. कायद्याने किंवा सरकारी फतव्याने ती निर्माण होऊ शकत नाहीत. अनेक शतकांच्या संस्कृतीच्या मशागतीतून ती निर्माण होतात. ज्या समाजामध्ये अशा संयमी आणि विवेकी माणसांची संख्या जास्त असते तेथे कुठल्याही कायद्याशिवाय 'स्वातंत्र्य' अस्तित्वात असते. कारण या समाजामध्ये संयम आणि विवेक ही मूल्येच मुळी नियंत्रणाचे काम करतात. त्यांचा स्वीकार कोठल्याही बाह्य

(मुखपृष्ठ २ वर)

प्रभावापेक्षा स्वेच्छेने केलेला असतो. स्वातंत्र्य देत असलेल्या अधिकाराबरोबरच स्वातंत्र्याने सोपविलेल्या जबाबदाऱ्यांचीही तेथे जाणीव असते. हात आणि पाय कसेही हलविण्याचे आपल्याला स्वातंत्र्य असते. पण त्यांची नियंत्रित हालचालच आपल्याला गती किंवा निर्मिती देऊ शकते. इंटरनेट हे 'अनियंत्रित स्वातंत्र्य' असल्यामुळे त्याच्या सृजनशील उपयोगाकरिता अनेक स्वेच्छानियंत्रणांची गरज आहे. या माध्यमाचा वापर आज अनेक आततायी आणि दहशतवादी संघटना मुक्तपणे करीत आहेत. लैंगिक आणि अश्लील साहित्यही त्यावर खूप उपलब्ध आहे. अर्थातच यावर नियंत्रण घालण्यापेक्षा त्याकडे दुर्लक्ष करणेच हितावह ठरेल. इंटरनेटचा आणखी एक महत्त्वाचा वापर म्हणजे त्या माध्यमातून होणारा पत्रव्यवहार.

इंटरनेटची खरी सुरुवात अमेरिकेमध्ये १९६९ साली झाली. अर्थातच तो वापर फार थोड्या विद्यापीठांपुरता मर्यादित होता. खऱ्या अर्थाने आजच्या रूपातील इंटरनेट हे अमेरिकेमध्येही १९९० च्या सुमारास चालू झाले. भारतामध्ये इंटरनेटच्या सार्वत्रिक वापराला सुरुवात १५ ऑगस्ट १९९५ ला झाली. गेल्या तीन वर्षात भारताने यासंबंधात केलेली प्रगती नक्कीच उत्साहदायक आहे. अर्थातच याचा वापर व्यापारी क्षेत्रामध्ये अधिक आहे, शिक्षणक्षेत्रामध्ये सर्वात कमी आहे. भारत सरकारने गेल्या वर्षी इन्फरमेशन टेक्नॉलॉजी (IT) च्या संदर्भात महत्त्वाकांक्षी योजना जाहीर केल्या. नेहमीप्रमाणेच नोकरशहांनी त्यांची प्रगती रोखून धरली असून आज यातील अनेक योजना या फक्त कागदावरच आहेत. संगणक, दूरध्वनी आणि इंटरनेटच्या भाड्यामध्ये भरघोस कपात केल्याशिवाय, शाळा, महाविद्यालये आणि ग्रंथालयांतून त्याचा वापर होणे कठीण आहे.

या बाबतीत अमेरिकेचे उदाहरण घेण्यासारखे आहे. अमेरिकेमध्ये मूलतः दूरध्वनीचे दर कमी आहेत. शाळांमध्ये इंटरनेट सेवा उपलब्ध करून देण्याकरता १९९६ मध्ये अमेरिकन सरकारने आपल्या या संबंधातील कायद्यात बदल करून शाळांकरिता अत्यंत कमी दरात दूरध्वनी व इंटरनेट सेवा उपलब्ध करून दिल्या. (E-rate program) सन २००० पर्यंत अमेरिकेमधील सर्व शाळांमधूनच नाही तर शाळेतील सर्व वर्गांमधूनही इंटरनेट सेवा उपलब्ध करण्याचे लक्ष्य अमेरिकन सरकारने ठेवले आहे. या धोरणाचा योग्य तो परिणाम होऊन १९९४ मध्ये ३५% शाळांमध्ये ही सेवा उपलब्ध होती ती वाढून १९९८ मध्ये ८९% शाळांमध्ये आता ही सेवा उपलब्ध आहे. अमेरिकेमध्ये सुमारे ६ ते ७ मुलांमागे एक संगणक शाळांमध्ये आहे तर सुमारे १० ते १२ विद्यार्थ्यांमागे एक इंटरनेट जोडणी उपलब्ध आहे. अमेरिकेमध्ये हा बदल पैशापेक्षा सरकारी धोरण व सामाजिक जागृतीमुळे झाला आहे. भारतामध्ये शिक्षण अजून सरकारी इच्छा आणि अनुदानावर अवलंबून आहे. घोषणा काहीही असल्या तरी नोकरशाही व राजकारणी यांना छुपे नियंत्रण हवे आहे. या नियंत्रणामुळे भरपूर पैसा भ्रष्टाचाराने मिळवता येतो. जोपर्यंत या बकवास यंत्रणेत बदल होत नाही तोपर्यंत विज्ञानातील या प्रगतीचा लाभ नव्या पिढीपर्यंत सहजपणे पोचू शकत नाही. अमेरिकेची लोकसंख्या भारताच्या १/४ आहे. अमेरिकेत सुमारे ९००० सुसज्ज सार्वजनिक ग्रंथालये असून त्यामधील ७५% ग्रंथालयांना इंटरनेट सेवा उपलब्ध आहे. ६०% हून अधिक ग्रंथालये आपल्या वाचकांना ही सेवा आज उपलब्ध करून देत आहेत. ज्या देशामध्ये माहिती मिळवण्याचे स्वातंत्र्य असते आणि ती सहज उपलब्ध होण्याची साधने आणि माध्यमे उपलब्ध असतात तो देशच प्रबल होऊ शकतो.

विद्याप्रसारक मंडळाने ठाण्यामध्ये याबाबतीत आघाडी मिळविली आहे. ठाण्यातीलच नाही तर मुंबईतील ही फक्त विद्यार्थी आणि शिक्षकांसाठी असणारे पहिले सायबर कॅफे आपल्या महाविद्यालयात चालू झाले. मंडळाच्या पाच ग्रंथालयांची पुस्तकसंख्या सुमारे १लाख असून लवकरच या सर्व ग्रंथालयांचे संगणकीकरण करून ती इंटरनेटवर उपलब्ध होतील. महाविद्यालय परिसरामध्ये फायबर ऑप्टिक बॅकबोन निर्माण करून लवकरच इंट्रानेट सुविधाही उपलब्ध होणार आहे. विद्याप्रसारक मंडळाची स्वतःची वेबसाइट असून, अनेक विषयांतील महत्त्वाची माहिती तेथे पुरविली जाते. आज मुंबईतही फक्त हाताच्या बोटावर मोजता येणाऱ्या शैक्षणिक संस्थांच्या वेबसाईटस्

(पान क्र. १५ वर)



विद्या प्रसारक मंडळाचे
मासिक

# दिशा

वर्ष तिसरे / अंक ६ / डिसेंबर १९९८

संपादक
डॉ. विजय वा. बेडेकर

सहसंपादक
श्री. प्रकाश ल. वैद्य

कार्यालय
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्यामंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२.

वार्षिक देणगी
रू. २००/-

मुद्रक:
परफेक्ट प्रिण्ट्स,
२२, ज्योती इंडस्ट्रियल इस्टेट,
नूरीबाबा दर्गा रोड,
ठाणे - ४०० ६०१.

## अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| १) संपादकीय | डॉ. विजय वा. बेडेकर | मुखपृष्ठ |
| २) सुभाषित | प्रा. (डॉ) मोरेश्वर दि. पराडकर | ३ |
| ३) संस्कृत काव्यातील शब्दचमत्कृती | डॉ. र. पु. कुलकर्णी | ५ |
| ४) प्राचीन भारतीय वाङ्मयीन लोकशाही | डॉ. वामन केशव लेले | ९ |
| ५) वैदिक आणि इन्डोइराणी संस्कृतीचे भूसांस्कृतिक अनुबंध | डॉ. प्र. वि. पाठक | १६ |
| ६) धर्मप्रसाराचे काही नमुने | प्रो. डॉ. वसंत हरी बेडेकर | २४ |
| ७) हनुमान देवत्व विकास | डॉ. सौ. मिनाक्षी पंडित | २८ |
| ८) आवटी अभ्यास : एक दुर्लक्षित नाणकशास्त्रीय पैलू | प्रा. पद्माकर प्र. प्रभुणे | ३४ |
| ९) दिवस उत्साहाचे आणि उत्सवांचे! कार्यक्रमांचे आणि व्याख्यानांचे!! | प्रा. मोहन पाठक | ३८ |

१. ***डॉ. विजय वा. बेडेकर***
वैद्यक व्यावसायिक, अनेक शैक्षणिक, सांस्कृतिक आणि सामाजिक संस्था आणि चळवळींशी निगडित, अध्यक्ष - प्राच्यविद्या अभ्यास संस्था, सत्य शोध संस्था, अनेक परिसंवादांचे संयोजन, संशोधनपर लिखाण, 'शोध अंधश्रद्धेचा' या पुस्तकाचे लेखक.

२. ***प्रा. (डॉ.) मोरेश्वर दि. पराडकर***
संस्कृत आणि हिंदी भाषेचे पंडित, अनेक वर्षे संस्कृतचे अध्यापन, आणि प्राचार्य म्हणून पेंढारकर कॉलेज, डोंबिवली मधून निवृत्त, बंबई हिंदी विद्यापीठाचे मानद कुलपती, संस्कृत, इंग्रजी, हिंदी आणि मराठी मधून विपुल संशोधनपर लिखाण. 'स्तवक' या पुस्तकाचे लेखक.

३. ***श्री. रघुनाथ पु. कुलकर्णी***
अभियंता म्हणून शासकीय सेवेतून निवृत्त, प्राचीन भारतीय शिल्पशास्त्राचा विशेष अभ्यास व संशोधन, अभियांत्रिकी संशोधन पत्रिकांतून अनेक संशोधनपर लेख प्रसिद्ध, 'काश्यपसंहिता' या शिल्पशास्त्रावरील संस्कृत ग्रंथाचे मराठीत भाषांतर. प्राचीन वास्तुशास्त्रावर हिंदी, मराठी व इंग्रजीत ग्रंथरचना.

४. ***डॉ वामन केशव लेले***
मराठीचे प्राध्यापक व विभागप्रमुख या पदांवरून काशी हिन्दु विश्वविद्यालय, (वाराणसी) मधून जून १९९३ मध्ये सेवानिवृत्त, ५० हून अधिक शोधनिबंध व सुमारे ७५ लेख, १४ अभ्यासपूर्ण व ७ इतर पुस्तके प्रसिद्ध, भारत सरकारचा राष्ट्रीय पुरस्कार, महाराष्ट्र शासनाचा राज्य पुरस्कार व इतर अनेक पुरस्कारांचे मानकरी .

५. ***डॉ. प्रमोद वि. पाठक***
आय. आय. टी., मुंबई येथून एम. टेक. (केमिकल) पदवी प्राप्त. ते व्यावसायिक रसायनतज्ज्ञ आहेत. भारतीय संस्कृती व सिंधुसंस्कृती या दोन्ही क्षेत्रांत त्यांनी मूलभूत संशोधन केले आहे. ऋग्वेदातील सर्वांत मुख्य असणाऱ्या वृत्रवधकथेच्या मिथ्यकथेवर त्यांनी आधुनिक भूवैज्ञानिक संकल्पनेच्या आधारे प्रकाश टाकला आहे. या विषयावरील प्रबंधासाठी मुंबई विश्वविद्यालयाने त्यांना पीएच. डी. ची पदवी दिली. ऋग्वेद, अथर्ववेद आणि सिंधुसंस्कृती यांचा परस्पर संबंध दाखविणाऱ्या त्यांच्या संशोधनाला राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळाली आहे.

६. ***प्रा. (डॉ.) वसंत हरी बेडेकर***
संग्रहालयशास्त्र या विभागाचे प्रमुख म्हणून बडोद्याच्या एम.एस. विद्यापीठातून निवृत्त, अनेक भारतीय आणि जागतिक संग्रहालयशास्त्राच्या संस्थांचे सभासद, विपुल संशोधनपर लिखाण प्रकाशित, संग्रहालयशास्त्राच्या अनेक पुस्तकांचे लेखक, नुकतेच न्यू म्युझिऑलॉजी फॉर इंडिया हे पुस्तक प्रकाशित.

७. ***डॉ. सौ. मिनाक्षी पंडित***
संस्कृत आणि प्राचीन भारतीय संस्कृतीच्या अभ्यासिका.

८. ***प्रा. पद्माकर प्र. प्रभुणे***
नाणकतज्ञ या विषयावर अनेक शोध निबंध प्रकाशित.

९. ***प्रा. मोहन पाठक***
गेली २०-२२ वर्षे वि. प्र. मंडळाच्या बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या ग्रंथालयात सेवा, मराठी व ग्रंथपालन शास्त्राचे गेली १६ वर्षे अध्यापन. मुंबईच्या साहित्य संघातून 'साहित्य विशारद' ही पदवी प्राप्त. १९७५ पासून सातत्याने अनेक नियतकालिकांतून विविध विषयांवर विपुल लेखन. ठाण्यातील साहित्यिक, सामाजिक, सांस्कृतिक संस्थांशी घनिष्ठ संबंध.

## सुभाषित

साम्नैव यत्र सिद्धिर्न तत्र दण्डो बुधेन विनियोज्यः
पित्तं यदि शर्करया शाम्यति कोऽर्थः पटोलेन ॥१॥

न गणस्याग्रतो गच्छेत् सिद्धे कार्ये समं फलम् ।
यदि कार्यविपत्तिःस्यान्मुखरस्तत्र हन्यते ॥२॥

नापृष्टः कस्यचिद् ब्रूयात् न चान्यायेन पृच्छतः ।
जानन्नपि हि मेधावी जडवल्लोके आचरेत् ॥३॥

रथस्यैकं चक्रं भुजगयमिताः सप्त तुरगाः
निरालम्बो मार्गश्चरणविकलः सारथिरपि ।
रविर्यात्येवान्तः प्रतिदिनमपारस्य नभसः
क्रियासिद्धिः सत्त्वे भवति महतां नोपकरणे ॥४॥

कदर्थितस्यापि हि धैर्यवृत्ते-
र्न शक्यते धैर्यगुणः प्रमार्ष्टुम् ।
अधोमुखस्यापि कृतस्य वह्ने -
र्नाधः शिखा यान्ति कदाचिदेव ॥५॥

पादाहतं यदुत्थाय मूर्धानमधिरोहति
स्वस्थादेवापमाने ऽपि देहिनस्तद्वरं रजः ॥६॥

तुङ्गत्वमितरा नाद्रौ नेदं सिन्धावगाधता ।
अलङ्घनीयता हेतुरुभयं तन्मनस्विनि ॥७॥

**डॉ. मो.दि. पराडकर**

संस्कृत सुभाषितात व्यवहारातील चातुर्याचा अन्तर्भाव सहजपणे केलेला दिसतो. पहिल्याच श्लोकात सुभाषितकार म्हणतो ते व्यवहारात आणण्यासारखे आहे. साम, दाम, दण्ड आणि भेद हे चार उपाय राजांनी किंवा राष्ट्रांनी परस्पर व्यवहारात वापरावे हे जसे खरे तसे प्रत्येक शहाण्या माणसाने दैनंदिन मानवी व्यवहारातही यांचा वापर करणे योग्य. सामन याचा अर्थ समजुतीने, गोडीगुलाबीने वागणे किंवा बोलणे यामुळे ज्या बाबतीत काम होत असेल तर मग शहाण्या व्यक्तीने तिथे काठीचा वापर करू नये, म्हणजे कठोरपणे वागू नये किंवा वाईट बोलू नये. साध्या भाषेत संबंधित व्यक्तीला शिक्षा किंवा शासन करण्याचा विचार करू नये. समजुतीने वागणे म्हणजे चांगल्या शब्दात आपली गोष्ट पटवून देणे. याला उदाहरण सहज समजणारे दिले साखरेने (शर्करया) जर पित्त शमत असेल तर मुद्दाम पडवळ म्हणजे तुरट वस्तू खाण्याचे प्रयोजन उरत नाही. पित्तावर पडवळ किंवा तुरट वस्तू खाण्याने उतारा पडतो हे खरे परंतु थोडी साखर खाल्ल्यामुळे जर ते कमी होत असले किंवा आटोक्यात आले तर उगीच पडवळ कशाला खायचे? व्यवहारात पुष्कळ वेळा समजूत पटवण्याने कार्य होते आणि दण्डाचा किंवा काठीचा वापर करावा लागत नाही. याचा अनुभव नेत्याला अनुयायांच्या बाबतीत, शिक्षकाला विद्यार्थ्यांच्या बाबतीत आणि घरातल्या वडील माणसांना नवीन पिढीच्या बाबतीतही येऊ शकतो आणि येतो. अधिकार हातात असल्यानंतर दण्ड देण्याचा मोह होतो, पण तो टाळणे चांगले यात शंका नाही.

दुसरा श्लोक तर आज प्रत्येक पुढाऱ्याने लक्षात ठेवण्यासारखा आहे. गण म्हणजे समूह, समुदाय किंवा गट. याचा पुढाकार घेण्यापूर्वी विचार करावा कारण असे नेतृत्व करण्यामुळे एखादी गोष्ट साध्य झाली किंवा एखादी मागणी मान्य झाली तर त्याचे श्रेय साधारणपणे समूहातल्या सर्व व्यक्तींत विभागले जाते; समूहातले सर्व मिळून गेल्यामुळेच कार्यसिद्धी झाली असे समजतात. परंतु समजा जमले नाही आणि अपयश आले (कार्यविपत्ती) तर 'मुखरः' म्हणजे बोलणारी व्यक्ती किंवा नेता जबाबदार ठरतो आणि अपयशाचे खापर त्याच्या डोक्यावर फोडले जाते. यशाचे श्रेय घ्यायला सर्व लोक तयार असतात; अपयश मात्र म्होरक्याच्या पदरी येते. म्हणून 'समूह-नेता कधी न व्हावे' हा सल्ला सुभाषितकाराने दिला. यश मिळाले तर सर्वांचे आणि अपयश आले तर ते मात्र पुढाकार घेणाऱ्या व्यक्तीमुळे असे समजण्याची जनरीत असते याकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न या सुभाषितात केलेला आहे. अर्थात् यश माझ्यामुळेच मिळाले असे पटवण्याचे कौशल्य एखाद्या नेत्याजवळ असू शकते हे मान्य करायला पाहिजे.

तिसरा श्लोक तर व्यवहारात प्रत्येकाने वापरावा असे म्हटले पाहिजे. अपृष्टः म्हणजे जर व्यक्तीला काही विचारले नसेल तर त्याने बोलू नये किंवा उपदेश करू नये; अनाहूत सल्ला देण्याचा प्रयत्न करू नये आणि एखाद्याने धूर्तपणे अन्यायाने विचारले असे वाटले तरीही उत्तर देऊ नये; कारण अशा बाबतीत सल्ला घेण्यापेक्षा मुद्दाम एखादी गोष्ट वदवून घेण्याचा आणि मग बोललेल्याचा फायदा घेण्याचा विचार

असतो. म्हणून मेधावी म्हणजे बुद्धिमान् माणसाने सर्व माहीत असले तरी, कळत असले तरी आपल्याला काही माहीत नाही आपण अगदी 'जड' म्हणजे बुद्धिहीन आहोत असे दाखवावे, कारण विचारल्याशिवाय बोलणे किंवा सल्ला देणे हास्यास्पद होते आणि धूर्तपणाने विचारणाऱ्या व्यक्तीला उत्तर दिल्यामुळे एखाद्या चांगल्या गोष्टीला खीळ बसते आणि नुकसानही होऊ शकते. सल्ला उगीच वाटत फिरणेही वाईट आणि कुणी कसा सल्ला विचारला आहे हे लक्षात न घेता तो देणेही अयोग्य किंवा नुकसानकारक म्हणून सगळे माहीत असले तरी मौन राहणे जास्त चांगले. ज्ञान असले तरी उगीच त्याचे प्रदर्शन करण्यापेक्षा न बोलण्यामुळे 'झाकली मूठ सव्वा लाखाची' ठरते. मग लोकांनी मंदबुद्धी म्हटले तरी हरकत नाही.

हा श्लोक संस्कृत सुभाषित-वाङ्मयात फार प्रसिद्ध आहे. यातल्या चौथ्या ओळीत 'महतां' म्हणजे मोठ्या लोकांच्या कार्याचे साफल्य त्यांच्या उपकरणांवर म्हणजे साधनांवर नसते, ते त्यांच्या त्यांच्या अंगभूत सामर्थ्यावर किंवा शौर्यावर अवलंबून असते हे अनुभवाला येणारे सत्य पहिल्या तीन ओळींत सूर्याचे उदाहरण घेऊन सांगितले. विचार केला तर सूर्याच्या रथाला एकच चाक असते; सात घोडे आहेत हे खरे परंतु त्यांचे लगाम म्हणजे सापच कारण हे घोडे त्यांनीच कावूत ठेवलेले. सूर्याला जो रस्ता कापायचा असतो ते आकाश तर निराधारच (निरालम्ब). सारथी कोण तर अरुण तो पाय नसल्यामुळे पांगळा म्हणजे सूर्याची सर्व साधने तुटपुंजी. असे जरी असले तरी दर दिवशी हा सूर्य अपार किंवा अनंत आकाशाच्या या टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत जाताना दिसतोच ना? यावरूनच सुभाषितकाराने मर्म सांगितले की साधनांची संपन्नता हे यशाचे खरे कारण नाही; खरे कारण सूर्याचे सत्त्व किंवा पराक्रम. याच्या जोरावर साधनांच्या दुबळेपणाची परवा न करता सूर्य दर दिवशी अनंत आकाशाच्या या टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत जातो.

या श्लोकात खऱ्या धीराच्या माणसाचे वर्णन केले किंबहुना त्याच्या धैर्याची पारख वाईट दिवसातच होते. धैर्यवृत्ति हा शब्द सुभाषितकाराने जाणुन बुजून वापरला; धैर्य ही ज्याची मनोप्रवृत्ती आहे नुसता गुण नव्हे अशी व्यक्ती ही धैर्यवृत्ती. अशा व्यक्तीचे धैर्य अगदी बिकट आपत्तीत हि नाहीसे होत नाही. कारण हा उपजत गुण असल्यामुळे तो पुसून टाकणे शक्य नसते. याला उदाहरणही फार चांगले दिले. वह्नि म्हणजे अग्नी तो अधोमुख केला म्हणजे मशाल जरी खाली तोंड करून उलटी धरली तरी ज्वाळा कधीच खाली जात नाहीत; त्या वरतीच उसळून येणार कारण तो स्वभाव आहे आणि 'स्वभावो दुरतिक्रमः'. त्यात बदल होत नसतो.

या श्लोकात अपमान झाल्यानंतरही मूग गिळून बसणाऱ्या माणसाची तुलना धुळीशी करून धुळीला त्याच्यापेक्षाही श्रेष्ठ ठरवले. रजः म्हणजे धूळ ती जर पायांनी तुडविली (पादेन आहत) तर तुडवणाऱ्याच्या डोक्यावर जाऊन बसते; याउलट अपमान झाल्यानंतरही स्वस्थ बसणारा म्हणजे तो निमूटपणे सहन करणारा कमी दर्जाचा हे उघड आहे. माणसासाठी सुभाषितकाराने 'देहिन्' म्हणजे देह धारण करणारा हा शब्द वापरून या देहात आत्मा म्हणजे स्वतःबद्दलचा अभिमान नाही हा अर्थ व्यक्त केला. माघ कवीच्या 'शिशुपालवधम्' या प्रसिद्ध महाकाव्याच्या दुसऱ्या सर्गातला हा सेहेचाळीसावा श्लोक उद्धवाच्या तोंडी येतो. या सर्गातल्या ६८ पासून ११५ श्लोकापर्यंत राजनीतीच्या सिद्धांताची चर्चा केली आहे.

या सर्गातला ४८ वा श्लोक मनस्वी माणसाची तुलना आणि समुद्र यांच्याशी करतो आणि त्याला दोघांपेक्षा ही श्रेष्ठ कसा मानतो हे लक्षांत ठेवण्यासारखे. अद्रि म्हणजे पर्वतात तुङ्गत्व म्हणजे उंची असते पण खोली नसते; समुद्रात अगाधता म्हणजे खोली असते परंतु उंची नसते. परंतु मनस्वी, स्वाभिमानी व्यक्तीजवळ खोलीही असते आणि उंचीही असते. म्हणून दोन्ही गुणांचा समाहार ज्याच्या व्यक्तित्वात झालेला असतो, तो या दोघांच्यापेक्षाही श्रेष्ठ. यात 'तुङ्गत्व' आणि 'अगाधता' या समर्पक शब्दांचा वापर करून माघाने स्वाभिमानी व्यक्तीची जी प्रशंसा केली ती सतत मनात घोळवण्यासारखी म्हणजे सुभाषितवजाच आहे. असे म्हणण्यास हरकत नाही. जीवनाच्या निरनिराळ्या पैलूंना संस्कृत सुभाषिते नेमकेपणाने स्पर्श करतात. या दृष्टीने या सुभाषितांनी जीवनाचे दालन सजवलेले आहे यात शंका नाही. •••

# संस्कृत काव्यातील शब्दचमत्कृती

डॉ. र.पु.कुलकर्णी

आपण बहुतेक सर्व आधुनिक माणसे फार विज्ञाननिष्ठ झालो आहोत. काव्य, कविता, त्यात पुन्हा संस्कृत भाषेतील, तर आपण पूर्ण विसरून चाललो आहोत, नव्हे विसरून गेलो आहोत. किंबहुना असे देखील म्हणता येईल की ते काव्य विसरण्यासाठी अगोदर माहिती तर पाहिजे! गणिती कसरती (Mathematical Gymnasium) हा शब्द व विषय आपल्याला माहिती आहे. काव्यात देखील शाब्दिक कसरती करता येतात याची जाणीवच आपल्याला उरलेली नाही. गणिती कसरती या जशा चमत्कृतीपूर्ण असतात तशा काव्यातील शाब्दिक कसरती देखील असतात. किंबहुना चमत्कृती निर्माण करणे, आपले बुद्धिवैभव दाखविणे हाच त्यांचा हेतू असतो. त्याला व्यवहारांत किंबहुना गणित विषयातही जरी फारसा उपयोग नसला तरीही ही गणिती कसरत करण्याचा मोह भल्याभल्यांना होतो. काव्यातील शाब्दिक कसरतींचे असेच आहे. त्या कसरतीच असतात. त्यात काव्य असतेच असे नाही. तरीही ह्या कसरती करून आपल्या बुद्धिमत्तेचा चमत्कार दाखविण्याचा मोह अनेक मोठ्या कवींनाही आवरता आलेला नाही.

कविकुलगुरू कालिदासाने अशी काही चमत्कृतीपूर्ण कसरत आपल्या काव्यात केलेली नाही. कित्येक नामवंत संस्कृत भाषेत कविता करणाऱ्या कवींच्या काव्यांच्या मानाने त्याचे काव्य प्रासादिक आहे व कविता रमणीच्या रमणीयतेला बाधा येईल असे त्याने काहीही केलेले नाही. मात्र कालिदासाने जर त्याच्या काव्यात अशा कसरती केल्या असत्या तर जो कोणी स्वतःला कवी म्हणवेल त्याने त्याची नकल उचलली असती आणि आज जी मोजक्याच कवींनी केलेली आहे ती शाब्दिक चमत्कृती प्रत्येकाने केली असती. असे असले तरी बुद्धीला चांगले खाद्य म्हणून आपण या विषयावरील, विशेषतः माघ व भारवि या थोर कवींनी काय गमती केल्या आहेत त्यांची झलक येथे मनोरंजन म्हणून पाहणार आहोत.

उपमा कालिदासस्य भारवेरर्थगौरवम्।
दण्डिनः पदलालित्यं माघे सन्ति त्रयो गुणाः॥

या प्रसिद्ध ओळी तुम्हाला माहीतच असतील. भारवि व माघ यांची कविकुलगुरू कालिदासाबरोबर वर्णी लागलेली आहे तेव्हा ते श्रेष्ठ कवी आहेत याबद्दल शंका असू नये. तसेच त्यांनी काही वेळेला उत्कृष्ट रसिकतेबरोबरच जे बुद्धिचापल्य दाखविले आहे ते त्यांच्या काव्यांप्रमाणेच अवर्णनीय आहे.

माघ कवींचे शिशुपालवध हे महाकाव्य प्रसिद्ध आहे आणि आज घडीला त्याची हीच कृती उपलब्ध आहे. या कवीचे आडनाव श्रीमाली असून तो गुजराथेत राहणारा असावा. त्याचे आजोबा सुप्रभदेव हे श्रीवर्मळ राजाचे धर्मसचिव होते अशी माहिती कवीने दिली आहे. सुप्रभदेवाचा काळ इ.स.६२५च्या एका शिलालेखावरून निश्चित समजतो तेव्हा माघ कवी सातव्या शतकाच्या उत्तरार्धात किंवा आठव्या शतकाच्या प्रथमार्धात होऊन गेला असे म्हणता येते.

भारवि कवीने किरातार्जुनीय नावाचे महाकाव्य लिहिले आहे व या कवींचे हे एकमात्र काव्य आज माहीत आहे. हा कवि माघपेक्षा कालक्रमाने अगोदरचा असल्याने तो सहाव्या शतकात होऊन गेला असावा असे अनुमान आहे.

शिशुपालवधातील यमकाचे उदाहरण बघा. यातील दुसरे व चौथे चरण सारखेच आहेत.

दिवामिच्छन् बुधागन्तु कोमलाऽमल सम्पदम्।
दधी दधानोऽसिलतां कोऽमलामलसं पदम्॥१९.३१॥

या श्लोकाचा एकूण अर्थ असा-शीतोष्णादि दोषांशिवाय असलेल्या स्वर्गात जाण्याची इच्छा असलेला

व तलवार धारण करणारा कोणता योद्धा लढाई करताना ढिलाई करेल.

या शिवाय पूर्ण यमकाचे उदाहरण त्याच काव्यातील देतो.

अयशोभिदुरालोके कोपधामरणाऽऽदृते।
अयशोभिदुरा लोके कोपधा मरणादृते ॥१९.५८॥

जे भाग्यवान व तेजस्वी आहेत त्यांनी रणातून पळून जाणे योग्य नाही. लोकांत अपकीर्ती होऊ नये म्हणून मरणाशिवाय त्यांना कोणती निराळी गती असणार. कःउपधाम रणाऽऽदृते म्हणजे रणा शिवाय दुसरे त्यांचे कोणते धाम, वसतिस्थान आहे.

भारवि कवीने देखील अशीच शब्दरचना केली आहे.

स्यन्दना नो चतुरगाः सुरेभा वाविपत्तयः।
स्यन्दना नो च तुरगाः सुरेभा वा विपत्तयः ।।१५.१६॥

याला समुद्रक यमक म्हणतात.

याच्यापुढील पायरी म्हणजे श्लोकाच्या पहिल्या चरणात जी अक्षरे येतात तीच अक्षरे उलट क्रमाने दुसऱ्या चरणांत येतात. तसेच दुसऱ्या ओळीत देखील.

वारणाऽगगभीरा सा साराऽभीगाणाऽऽरवा।
कारिताऽरिवधा सेना ऽ ना सेधा वारिताऽरिका ॥१९.४४॥

'पर्वतप्राय हत्तींमुळे प्रवेश करणे अवघड असलेल्या व बलवान योद्ध्यांच्या आरोळ्यांनी दुमदुमलेल्या अशा सेनेने शत्रूचा नाश केला आहे. शत्रूला दुष्प्रवेश्य (अशा माझ्याशी लढ)' असा अर्थ वरील श्लोकाच्या टीकेनुसार लावता येतो.

वरील उदाहरण भारवि कवीच्या शिशुपालवधातील आहे. माघाच्या क्रिरातार्जुनीयातील अशा प्रकारचे उदाहरण आहे.

वेत्रशाककुजे शैले ऽ लेशैजे ऽ कुकशात्रवे।
यात किं विदिशो जेतुं तुंजेशो दिवि किंतया ॥१५.१८॥

शत्रूला अजिंक्य, शत्रू ज्याला हलवू शकत नाही असा, ज्याला शत्रू पकडू शकत नाही व जो स्वर्गातील असुरांना देखील जिंकतो असा (अर्जुन). या काव्यरचनेला प्रतिलोमानुलोमपाद अलंकार म्हणतात.

याच्याहून बुद्धीची चपलता दाखविणारी रचना म्हणजे दोन श्लोकांच्या मदतीने 'प्रतिलोमानुलोम' नावाचा अलंकार साधणे. क्रिरातार्जुनीय महाकाव्यातील याचे उदाहरण आहे.

निशितासिरतोऽभीको न्येजतेऽमरणा रुचा।
सारतो न विरोधी नः स्वाभासो भरवानुत ॥१५.२२॥
तनुवारभसो भास्वानधीरो ऽ विनतोरसा।
चारुणा रमतेजन्ये को ऽभीतो रसिताशिनि ॥१५.२३॥

येथे पहिल्या श्लोकाच्या पहिल्या ओळीतील अक्षरांच्या उलट क्रमाने दुसऱ्या श्लोकातील दुसऱ्या ओळीतील अक्षरे आली आहे, म्हणजेच पहिली ओळ सरळ वाचली व दुसऱ्या श्लोकातील दुसरी ओळ उलट वाचली तर शब्दांचा अनुक्रम तोच येतो. याचप्रमाणे पहिल्या श्लोकातील दुसऱ्या ओळीतील अक्षरे व दुसऱ्या श्लोकांतील पहिल्या ओळीतील अक्षरे, अनुक्रमे सरळ व उलट वाचली तर शब्दांचा अनुक्रम येथे देखील सारखाच येतो.

याशिवाय चारही चरणांमध्ये सारखीच अक्षरे असलेलाही श्लोक क्रिरातार्जुनीयांत आला आहे.त्याचा अर्थ मात्र मी येथे देत नाही.

विकाशमीयुर्जगतीशमार्गणा विकाशमीयुर्जगतीशमार्गणाः।
विकाशमीयुर्जगतीशमार्गणा विकाशमीयुर्जगतीशमार्गणाः ॥१५.५२॥

कित्येकदा श्लोकाचा प्रत्येक चरण एकाच अक्षराचा ठेवून श्लोक लिहितात.

स सासिः सा सुसूः सासो येयायेयाययाययः।
ललौ लीलां ललोऽलोलः शशीशशिशुशीः शशन् ॥१५.५॥

सासिः म्हणजे हाती तलवार (असि) असलेला, सासुसूः म्हणजे हातात बाण (असुसूः) असलेला, सासो म्हणजे हातात धनुष्य (ज्याने बाण फेकतात ते असे) धारण केलेला. याच प्रमाणे दुसऱ्या चरणाचा अर्थ आहे ज्याला सुवर्ण व हत्ती यांचा लाभ झालेला आहे असा. 'जो मनोहर आहे व ज्याच्या हालचाली अचपळ आहेत असा' हा अर्थ आहे तिसऱ्या चरणाचा. चवथ्या चरणात शशीश म्हणजे शिव त्याचा शिशु म्हणजे मुलगा, स्कंद याने शशा सारखी उडी मारली (शशन्) तेव्हा वरील सर्व विशेषणे या स्कंदाची, देवांच्या सेनापतीची आहेत. अर्थ शब्दांच्या कसरतीसाठी कसा ओढून तोडून बसवावा लागतो याचे हा श्लोक चांगले उदाहरण आहे.

अर्थात याच्या पुढले उदाहरण म्हणजे सगळा श्लोकच एका अक्षराला उपयोग करून लिहिण्याचा.

न नोननुन्नो नुन्नोनो नाना नानानना ननु।<br>
नुन्नोऽनुन्नो ननुन्नेनो नानेना नुन्ननुन्ननुत् ॥१५.१४॥

अर्थात असे बुद्धिवैभव माघ कवीनेही दाखविलेले आहे.


याशिवाय अक्षरांची रचना गोमूत्रिका बन्धात करणे हा प्रकार या दोघाही कवींनी केलेला आहे. किरातार्जुनीयातील श्लोक १५.१२ बघा.

नासुरोऽयं न वा नागो धरसंस्थो न राक्षसः।<br>
नासुखो ऽयं नवा भोगो धरणिस्थो हि राजसः ॥१५.१२

या श्लोकातील अक्षरे बैलाच्या मूत्राची रेघ जमिनीवर जशी पडते त्याप्रमाणे मांडली व एक अक्षर वरील ओळीतील व दुसरे अक्षर खालच्या ओळीतील असे वाचले तरी हाच श्लोक निर्माण होतो. हीच किमया शिशुपालवधकाव्यातही आहे.




प्रवृत्ते विलसद्धानं साधनेष्वविवादिभिः।<br>
ववृधे विकसधानं सुधमाप्यविवाणिभिः ॥१९.४६॥




श्लोकातील अक्षरे अशी रचावयाची की जी चौरसात लिहिलीत तर आडवी उभी कशीही वाचा श्लोक तयार होईल. याला 'सर्वतोभद्र' रचना म्हणतात. श्लोक आहे-

देवाकानिनि कावादे वाहिका स्वस्वकाहि वा।<br>
काकारेभभरे काका निस्वभव्यव्यभस्वनि ॥१५.२५॥

हा श्लोकसर्वतोभद्र रचनेत खाली लिहून दाखविला आहे.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| दे | वा | का | नि | नि | का | वा | दे |
| वा | हि | का | स्व | स्व | का | हि | वा |
| का | का | रे | भ | भ | रे | का | का |
| नि | स्व | भ | व्य | व्य | भ | स्व | नि |
| नि | स्व | भ | व्य | व्य | भ | स्व | नि |
| का | का | रे | भ | भ | रे | का | का |
| वा | हि | का | स्व | स्व | का | हि | वा |
| दे | वा | का | नि | नि | का | वा | दे |

याहूनही चमत्कृतिपूर्ण रचना म्हणजे चक्रबन्ध. शिशुपालवधकाव्यातील श्लोक व चक्रबन्धाची आकृती खाली दिली आहे.

सत्त्वं मानविशिष्टमाजिरभसादालभ्य भव्यःपुरा
लब्धाऽपसयशुद्धिरूढ् धुरतर श्रीवस्तभूमिर्मुदा।
मुक्त्वा काममपास्तभीः परमृगव्याधः स नादं हरे-
रेकौघैः समकालमभ्युदयी रोपैस्तदाऽऽतस्तरे॥१९.१२०॥



आता आणखी एक असेच उदाहरण देतो. मात्र येथे शब्दांची कसरत नाही तर अर्थ चमत्कृत आहे. एकाच श्लोकाचा तीन प्रकारे अर्थ लावता येतो अशी ही श्लोकातील शब्दकला आहे. श्लोक आहे.-

जगती शरणे युक्तो हरिकान्तः सुधासितः।
दानवर्षी कृताशंसो नागराज इवाबभौ॥१५.४५

येथे हिमालय व अर्जुन, ऐरावत हत्ती व अर्जुन आणि नागराज शेष आणि अर्जुन यांच्यात तुलना केलेली आहे. नागराज-न अगराज म्हणजे हिमालय, नागराज म्हणजे हत्ती श्रेष्ठ तो ऐरावत व नागराज म्हणजे नागांमध्ये श्रेष्ठ तो 'शेष' नाग.

| शब्द | हिमालय | अर्जुन |
|---|---|---|
| जगतीशरणे | पृथ्वीच्या रक्षणासाठी असलेला | प्रत्यक्ष परमेश्वराशी युद्ध करू शकणारा |
| हरिकान्त | सिंह रहात असल्याने सुशोभित | सिंहाप्रमाणे मनोहर |
| सुधासितः | प्रजापालन चांगले करणारा | प्रजापालन चांगले करणारा |
| दानवर्षी | पुष्कळ देणारा | दानव व ऋषी यांना |
| कृताशंसः | ज्याला जयाची अभिलाषा आहे असा | उत्तम व अनेक फलांची ज्याच्या पासून अभिलाषा आहे असा |
| | ऐरावत | अर्जुन |
| जगतीशरणे | वरील प्रमाणे(?) | राक्षसांशी लढू शकतो असा |
| हरिकान्त | इन्द्राला आवडणारा | इन्द्राला आवडणारा |
| सुधासितः | चुन्याप्रमाणे पांढरा | स्वच्छ |
| दानवर्षी | मदस्राव करणारा | धन देणारा |
| कृताशंसः | जयाची इच्छा करणारा | जयाची इच्छा करणारा |
| | शेष | अर्जुन |
| जगतीशरणे | पृथ्वीचे रक्षण करणारा | पृथ्वीचे रक्षण करणारा |
| हरिकान्त | कृष्ण रंगाचा | कृष्णाचा आवडता |
| सुधासितः | पृथ्वी धारण करणारा | अमृतप्रिय |
| दानवर्षी | दैत्य व ऋषी यांनी | दैत्य व ऋषी यांनी |
| कृताशंसः | प्रशंसिलेला | प्रशंसिलेला |

• • •

# प्राचीन भारतीय वाङ्मयीन लोकशाही

डॉ. वामन केशव लेले

## प्रतिपाद्य विषय

प्राचीन भारतीय वाङ्मयसेवकांनी, त्यांच्या आश्रयदात्यांनी व एकूण समाजाने समता, स्वतंत्रता, एकात्मता, सहिष्णुता व लोककल्याण-अभिमुखता ही लोकशाहीची सर्वपरिचित मूलभूत तत्त्वे किती प्रमाणात प्रत्यक्षात आचरणात आणली होती त्याचा अभ्यास करून त्याच्या आधारे दलित साहित्याच्या समीक्षेसाठी स्वतंत्र सौंदर्यशास्त्राची आवश्यकता आहे, ह्या दलित लेखक - समीक्षकांच्या मागणीची युक्तायुक्तता पारखणे हा प्रस्तुत निबंधाचा संयुक्त उद्देश आहे.

## अभ्यासार्थ निवडलेला कालखंड

मागधी ह्या प्राकृत भाषेत इसवी सनपूर्व ५०० मध्ये भारताच्या पूर्व भागात लौकिक (म्हणजे Secular) काव्याच्या निर्मितीला सुरुवात झाली.[१] सातवाहन राजवंशाच्या कारकिर्दीत म्हणजे सनपूर्व २५० ते सनोत्तर २२७ [२] ह्या कालावधीत महाराष्ट्री प्राकृत भाषेला संस्कृतच्या बरोबरीचे स्थान मिळून तिच्यात सर्व प्रकारचे ललित साहित्य लिहिले जाऊ लागले.[३] सनपूर्व पहिल्या शतकात पैशाची ही दक्षिणापथाची [४]साहित्यिक भाषा म्हणून मान्यता पावली होती.[५] सनोत्तर ३०० च्या सुमारास महाराष्ट्रात आभीरांची राजवट होती.[६] तिची राज्यभाषा अपभ्रंश होती. तिचा लवकरच जैन, व्रजवासी, बौद्ध, वैष्णव इत्यादी सर्वांनीच स्वीकार केला व हळूहळू तिचे प्रमाणीकरण होऊन सनोत्तर १००० मध्ये तिची लोकप्रियता कळसास पोचून तिच्यात काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंतच्या प्रदेशांत काव्यरचना झाली.[७]

भरत, दण्डी, वामन, आनंदवर्धन, कुंतक, महिमभट्ट व क्षेमेन्द्र ह्या काव्यशास्त्रकारांनी प्रतिपादिलेले रस, अलंकार, रीती, ध्वनी, वक्रोक्ती, अनुमिती, चमत्कार व औचित्य हे प्रमुख आठ सिद्धान्त सनोत्तर १००० पर्यंत स्थिरपद झाले होते.

वरील दोन कारणांखातर प्रस्तुत निबंधातील चर्चेसाठी सनपूर्व ५०० ते सनोत्तर १००० हा पंधराशे वर्षांचा कालखंड निवडला आहे.

## शिक्षण-संपादनाची समान सवलत

राजशेखराने म्हटल्याप्रमाणे प्राचीन कवीला काव्यरचनेस आरंभ करण्यापूर्वी विविध पौरुषेय व अपौरुषेय शास्त्रांचे ज्ञान संपादन करावे लागत असे.[८] तत्प्रीत्यर्थ विद्यापीठीय शिक्षण प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांवर कोणते संस्कार होत असत, ते समजून घेऊ. तक्षशिला विद्यापीठात (सनपूर्व ८०० ते सनोत्तर ४००) गरीब विद्यार्थ्यांकडून शुल्क घेण्यात येत नसे व त्यांच्यासाठी रात्रीच्या अध्यापनाचीही सोय होती, तेथे काव्यादी कलासंकट सर्व विषयांचे सैद्धान्तिक व प्रात्यक्षिक / प्रायोगिक असे उभयविध शिक्षण देण्यात येत असे.[९] बिहारमधील गुणशीला विद्यापीठात (सनपूर्व ६००) वाङ्मय व इतर शास्त्रे पाठांतर, परिप्रश्न व वादविवाद ह्या त्रिविध पद्धतीने शिकविली जात असत, त्यायोगे विद्यार्थी स्वतंत्रपणे विचार करून उपार्जित ज्ञानाचे उपयोजन करू शकत असे, शिवाय ह्या विद्यापीठात स्त्रियांनाही प्रवेश देण्यात येऊन पुरुष-विद्यार्थ्यांचेच विषय शिकविले जात असत.[१०] त्याच सुमारास काशीतील जैन व बौद्ध विहारांत सर्व जातींच्या विद्यार्थ्यांना प्रवेश मिळत असे आणि काव्यासकट विविध कलांचे[११] शिक्षण दिले जात असे.[१२] याच काळातील अयोध्येतील जैन विद्यापीठात [१३] काव्य, अलंकार, नाटक, कविता, वाचन, पठण, गूढकाव्यज्ञान, समस्यापूर्ती अनेकभाषाज्ञान इत्यादी काव्योपयोगी चौसष्ट[१४] विद्या शिकवल्या जात असत, येथे-ही महिलांना प्रवेश मिळत असे. तमिळनाडूतील कांची विद्यापीठात (सनपूर्व २०० ते सनोत्तर १३००) वैदिक दर्शने, चार्वाकादी नास्तिक दर्शने, बौद्ध व जैन तत्वज्ञाने अशा सर्व विषयांचे अध्ययन - अध्यापन होत असे.[१५] सौराष्ट्रातील वलभी विद्यापीठात (सनोत्तर ४५० ते ७७५) सर्व देशांचे,

सर्व पंथांचे व सर्व जातींचे असे सहा हजार विद्यार्थी शिक्षण घेत असत, त्यांना लेखनकला, व्याकरण, निरुक्त, निघंटू इत्यादी बहात्तर [16] विषय शिकविले जात असत. [17] कुंडिनपूर विद्यापीठात (सनोत्तर ६००) इतिहास, आख्यान, व्याकरण या विषयांच्या बरोबरीनेच 'काव्य' शिकविण्याची व्यवस्था होती. [18]

वरील तपशिलाधारे निघणारे निष्कर्ष असे: प्राचीन काळी स्त्रियांच्या शिक्षणाकडे जाणीवपूर्वक लक्ष पुरवण्यात येत असे. सहशिक्षणाच्या पद्धतीमुळे स्त्रीवर्गाकडे पाहण्याचा पुरुषांचा दृष्टिकोन समभावाचा व सौहार्दाचा बनत असे. प्राचीन शिक्षणप्रणालीत जातिभेद व स्त्रीपुरुषभेद नव्हते. गोरगरिबांच्या (म्हणजेच बहुजन समाजाच्या) शिक्षणास सक्रिय प्रोत्साहन मिळत असे, त्यामुळे त्यांच्या 'बौद्धिक व सामाजिक' उन्नतीस साहाय्य होत असे. विविध तत्त्वज्ञानांच्या अभ्यासामुळे [19] अभ्यासक परमतसहिष्णू व आत्मपरीक्षक बनत असत. विभिन्न देशांचे, धर्मांचे व जातींचे स्त्रीपुरुष 'माणूस' ह्या नात्याने 'समान' आहेत हे अत्यंत व्यापक, उदात्त व उन्नत तत्त्व सर्व शिक्षितांच्या मनावर नकळत ठसत असे. अशा प्रकारे विद्यापीठीय शिक्षण पूर्ण करून समाजात वावरू लागणारा 'स्नातक' [20] समता, बंधुता, एकात्मता, सहिष्णुता व माणुसकी ही लोकशाही-मूल्ये आत्मसात केलेला प्रबुद्ध कवी असे.

### 'लोक' संकल्पना व वर्ण्यविषयांची व्यापकता

प्राचीनांची भव्य लोक-संकल्पना : भारताचे 'लोक' हे एक प्रमाण मानून नाट्य म्हणजे लोकांचे नानावस्थारूपी अंगाभिनययुक्त चरित्रवर्णन असे लक्षण केले आहे. [21] लोकजीवन हा काव्याचा आधार असतो, असे भामहाने [22] म्हटले आहे. दण्डी, [23] वामन, [24] इत्यादी उत्तरकालीन शास्त्रकारांनी ही व्यापक लोक-संकल्पना उचलून धरली. त्या सर्वांच्या विचारांचा सारांश असा: त्रैलोक्यात राहणाऱ्या, विविध स्वभावांच्या, भाषांच्या, पेशांच्या, वयोगटांच्या, लिंगांच्या व जातिधर्मांच्या व्यक्तींना, निसर्गातील पशुप्राण्यादींना तसेच वृक्षवेली, नद्यानाले इत्यादी समस्त चेतनाचेतन पदार्थांना 'लोक' म्हणतात. याचेच वर्णन काव्यात केलेले असते. ह्यावरून प्राचीन भारतीयांची 'लोक'-कल्पना मुळातच सर्व समावेशक होती, तिला व म्हणूनच तिच्या काव्यगत वर्णनाला कशाचेही वावडे किंवा वर्ज्यावर्ज्य नव्हते.

### वर्ण्य विषयांची व्यापकता :

भामहाच्या मते जगातील असा एकही शब्द नाही, एकही अर्थ नाही, असे एकही शास्त्र नाही किंवा अशी एकही कला नाही, की जी काव्याचा वर्ण्यविषय होऊ शकत नाही. [25] कवीच्या ठायी प्रतिभागुण असेल तर त्याला स्फुरणारे काव्यविषय कधीच संपुष्टात येत नाहीत, [26] असे आनंदवर्धनाचे मत आहे. धनंजयाच्या मते तर ह्या दुनियेत रमणीय किंवा किळसवाणी, उदार किंवा नीच, उग्र किंवा प्रसन्न, गंभीर किंवा विकृत असलेली अशी एकही वस्तू नाही की जिला कविवाणीचा स्पर्श झाला की तिला भावाचे किंवा रसाचे स्वरूप प्राप्त होत नाही. [27] हे लक्षात घेतले की, म्हणून खरा प्रश्न विचारला पाहिजे तो हा की, सौंदर्य हे एकात्म आहे का ? व्हिक्टर ह्यूगोची 'हंचबॅक् ऑफ् नोतरदाम' ही कादंबरी एका कुरूप कुबड्यावर असूनही ती सुंदर आहे. कलाकृतीचे सौंदर्य आणि वस्तू वा व्यक्तीचे सौंदर्य यांत महदंतर आहे,'' हा जो फरक शरद् पाटील [28] यांनी निदर्शनास आणला आहे त्याची जाणीव हजार वर्षांपूर्वी होऊन गेलेल्या धनंजयाला होती, हे ध्यानात घ्यावयास हवे. ह्या विधानाला आणखी एका प्रमाणाने पुष्टी जोडता येईल, ती अशी की, प्राचीन भारतीय वैदिक जैन व बौद्ध नीतिकथाकारांनी स्त्रीपुरुष, पशुपक्षी, वृक्षवल्ली, नदीपर्वत, देवदेवता किंबहुना सारे विश्व कथांत सामावून टाकले आहे. [29] तात्पर्य, प्राचीन भारतीय काव्याचे विषयविश्व पराकोटीचे व्यामिश्र आहे, हे वरील विवेचनावरून व निबंधाला जोडलेल्या परिशिष्ट १ वरून सुविशद होईल.

### बहुजनसमाज व दारिद्र्य यांचे वर्णन :

हा विषयही प्राचीन कवींनी हाताळलेला आहे ह्याविषयी शंका राहू नये म्हणून अशा काही साहित्यकृतींचा तपशीलच देतो. सनोत्तर पहिल्या-दुसऱ्या शतकात संकलित झालेल्या [30] गाहासत्तसईत गोदावरीकाठच्या ग्रामीण जीवनाचे दर्शन घडते. त्यात खेडुतांची सुखदुःखे वर्णिलेली आहेत. शिवाय, शेतकऱ्याचे जीवन, गवळी, गौळणी, धान्य दळणारे, गरीब स्त्रीपुरुष, भिस्ती, न्हावी, वनवासी,

शेती, बागबगीचे, पशुप्राणी, इत्यादींचेही वर्णन आहे.[११] शूद्रकाच्या (सनोत्तर तिसरे शतक) मृच्छकटिकातील चारुदत्ताला विदूषकाने, 'मित्रा, तुला मरण व दारिद्य यांतले काय आवडते?' असा प्रश्न केला असता चारुदत्ताने उत्तर दिले आहे, ते असे: 'दारिद्याद् मरणाद् वा मरणं मे रोचते न दारिद्यम्। अल्पक्लेशं मरणं दारिद्यं अनन्तकं दुःखम् ॥' तो ह्यावावतीत पुढे म्हणतो की. दारिद्यामुळे मनुष्य लज्जित, निस्तेज, अपमानित, निर्विण्ण, बुद्धिभ्रष्ट होऊन नष्ट होतो, दारिद्यरूप दुःखाग्नी मनुष्याला सतत पोळत राहतो, एकदाचा कायमचा जाळून टाकत नाही,[१२] इतक्या तीव्र शब्दांत दारिद्याचे वर्णन केले आहे, सनोत्तर आठव्या शतकातील योगेश्वराच्या कवितासंग्रहात[१३] ग्रामीण जनतेचे कष्टभरे पण आनंदी जीवन शब्दबद्ध केलेले आहे. सनोत्तर ८२५ नंतर होऊन गेलेल्या रुद्रटाने नाटक, प्रकरण, लघुनाट्ये, मुक्तक इत्यादी विविध प्रकारच्या काव्यांत फक्त भारतवर्षातील स्त्रीपुरुषादींच्या जीवनातील आधिभौतिक सुखदुःखे, मानसिक क्लेश, दारिद्य, शारीरिक पीडा इत्यादींची वर्णने करावीत असा उपदेश कवींना केला आहे.[१४] सनोत्तर ९६७ मध्ये पुष्पदंत कवीने जसहरचरिउ नावाचे खंडकाव्य अपभ्रंश भाषेत लिहिले असून त्यात विरह व दारिद्य यांचे सरस मनोहर वर्णन केले आहे.[१५]

**लौकिक विषय :**

प्राचीन भारतीय कवींनी अन्य लौकिक विषय परिणामकारकपणे हातावले आहेत. उदाहरणार्थ, सनपूर्व सातशेमध्ये होऊन गेलेल्या केशिनूच्या मलयसुंदरी नामक कादंबरीत जादूतील रोमांचकारकतेचे वर्णन आढळते.[१६] सनपूर्व ३०० च्या आसपास श्रीलंकेत रचल्या गेलेल्या तेलकटाहगाथा या पाली भाषेतील ९८ पद्यांच्या भावकाव्यात 'कढईची कहाणी' सांगितलेली आहे.[१७] त्याच काळातील जातककथांत भारतातील समाजधर्म, अर्थव्यवस्था चोरी, व्यभिचार, कौटुंबिक जीवन, आहारविहार, व्यापारउदीम इत्यादींचे वर्णन आढळते.[१८] पाटलिपुत्राच्या मूलदेव नामक राजपुत्राने सनपूर्व १८७ मध्ये 'घरफोडीचे शास्त्र' ह्या विषयावर एक पाठ्यपुस्तकच लिहिले![१९] सनपूर्व १०० च्या आसपास रचल्या गेलेल्या 'नालडियार' नामक तमिळ ग्रंथातील १३ अध्यायांत आर्थिक विषयांचे निरुपण आहे.[२०] सातवाहनाच्या गाहासत्तसईत बहिरे, आंधळे, गरोदर स्त्रिया, बदमाश, पाणक्ये, वैद्य, प्रवासी नवरा, सासरा, कुटुंबजीवन, वात्सल्य इत्यादी विषयांवर रसाळ गीते आहेत.[२१] शंकुकाने भुवनाभ्युदय महाकाव्यात उत्पल व मम्म या दोन राजांमध्ये सनोत्तर ८५० मध्ये झालेल्या तुमुल युद्धाचे (म्हणजे समकालीन सामाजिक घटनेचे) वर्णन केले आहे.[२२] एका अज्ञातनाम कवीने सनोत्तर ८५५ मध्ये 'नन्दिक्कलंबकम्' या ११६ पद्यांच्या काव्यात नन्दिवर्मनूने केलेला पांडव राजाचा पराभव वर्णिला आहे.[२३] भट्टभल्लटोव सनोत्तर ८८०-९०० या कालावधीत अन्यापदेश काव्याच्या द्वारे समकालिन दुष्ट सामाजिक रूढींवर प्रकाश टाकला आहे.[२४] सनोत्तर ९०० मधील तोळकापियरने समकालीन रीतिरिवाजांच्या वर्णनाचे निमित्त साधून आर्य व द्रविड संस्कृतींचा संगम घडवून आणला आहे.[२५] क्षेमेन्द्राने (सनोत्तर ९८० ते १०६६) 'पवनपंचाशिका' या ५० श्लोकांच्या लघुकाव्यासाठी वायुवर्णन हा विषय निवडला आहे.[२६] क्षेमेन्द्रानेच मालक व नोकर यांचे परस्परसंबंध या विषयावर 'सेव्यसेवकोपदेश' नावाचे ६१ श्लोकांचे एक लघुकाव्य लिहिले आहे. त्यामध्ये मालकाचा गर्व, धनाढ्यता, उन्मत्तपणा, निर्दयता, वैभवात लोळण्याची वृत्ती, आणि अमाप संपत्ती मिळविण्याचा लोभ या अवगुणांच्या पार्श्वभूमीवर नोकरांचे दारिद्य, त्यांची लाचारी, कार्यमग्नता, सेवानिष्ठा, आशाळभूत वृत्ती, निःसत्वपणा यांचे हृदयद्रावक वर्णन केले आहे. नोकर हा सेवारूपी चिखलात निरंतर रुतलेला असतो आणि म्हातारपणी तर त्याची दुर्दशा होते असे चित्र रेखाटले आहे.[२७] वरील तपशील लक्षात घेता वॉर्डर यांचे 'The writers wrote on every conceivable subject'[२८] हे निरीक्षण तर सर्वतोपरी रास्त वाटतेच, पण दलित साहित्याच्या समीक्षेसाठी स्वतंत्र सौंदर्यशास्त्राची आवश्यकता आहे, अशी मागणी करणाऱ्या शरद्[२९] पाटील यांची 'साहित्याने वास्तववाद व कलात्मकता यांचा संयोग घडवून आणला पाहिजे' ही अपेक्षाही प्राचीन भारतीय काव्याने पुरी केली आहे, हे आपोआपच स्थापित झाल्याचे जाणवून समाधान वाटते.

### काव्यनिर्मिती हा समग्र समाजाचा उपक्रम

प्राचीन भारतीय काव्यनिर्मात्यांना जातीपातींचे किंवा धर्मपंथाचे कोणतेही बंधन नव्हते. उदाहरणार्थ, सूक्तकार ऋषिमुनींपैकी वसिष्ठ, नारद, व्यास, विश्वामित्र, ऋष्यशृंग, अगस्त्य व कुशिक हे अनुक्रमे वेश्या, दासी, कोळीण, क्षत्रिय स्त्री, मृगी नामक विशिष्ट वर्गीय स्त्री, वेश्या व शूद्रस्त्री यांच्या पोटी जन्माला आलेले होते व तपश्चर्या करून ब्राह्मण झाले होते. सनपूर्व ६०० च्या सुमारास तमिळ भाषेत साहित्यनिर्मितीस प्रारंभ झाला होता. राजे, व्यापारी, वैद्य, शेतकरी, कारागीर इत्यादी सगळेच साहित्यनिर्माते होते. प्राचीन तमिळ साहित्याच्या संघम युगातील (सनपूर्व ५०० ते सनोत्तर २००) पहिल्या संघमात ४४४९ कवींनी, दुसऱ्या संघमात ३६०० कवींनी व तिसऱ्या संघमात ४४९ कवींनी आपापल्या कविता परीक्षणार्थ व पुरस्कारार्थ पाठवल्या होत्या. ह्या हजारो कवींत विभिन्न जातीजमातींचे, धर्मपंथांचे, सवर्ण व असवर्ण असे सर्व प्रकारचे कवी असणार हे उघड आहे. गाहासत्तसईतील गाथा राजापासून रंकापर्यंत सर्व थरांतील प्रतिभावंतांनी रचलेल्या आहेत. सातवाहनाच्याच राजवटीतील व्यापारी, नौकाधिपती व पर्यटक प्रवास करताना कथारचना करीत असत. हर्षाच्या दरबारी (सनोत्तर ६०६-६४६) दिवाकर नावाचा मातंग म्हणजे मांग जातीचा कवी होता व राजशेखराने त्याचा 'महान कवी' ह्या शब्दांत गौरव केला आहे. जैनेतर अपभ्रंश साहित्यात ब्राह्मण, मुसलमान व बौद्ध यांनी रचलेल्या कृतींचा समावेश आहे. प्रस्तुत मुद्द्याच्या संदर्भात राजशेखराने पुढीलप्रमाणे उद्बोधक माहिती पुरवली आहे. बालके, स्त्रिया व हीन जातीच्या व्यक्ती उत्कृष्ट काव्ये मुखाने गाऊन देशाच्या कोनाकोपऱ्यापर्यंत नेऊन पोचवीत असत. व्यापारी व नोकर वर्ग नोकरीधंद्याच्या ठिकाणी जाताना प्रवासात काव्ये रचून (ती सहप्रवाशांना ऐकवीत असत). आपला नोकरीधंदा सांभाळून फुरसत मिळेल तेव्हा काव्यरचना करणारे असत, त्यांना 'प्राप्तावसर' कवी म्हणत असत. एकंदरीने प्राचीन भारतीय काव्य ही समाजातील सर्व जातींच्या, पंथांच्या, व्यवसायांच्या, वयांच्या, लिंगांच्या व प्रांतांच्या कवींची निर्मिती होती. ती कोणत्याही एका वर्गाची, वर्णाची, व पंथांची मिरास किंवा मक्तेदारी नव्हती, म्हणजेच ती 'लोक' कविता होती. ह्या विवेचनाच्या आधारे प्राचीन भारतीय कवींनी व एकूण समाजाने वाङ्मयव्यवहारात समता-स्वतंत्रता-प्रभृती लोकशाही मूल्ये साक्षात आचरणात आणली होती, हे स्पष्ट होईल.

दलित साहित्याच्या समीक्षेसाठी स्वतंत्र सौंदर्यशास्त्राची आवश्यकता आहे काय, ह्या प्रश्नाचे आता थोडक्यात उत्तर देऊ.

प्राचीन भारतीय काव्यशास्त्रकारांनी प्राकृत-अपभ्रंश-प्रभृती बहुजनसमाजाच्या भाषांतील पद्ये अलंकार, गुण, दोष, ध्वनिभेद, नायिकाप्रकार, औचित्य, हर्षादी भाव इत्यादी भावाभावरूप काव्यधर्मांच्या स्पष्टीकरणासाठी व/वा समीक्षेसाठी उद्धृत केलेली आहेत. ती समीक्षा आम्हांला मान्य नाही, आमच्या काव्याची समीक्षा वेगळ्या निकषांनी व्हावयास हवी, असा आग्रह प्राचीन संस्कृतेतर कवींनी कधीच धरला नव्हता. काही अर्वाचीन दलित साहित्यिकांनी प्रमाण मराठीच्या बोलीभाषांत साहित्यकृती रचल्या आहेत, म्हणून मुद्दाम प्रस्तुत मुद्दा मांडला आहे.

अब्राह्मणी साहित्यात कविता, लघुकथा, कादंबरी व आत्मकथन हे चारच साहित्यप्रकार प्रामुख्याने हाताळले गेले आहेत. भारतीय साहित्यशास्त्रज्ञांनी ह्या चारी प्रकारांची लक्षणे, भेदोपभेद, रचनात्मक व भाषात्मक वैशिष्ट्ये इत्यादींची विस्तृत, सूक्ष्म व सोदाहरण चर्चा आपापल्या ग्रंथांमधून केली आहे. उदाहरणार्थ केवल 'कथा' ह्या वाङ्मयप्रकाराचे प्राचीनांनी उपकथा-निदर्शनकथा-परिहासकथा-प्रभृती सोळा प्रकार कल्पून त्यांच्या लक्षणादींचे निरूपण केले आहे. ही लक्षणे वा वैशिष्ट्ये दलित कथेला लागू पडण्यासारखी आहेत. ह्याच पद्धतीने कविताप्रभृती साहित्याचेही अध्ययन होऊ शकेल.

शरणकुमार लिंबाळे यांनी डॉ. आंबेडकर यांच्या तत्त्वज्ञानात स्वातंत्र्य, समता, बंधुता व मानवता यांना स्थान आहे असे प्रतिपादन केले आहे. ह्या तत्त्वांचे प्राचीनांना भान होते व ही तत्त्वे त्यांनी कृतीत उतरवली होती, हे वरील ३ ते ५ ह्या अनुभागांत विस्ताराने प्रस्थापित केलेच आहे.

ह्या तत्त्वांचा रसिकांच्या चित्तावर ठसा उमटेल अशा 'साहित्यकृती' दलित लेखकांनी जरूर लिहाव्यात, रसिक त्यांचे सहर्ष स्वागत करतील.

वस्तुतः दलित समीक्षकांनी दलित साहित्याच्या आकलनाच्या, गुणदोषपरीक्षणाच्या व आस्वादनाच्या निकषांची सैद्धान्तिक, प्रायोगिक व सोदाहरण चर्चा करणारे विवरणात्मक ग्रंथ लिहावेत, म्हणजे 'स्वतंत्र साहित्यशास्त्रांच्या' त्यांच्या सध्याच्या मागणीला समूर्त, सोपपत्तिक व भक्कम अधिष्ठान लाभेल, इतकेच शेवटी नम्रतेने सुचवावेसे वाटते.

## सन्दर्भ


१. Indian Kavya Literature, Vol 2, A. K. Warder, First, Delhi, Motilal Banarsidass, 1974, p.22.

२. भारतीय संस्कृतिकोश, नववा खंड, संपा. महादेवशास्त्री जोशी व इतर, प्रथम, पुणे, भारतीय संस्कृतिकोश मंडळ, १९७६, पृ. ७२१.

३. वरील संदर्भ १, पृ. ११८-२२०.

४. दक्षिणापथात अश्मक, कुंतल, कांची, कावेर, केरल, कोंकण, कोल्लगिरी, क्रथकैशिक, गाङ्ग, चोड, दण्डक, नाशिक्य, पह्लव, पाण्ड्य, महाराष्ट्र, माहिषक, मुरल, वल्लर, वानवासक, विदर्भ, सिंहल, सूर्पारक इत्यादी देशांचा समावेश होत असे. पहा: काव्यमीमांसा, राजशेखर, संपा. सी.डी.दलाल व इतर, सुधारून वाढविलेली तिसरी आवृत्ती, बडोदा, ओरिएण्टल् इन्स्टिट्यूट, १९३४, Introduction p. XLI.

५. वरील संदर्भ १, पृ. ११९.

६. Indian Kavya Literature, Vol 3, A. K. Warder, First, Delhi, Motilal Banarsidass, 1977, p.1.

७. Indian Kavya Literature, Vol 4, A. K. Warder, First, Delhi, Motilal Banarsidass, 1983, p.434.

८. 'शास्त्रपूर्वकत्वात् काव्यानां पूर्वं शास्त्रेषु अभिनिविशेत।... तच्च द्विधा अपौरुषेयं पौरुषेयं च।' - वरील संदर्भ ४, पृ. २.

९. भारतीय संस्कृतिकोश, चौथा खंड, संपा. महादेवशास्त्री जोशी व इतर, प्रथम, पुणे, भारतीय संस्कृतिकोश मंडळ, १९६७, पृ. ६७.

१०. भारतीय संस्कृतिकोश, तिसरा खंड, संपा. महादेवशास्त्री जोशी व इतर, प्रथम, पुणे, भारतीय संस्कृतिकोश मंडळ, १९६५, पृ. ६१.

११. वात्स्यायनाने कामसूत्रांत वाङ्मयात्मक ह्या कला पुढीलप्रमाणे मानल्या आहेत. १ वाचन व पठण, २ शब्दकोशविद्या व पद्यरचना, ३ गूढकाव्यज्ञान, ४. समस्यापूर्ती, ५. न पाहिलेल्या वस्तू व अक्षरे ओळखणे, ६. सांकेतिक भाषाज्ञान, ७ अनेक भाषाज्ञान, ८. कूट प्रश्न सोडविणे, ९. तोंडी कूट प्रश्न सोडविणे, १०. नक्कला करणे. पहा - संख्या संकेत कोश, संपा. श्रीधर शामराव हणमंते, तृतीय (सुधारून वाढविलेली), पुणे, प्रसाद प्रकाशन, १९८०, पृ. ५३६.

१२. भारतीय संस्कृतिकोश, दुसरा खंड, संपा. महादेवशास्त्री जोशी व इतर, प्रथम, पुणे, भारतीय संस्कृतिकोश मंडळ, १९६४, पृ. ३१४.

१३. मराठी विश्वकोश खंड १, प्रमुख संपा. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, प्रथम, मुंबई, महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृति-मंडळ, १९७६, पृ-४३८.

१४. वरील संदर्भ ११, पृ. ५३६-५३८ वर चौसष्ट कलांच्या तीन याद्या दिल्या आहेत.

१५. वरील संदर्भ १२, पृ. ३१४.

१६. बहात्तर विषयांच्या तपशिलासाठी वरील संदर्भ ११, पृ-५४५ वपावे.

१७. भारतीय संस्कृतिकोश, आठवा खंड, संपा. महादेवशास्त्री जोशी व इतर, प्रथम, पुणे, भारतीय संस्कृतिकोश मंडळ, १९७४, पृ. ५०८.

१८. वरील संदर्भ १२, पृ. ३६४.

१९. अभिनवगुप्त शिवभक्त असूनही त्याने बुद्धिविकास साधण्यासाठी 'तार्किक, श्रौत, बौद्ध, अर्हत्, वैष्णव' इत्यादी विविध पंथांच्या गुरूंच्या चरणांशी बसून ज्ञान-संपादन केले. History of Sanskrit Poetics, P.V. Kane, Third revised edition, Delhi, Motilal Banarsidass, 1961, p. 240, footnote 2.

२०. 'यः कवित्वकामः काव्यविद्योपविद्याग्रहणाय गुरुकुलानि उपास्ते स विद्यास्नातकः।' - वरील संदर्भ ४, पृ. १९.

२१. 'तस्मान्नाट्यप्रयोगे तु प्रमाणं लोक उच्यते।... कृतानुकरणं लोके नाट्यमित्यभिधीयते।' - वरील संदर्भ १९, पृ. ३७, तळटीप १.

२२. 'तत्र लोकाश्रयं काव्यम्...।' काव्यालंकार, भामह, भाष्यकार देवेन्द्रनाथ शर्मा, पटना, बिहार-राष्ट्रभाषा परिषद, १९६२, पृ. १२६.

२३. 'चराचराणां भूतानां प्रवृत्तिर्लोकसंज्ञिता।' - काव्यादर्शः, दण्डिन्, व्याख्याकार रामचन्द्र मिश्र, वाराणसी, चौखम्बा विद्याभवन, १९५८, पृ. २८८.

२४. 'लोकवृत्तं लोकः ॥२॥ लोकः स्थावरजङ्गमात्मा तस्य वर्तनं वृत्तमिति।' - काव्यालंकारसूत्राणि, वामन, संशो. नारायण राम आचार्य, चतुर्थ, मुंबई, निर्णयसागर प्रेस, १९५३, पृ. ८.

२५. 'न स शब्दो न तद्वाच्यं न स न्यायो न सा कला। जायते यन्न काव्याङ्गमहो भारो महान् कवेः ॥' - वरील संदर्भ २२, पृ. १०८.

२६. 'न काव्यार्थविरामोऽस्ति यदि स्यात् प्रतिभागुणः।' - ध्वन्यालोकः, आनंदवर्धन, संपा. शोभित मिश्र, द्वितीय, बनारस, चौखम्बा संस्कृत सीरीज, १९५३, पृ.६२९.

२७. रम्यं जुगुप्सितं उदारं अथापि नीचं। उग्रं प्रसादि गहनं विकृतं च वस्तु। यद् वाप्यवस्तु कविभावक भाव्यमानं। तन्नास्ति यन्न रसभावं उपैति लोके॥' - दशरूपकम्, धनंजय, व्याख्या. भोलाशंकर व्यास, बनारस, चौखम्बा विद्याभवन, १९५५, पृ. २८२.

२८. अब्राह्मणी साहित्याचे सौंदर्यशास्त्र, शरद पाटील, प्रथम, पुणे, सुगावा प्रकाशन, जुले, १९८८, पृ. १८४.

२९. भारतीय संस्कृतिकोश, पाचवा खंड, संपा. महादेवशास्त्री जोशी व इतर, प्रथम, पुणे, भारतीय संस्कृतिकोश मंडळ, १९६८, पृ. १४२-४४.

३०. शेफालिका (नृपती हालसातवाहन यांच्या गाथासप्तशती' चा अनुवाद) पद्यानुवाद राजा बढे, गद्यानुवाद अरविंद मंगरूळकर, प्रथम, मुंबई, म.रा.सा.सं.मंडळ, १९८४.

३१. वरील संदर्भ १, पृ. १८२-८९.

३२. मृच्छिकटिकम्, शूद्रक, संपा. आर्.डी.करमरकर, द्वितीय, पुणे, संपादक, १९५०, पृ. १२-१४.

३३. A.K. Warder, 'Classical Literature,' in A Cultural History of India, ed., A.L. Basham, Oxford, Clarendon Press, 1975, p. 188.

३४. काव्यालंकार, रुद्रट, संपा. दुर्गाप्रसाद व इतर, तृतीय, मुंबई, निर्णयसागर मुद्रणालय, १९२८, पृ. १७३.

३५. वरील संदर्भ १०, पृ. ६६७.

३६. वरील संदर्भ ३३, पृ. १९२.

३७. तत्रैव.

३८. वरील संदर्भ १०, पृ. ५७६-७९.

३९. वरील संदर्भ १, पृ. ३६४

४०. वरील संदर्भ २९, पृ. ७५.

४१. वरील संदर्भ १, पृ. १८९.

४२. Indian Kavya Literature, Vol 5, A. K. Warder, First, Delhi, Motilal Banarsidass, 1988, p.161.

४३. Ibid., pp. 281.82.

४४. वरील संदर्भ ३३, पृ. १९०.

४५. वरील संदर्भ ९, पृ. २१२-१३.

४६. कविकण्ठाभरण (हिन्दी संस्करण), क्षेमेन्द्र. संपा. वा. के. लेले, प्रथम, वाराणसी, मोतीलाल बनारसीदास, १९६७, पृ. १७.

४७. क्षेमेन्द्रलघुकाव्यसङ्ग्रहः, संपा. आर्येन्द्रशर्मा व इतर, प्रथम, हैदराबाद, उस्मानिया विश्वविद्यालय संस्कृत परिषद, १९६१, पृ. २०-२१५.

४८. वरील संदर्भ ३३. पृ. १९५.

४९. वरील संदर्भ २८, पृ. १७०.

५०. चित्तविनोदिनी अथवा पद्यकुसुममाला, रुद्रनारायण घोष वर्मा, संशो. बद्रीनाथ शास्त्री, प्रथम, प्रयाग, आर्. एन्. घोष, संवत् १९९५ (सन १९३८), पृ. १८५.

५१. वरील संदर्भ ९, पृ. ५२

५२. वरील संदर्भ ७, पृ. २१२-१३.

५३. वरील संदर्भ ३०, प्रस्तावना बारा.

५४. कथासरित्सागर खंड ५, प्रस्तावना, टिप्पणी व परिशिष्टे दुर्गा भागवत, भाषांतर ह. अ. भावे, पहिली, पुणे, वरदा बुक्स, १९८०, निवेदन पृ.१३.

५५. वरील संदर्भ ७, पृ. ८४.

५६. भारतीय संस्कृतिकोश, प्रथम खंड, संपा. महादेवशास्त्री जोशी व इतर, प्रथम, पुणे, भारतीय संस्कृतिकोश मंडळ, १९६२, पृ. १६३.

५७. वरील संदर्भ ४, पृ. ५१.

५८. तत्रैव, पृ. ५३.

५९. तत्रैव.

६०. वरील संदर्भ १, पृ. ७३-७४.

६१. दलित साहित्याचे सौंदर्यशास्त्र, शरणकुमार लिंबाळे, आर्वी, कांता प्रकाशन, १७ ऑगस्ट १९९६, पृ. ३५-३६.

**परिशिष्ट १. प्राचीन काव्यांत वर्णिलेले विषय**

प्राचीन काव्यांत वर्णिलेल्या विषयांची विविधता व विपुलता खालील तपशिलावरून स्पष्ट होईल.

अनेक जन्मांच्या हकिगती, अर्थव्यवस्था, आंधळे, आचारविचार, आर्थिक परिस्थिती, ऋणको, एकत्र कुटुंब पद्धती, कदर्य, कलाकौशल्ये, कामधेनू, कामवासना, कामवासनेचा आनंद, कायस्थचरित्र, कार्तिकेयाची स्तुती, काश्मीरातील पर्वतश्रेणी व सृष्टिसौंदर्य, काश्मीरचे प्रादेशिक

विभाग, कासव, कुंटीण, कुरबुरी-तक्रारी, कुल, कुलस्त्रिया, केरळातील निरनिराळ्या नद्या, कोळी (जमात), कौटुंबिक जीवन, खाणे-पिणे, खेडीपाडी, खोटा पुरावा देणारा कावळा, गणक, गतभर्तृका, गरोदर स्त्रिया, गवळी, गायन, गावे (खेडी), गुरुशिष्यसंबंध, गुरू, गृहिणी, गौडीय विद्यार्थी, गौळण, ग्रामीण जनतेचे कष्टभरे पण आनंदी जीवन, ग्रामीण जीवनाचे व निसर्गाचे विविध पैलू, ग्रामीण स्त्रीपुरुषांचे विचार, ग्रामीण स्त्रीपुरुषांच्या भावना, घरफोडीचे शास्त्र/तंत्र, चौर्यकर्म, छात्र, जंगलातील जीवन, जाति-जमाती, जादूतील रोमांचकारकता (केशिन्.-७००, मलयसुंदरी कादंबरीत हा विषय वर्णित यातील अनेक भाग साररूपाने ९०० पासून उपलब्ध होता, CHI:1975:192), जुगाऱ्यांचा अड्डा, जैन साधू, जैनांचा जागतिक इतिहास, ज्योतिषी, झाडेझुडपे, ठग, डाकू, तपश्चर्या, तीर्थक्षेत्रे, तेलाची कढई (तेलकटाहगाथा, श्रीलंका, ९८ श्लोकांचे भावकाव्य, कर्तृनाम व रचनाकाल अप्राप्य), त्रिवेंद्रम ते कोट्टकल प्रवास, दंभ, दरबारी मंडळी, दळणकांडण, दान, दारिद्य (हृदयस्पर्शी), दीर-भावजयांचे संबंध, दुर्जय, दोन मातांची कहाणी, धन, धनको, धर्म, धर्मनिरपेक्ष विषय, धर्मश्रद्धा व धर्मपंथ, धान्य दळणारे श्रमिक, धातुशुद्धीकरणाच्या पद्धती, नदीविहार, नद्या, नांगरणी, नागरी जीवन, नातेवाईक, नानाधूर्त, नायिकाप्रकार, निसर्गवर्णन, नीती, नृत्ये, नोकराचा लोभ, नोकरांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या, न्हावी, परमार (अवंतीचा) राजा व कर्नाटकातील राजकन्या यांच्या विवाहाचा सोहळा, पर्वतीय दृश्ये, पशुपक्षी, पाणक्ये, पीकपाणी, पुनर्जन्म, पृथ्वी ते स्वर्ग या मार्गाचे व मार्गावरील देशांचे वर्णन, पतीला प्रवासामधून परावृत्त करण्याचा पत्नीचा प्रयत्न, प्रवासी नवरा, प्रेमाचे विविध पैलू, फसवणूक करणारे, फळे-फुले, बदमाश, बहिरे, बागबगीचे, बुडतेगिरी, बुद्धीची पहिली पहाट, बुवाबाजी, बैल, बौद्ध मंदिरे, भक्ती, भिस्ती, भिक्षुक, भूगोल, भूमिदान (अग्रहार), भोंदूगिरी, भौगोलिक स्थिती, भ्रष्ट अधिकारी, भ्रष्ट राज्यशासन, मंत्री, मंदिरे, मठ-दैशिक, मथुरा ते गोकुळ प्रवास, मदहेतू, मदिरापान, मनुष्यस्वभाव, माकड, मार्गवर्णन, मालकाचा गर्व, मालकांची कर्तव्ये व त्यांच्या जबाबदाऱ्या, मूर्ख, यशोधर चरित्र, युद्ध, राजनीती, राजमहाल, राजदरबार, राजवंशप्रशस्ती, राजाची कर्तव्ये, राजांचे औदार्य, राजेरजवाडे, राज्यशासन, रामेश्वर ते गुणपूर प्रवास, रीतिरिवाज, रूप, लहान मुलांबद्दलचे प्रेम, लुटारू, लोकजीवन, लोकश्रद्धा, लोभ, वक्र स्वभावाच्या माणसांचे अधिकारारोहण, वर्णभेद, वर्णव्यवस्था, वस्त्रप्रावरणे, वायू (वारा), विंध्यपर्वत, विट, विणकाम, विद्यार्थिधर्म, विद्वान, विभिन्न देश, विभिन्न व्यवसाय, विरह, विवाह, विष्णूचे दशावतार, वीरता, वृद्धभार्या, वेगवेगळे व्यावसायिक, वेश्याव्यवसाय, वैद्य, व्यभिचार, व्यसने, व्यापारी देवघेव, व्यासांची स्तुती, शहरवासी, शहरे, शिकारी, शिक्षकाचा आचारधर्म, शिक्षण, शेतकऱ्याचे जीवन, शेतातील कामे, श्रद्धा, श्रमणिका, श्रुत (ज्ञान), षड्ऋतू, संकेतस्थल, संगीत, संतचरित्र, संन्यासी, सकलकला, समकालीन जीवन, समकालीन युद्धघटना, समाजधर्म, समाजाचे थर, सागरी प्रवास व त्यातील संकटे, साधूवैरागी, सामाजिक टीका, सामाजिक दुष्ट रूढी, सामाजिक स्थिती, सासरा, सुवर्णकारोत्पत्ती, सूर्यास्त, सूर्योदय, सेव्यसेवक संबंध व त्यांतील ताणतणाव, सैन्याचे कूच, स्त्रियांची गाऱ्हाणी, स्त्रियांची सुखदुःखे, स्मशान, स्वयंपाकपाणी, हत्तीचे वजन करण्याची कथा, हिंदूची दिनचर्या.

• • •

(मुखपृष्ठ २ वरून)

**संपादकीय**

**इंटरनेट क्रांति**

आहेत. दुर्दैवाने महाविद्यालयीन परिसरात उपलब्ध असलेल्या सोईचा फायदा अजून तरी शिक्षकांनी घेतलेला दिसत नाही. या क्रांतीची झळ जोपर्यंत शिक्षकांना पोहोचत नाही तोपर्यंत तिचा प्रसार विद्यार्थ्यांमध्ये होणार नाही. निदान विद्याप्रसारक मंडळाचे शिक्षक, महाविद्यालये आणि शाळा यांनी या संधीचा अधिकाधिक उपयोग करून घेणे आवश्यक आहे.

विद्याप्रसारक मंडळाच्या वेबसाईट (संकेतस्थळ) चा पत्ता http://www.vpmthane.com असा आहे.

• • •

# वैदिक आणि इन्डोइराणी संस्कृतींचे भूसांस्कृतिक अनुबंध

डॉ. प्र. वि. पाठक

## पार्श्वभूमी

प्राचीन काळी पारपत्रे (passport) नव्हती. प्रवेश पत्रे (Visa) घ्यावी लागत नसत. मुलाखतींमध्ये उत्तीर्ण व्हावे लागत नसे. लोक प्रवासाची तयारी करून बाहेर पडत. त्यांचे बहुविध उद्देश असत. व्यापार-उदीम, तीर्थयात्रा, लढाया, लुटालूट, धर्ममतप्रसार तर कधी निव्वळ भ्रमंती एवढाच उद्देश असे. मार्गात येणारे अनेक अडथळे, चोरचिलटांचे भय इत्यादींवर मात करून ते आपली भ्रमंतीची पिपासा पूर्ण करीत. ही भ्रमंती कोण्या वर्गापुरती मर्यादित नव्हती. लहानमोठे समुदाय ही भ्रमंती करीत. भ्रमंतीस निघालेले लोक परत येतील याची शाश्वती नसे. ते जेथे आपले बस्तान बसवीत तेथे मिसळून जात. सांस्कृतिक दृष्टया जर स्थानिक समाजापेक्षा वरचढ असतील, तर स्वतःचे वैशिष्ठ्य स्थानिकांवर उमटवीत. प्राचीन काळच्या उत्खनित पुरातत्वीय अवशेषांमधून ह्या स्थलांतर आणि भ्रमंतीचे पुरावे मिळतात. भ्रमंती करणाऱ्या व्यक्ती अथवा समूहांनी आपल्या उत्पादनतंत्राबरोबरच आपली संस्कृती, मिथ्यकथा, कला आणि अनेकदा कलाकारही नेलेले असत. प्रस्तुत लेखात वैदिक आणि समकालीन इन्डोइराणी संस्कृतींचे प्राचीन काळातील सांस्कृतिक आदानप्रदान मांडले आहे.

## पूर्वाभ्यास

मध्य एशिया आणि भारतीय उपखंडाचे सांस्कृतिक आदानप्रदान यापूर्वी काही अभ्यासकांनी शोधले आहे. (Gajjar 1971, Guha 1971, Ratnagar 1981) हे आदानप्रदान सिंधुसंस्कृतिपूर्व काळापासून सुरू होते. भारतीय बनावटीच्या सिंधुसंस्कृति काळातील मुद्रा "उर" येथे सापडल्या. (Gadd 1932) मॅके यांनी सच्छिद्र मृत्तिकापात्रांचे अस्तित्व किश येथे असल्याचे दाखविले आहे. (Mackay 1979) गज्जर यांनी टेल अस्मार या ठिकाणी सापडलेल्या इ. पू. २८०० च्या आसपासच्या काळातील एका मुद्रेची भारतीय बनावट आणि तीवरील हत्ती, गेंडा, मगर इ. प्राण्यांच्या सिंधुमुद्रांवरील साधर्म्याची चर्चा केली आहे.

## सांस्कृतिक प्रतीकाचे आदानप्रदान : मुद्रांवरील प्रतीक

समाजमानसात कुठल्यातरी मोठ्या घटनेला अथवा स्थित्यंतराला धरून प्रतीकांची निर्मिती होते. त्याचे आविष्कार दैनंदिन वापराच्या मातीच्या भांड्यांवर चित्रे, मुद्रा, धातूंच्या मूर्ती इत्यादी अनेक माध्यमांतून होते. भारतीय संस्कृतीतील वशिंड असलेल्या ब्राह्मी बळूचे प्रतीक प्राचीन काळी सर्वदूर पसरले होते. गज्जर यांनी दाखविल्या प्रमाणे कुल्ली (बलुचिस्तान), मुंडिगाक, (अफगाणिस्थान) येथे मिळालेल्या सिंधुसंस्कृतिपूर्व वशिंडाच्या बळूंच्या चित्रांचा प्रवास मध्यपूर्वेतील सुसापर्यंत झाला होता. (Gajjar 1971:9) सुमेर (आजचा इराक) आणि सिंधु-संस्कृति यांच्यातील प्रतिकाचे आदानप्रदान या दोन्ही संस्कृतीच्या उत्खननात मिळालेल्या मुद्रांवर मिळते. चक्र प्रतीक, गिलगामेश मिथ्य, त्रिपर्ण प्रतीके ही दोन्ही ठिकाणच्या मुद्रांवर आरेखित केलेली दिसतात. (During Casper 1971). भौगोलिक दृष्ट्या हजारो कि.मी. अंतर असलेल्या ह्या संस्कृतींमधील अनुबंध शोधण्यासाठी ह्या मुद्रांचा फार उपयोग होतो.

मुद्रांचा विचार करता एक महत्वाचा फरक दोन्ही ठिकाणच्या मुद्रांमध्ये दिसतो. सिंधुमुद्रा सर्वाधिक आयताकृति आहेत. त्यावर लिपी अथवा प्राण्यांची चित्रे कोरली आहेत. दंडगोलाकृती आकाराची एक मुद्रा कालीबंगन येथे मिळाली आहे. बटनाच्या आकाराच्या गोल आणि मागे कडी असलेल्या मुद्रा बोटांवर मोजता येतील इतक्याच लोथल येथे मिळाल्या आहेत. या दोन प्रकारच्या मुद्रांवरून त्या वापरणाऱ्या व्यक्तींचा मध्यपूर्वेतील देशांशी संबंध लक्षात येतो.

मध्यपूर्वेतील उत्खननात दंडगोलाकृती मुद्रा प्राचुर्याने सापडल्या (Teissier 1984). मुद्रांचे ओल्या मातीवर उमटविलेले बरेच ठसेही मिळाले आहेत. ह्या मुद्रांचा उपयोग व्यापार करतांना मालवाहतुकीच्या वेळी मोहर उमटविण्यासाठी होत असे. मध्यपूर्वेतील मुद्रांवर मानवी आकृत्या आणि मिथ्यकथांचे चित्रण अधिक प्रमाणात केलेले आढळते. मानवेतर प्राणी आरेखनांचे प्रमाण सिंधु मुद्रांपेक्षा कमी आहे. मानवी आकृतींवर इराणी प्रभाव ठळकपणे जाणवतो.

दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे वैदिक वाङ्मयात येणारी वृत्रवधकथा मध्यपूर्वेतील अनेक दंडगोलाकृती मुद्रा आणि भांड्यांवरही कोरली आहेत. ऋग्वेदात वृत्राचे वर्णन महाभुजङ्अहि केले आहे. उत्तर वैदिक काळात, ब्राह्मण ग्रंथामध्ये त्याला मानवी स्वरूप प्राप्त झालेले दिसते. वस्तुतः वृत्र हा भूपृष्ठ चालनामुळे निर्माण झालेला मातीचा भुसभुशीत बंधारा होता असे प्रस्तुत लेखकाने दाखविले आहे.

### इराणी आणि मध्यपूर्वेतील वृत्रवध प्रतिके

वृत्रवधकथेची दोन रूपांतरे, महाभुजङ् आणि सर्वमानव ब्राह्मण ग्रंथामध्ये वर्णन केली आहेत. ती दोन्ही मध्यपूर्वेत तसेच मध्य एशिया येथील उत्खननात मिळाली आहेत. लोथल येथे सापडलेल्या गोल मुद्रेवर (आ. क्र. १) वृत्रवध कथेचे मिथ्य कोरले आहे. (Joshi and



Dragon seal from Lothal Gujrat depicting the Vrtra myth (Joshi and Parpola 1987 : 268 L 123)

Parpola 1987:268) त्यावर आपले शरीर पसरलेल्या भुजङमध्ये असून दोन्ही बाजूस त्यावर हल्ला करणारे मेंढे दाखविले आहेत. हे मेंढे इन्द्र आणि अग्निचे प्रतीक आहेत.

मेसोपोटामिया (किंवा आताच्या इराक) मध्ये मिळालेल्या एका स्टीअटाईट प्रकारच्या दगडापासून बनविलेल्या दगडाच्या वाडग्यावर कोरलेली चित्रे वृत्रवधकथेच्या आधारेच उलगडता येतात (आ. क्र. २) मेलोवान (Mallowan 1965 : 22-23) यांच्या मतानुसार



Fig 2. Steatite bowl from Mesopotamia with dragon myth engraved, dated 2700-2500 BC (Malowan 1965 : 22-23

ह्या वाडग्यांचा काळ इ.स.पूर्व ३००० पर्यंत जातो. त्यांनी उलगडल्याप्रमाणे पावसाचा देव (वैदिक इंद्र) आपल्या हाताने नद्यांचे मार्ग बदलतांना दाखविला आहे. त्याच्या समोर वशिंड असलेला ब्राह्मी वळू आहे. त्याच वाडग्याच्या दुसऱ्या बाजूला तो देव आपल्या हातांनी दोन भुजङ्गा मारीत असल्याचे दाखविले आहे. मेलोवान यांचे स्पष्टीकरण ऋग्वेदातील वृत्रवधकथेशी तंतोतंत जुळते. तसेच त्या चित्रात काढलेला ब्राह्मी वळू हा ऋग्वेदातील इंद्राचे प्रतीक आहे. दुसरे म्हणजे चित्रावर भारतीय बनावटीची छाप आहे. तिसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे ह्या प्रकारच्या स्टिअटाईट दगड अफगाणिस्थानात उपलब्ध असून त्याच प्रकारची वाडगी इतरत्र दोन ठिकाणी सापडली आहेत. ह्या सर्वांचा विचार करता वाडग्याचा दगड आणि त्यावर काढलेली वृत्रवधकथा ह्यांचा उगम भारतीय उपखंडात आहे. वाडग्याचा काळ इ.पू.३००० धरला असल्याने वृत्रवधकथा आणि तदनुषंगिक ऋग्वेदातील संहिता भाग ह्यांचा काळ सिंधुपूर्वीचा ठरतो. म्हणजे वैदिक संस्कृती सिंधुपूर्वकाळातही अस्तित्वात होती.

भुजङ्ग मिथ्याचे दुसऱ्याही प्रकारचे चित्रण काही मुद्रांवर आढळते. इंद्र हातात वज्र घेऊन आखूड हातपाय असलेल्या कधी मानवी तोंड तर कधी तोंडावर मुकुट घातलेल्या भुजङ्गाचा वध करतानाच्या अनेक मुद्रा मध्यपूर्वेत मिळाल्या आहेत. अशाच एका मुद्रेवर चंद्र सूर्य कोरले आहेत. (आ. क्र. ३) (Teissier 1984:169). ऋग्वेदातही इंद्राने वृत्रवध करून सूर्याला मुक्त केल्याची ऋचा आली आहे. (ऋ ६.३०.५). ह्या मुद्रेत इन्द्राच्या हातात त्रिशूळासारखे अणकुचीदार हत्यार दाखविले आहे. ऋग्वेदातही वज्राचे वर्णन सहस्त्रधारांचे (ऋ १.८५.९) असलेले असे केले आहे.

भुजङ्ग मिथ्याचे चित्रण करणाऱ्या कितीतरी मुद्रांवर कोरलेली श्वानचित्रे इराणी संस्कृतीचा प्रभाव दाखवितात. त्यावरून वैदिक आणि इन्डोइराणी संस्कृतिसंगमाचे अनुबंध आणि एकत्र मिळून मध्यपूर्वेतील संस्कृतीवर झालेल्या प्रभावाची माहिती मिळते.

एक भुजङ्ग मुद्रा कोटदिजी येथील मृत्तिका पात्रावर मिळाली आहे. हे मृत्तिकापात्र कराचीच्या वस्तुसंग्रहालयात आहे. कोटदिजी येथे सिंधुपूर्व तसेच सिंधुसंस्कृतिकालीन अवशेष मिळाले आहेत. प्रस्तुत मृत्तिकापात्र त्याची घडण पाहता सिंधुपूर्व काळातील असून ती सर्पाकृती असुराची असल्याचे प्रतिपादन एफ. ए. खान यांनी केले आहे. याचा अर्थ वैदिक आणि ब्राह्मण काळात भारतीय संस्कृतीत प्रचारात असलेले आणि महत्त्व पावलेले वृत्रवधकथेचे मिथ्य भारतीय उपखंडात सिंधुपूर्व काळातही प्रचलित होते.



Fig 3. Deity holding fork running over the back of a dragon (Teisier 1984 : 169)




Fig 4. The Hittite weather god fights serpent (Branstone 1974 : 117)

वृत्रवधकथेचा प्रचार अनेक शतके होत होता. अगदी इ. स. ११ व्या शतकापर्यंत सुद्धा हे मिथ्य कोरले जात असे. हिटाईट पर्जन्य देवता महाकाय भुजङ्गाला मारत असल्याचे एक शिल्प ह्या मिथ्याचा पाश्चात्य देशातील प्रसार दाखविते (आ. क्र. ४) (Branstone 1957 : 117) युरोपात ख्रिश्चन धर्ममताने आपले बस्तान बसविल्या- नंतरही जनमानसातून ह्या मिथ्याचा लोप झाला नाही. गोसफॉर्थ येथे मिळालेल्या दगडी क्रूसाच्या दांड्यावरही भूजङ् मिथ्याचे चित्रण आढळते ब्रान्स्टोन यांनी या चित्रांचे विश्लेषण करतांना इन्द्राचा निर्देश केला आहे. तसेच युरोपातील थुनर देवाच्या मिथ्यकथेचा निर्देश करून त्याच्या आकृतीचे साम्य हिन्दू, हिटाइट आणि उत्तर युरोपातील नॉर्स देवाशी दाखविले आहे. (Branstone 1974:118) त्याच्या हातात महाकाय हातोडा असून त्याच्यासह दुसरी देवताही तेथे आहे. देवता द्वयांनी-इंद्र-अग्नि, इंद्र-सोम इत्यादी, वृत्रवध केल्याचे निर्देश ऋग्वेदात आले आहेत. ऋ ८.४०.८, ८.१००.१२, ९.६१.२० इत्यादी. पाश्चात्य देशांमध्ये इ.स. च्या ९व्या शतकापर्यंत म्हणजे ख्रिश्चन धर्मांचा प्रसार सुरू झाल्यावरही कित्येक शतके ह्या कथेचा धार्मिक प्रभाव टिकून होता. त्याचा हा क्रूस उघड पुरावा आहे. इंग्लंड मध्ये सॅक्सन जनसमूहात ही कथा प्रचलित होती. आ. क्र. ५.



Fig 5. Thunor fighting the world serpent - Scene from the upper part of Gosforth Cross. (Branstonr 1974 : 118)

ऋग्वेदातील दासांचा मागोवा

प्राचीन भारतीय संस्कृतीच्या अभ्यासकाला एका महत्वाच्या प्रश्नाला सामोरे जाण्याशिवाय पर्याय नसतो. तो म्हणजे भारतावरील आर्यांचे आक्रमण आणि आर्य-

अनार्य भेद हा तो प्रश्न आहे. प्रस्तुत लेखकाला आर्यांच्या भारतावरील आक्रमणाचा सिद्धांत मान्य नाही. त्यावर त्याचे संशोधन इतरत्र प्रसिद्ध झाले आहे. (Pathak 1994:108-120).

आर्यांचे शत्रू दास-दस्यु हे मूळचे कुठचे राहणारे होते हा मूलभूत प्रश्न सुटल्यास आर्यांनी मध्य आशियातून मोठ्या प्रमाणावर स्थलांतर करून भारतात असलेल्या दासांचा पराभव केला हे आर्यआक्रमणाच्या सिद्धांताच्या मूळाशी असलेले गृहीत तपासून पाहता येईल.

''असुर'' हा आर्यांच्या विरोधात असणारा वेगळा जनसमूह होता याला ऋग्वेदात पुरावा नाही. कारण ऋग्वेदातच वरुण, इंद्र इत्यादि तथाकथित आर्यांच्या देवांना सर्व श्रेष्ठ देव म्हणून ''असुर'' या नावाने बोलावले आहे. तसेच ऋग्वेदातील ''महत् देवानामसुरत्वमेकम्'' (ऋ ३.५५.१-२२) हे पालुपदही प्रसिद्ध आहे. देवापेक्षा असुर वेगळे होते हे ही गृहीत चुकीचे आहे. अथर्ववेदात विषावर उतारा असलेल्या वनस्पतीला असुरांची दुहिता आणि देवांची बहीण म्हटले आहे. त्यावरून हे दोन जनसमूह एकमेकांशी संबंधित होते असे दिसते. पुराणांमध्येही देव आणि असुर ही प्रजापतीची मुले आणि सावत्र भाऊ असल्याचे दिले आहे.

एतद्देशीयांपेक्षा वेगळा मानता येईल असा जनसमूह दास किंवा दस्यूंचा होता. ऋग्वेदात आर्यांचे शत्रू दास-दस्यू असल्याचे दिसेल. (ऋ १.१०३.३, ३.३४.९, ७.५.६ इत्यादि). वर दिलेल्या ऋचांवरून आपल्याला माहिती मिळते-

अ) दास आणि दस्यू यात फरक नाही. दोन्ही शब्द एकच जनसमूहवाचक आहेत.

आ) दासांच्या निवासस्थानांची नावे ''पुर'' आहेत.

इ) इन्द्राने आणि त्याच्या अनुयायांनी दास/दस्यूंना त्यांच्या पुरांमधुन हुसकावून लावले. पुरांचा नाश केला.

ई) आर्यांची संस्कृती आणि धार्मिक विचार दासांपेक्षा वेगळे होते.

ऋग्वेदातील काही ऋचांवरून असेही दिसते की, काही दासांनी आर्यांबरोबर सख्य केले होते. (ऋ ६.३३.३, ६.६०.६, १०.३४.३ इत्यादि). विशेष म्हणजे या ऋचांमध्ये आर्यांच्या काही आर्य आणि दास शत्रूंचा उल्लेख त्याच ऋचांमधून आला आहे.

## दासांची पुरे कोणती ?

आर्यांनी आणि इन्द्राने दासांची पुरे नष्ट केली. त्यावरून इन्द्राला पुरंदर ही पदवी मिळाली. हे पाहता दासांची अनेक पुरे - ९९,९९९ इत्यादी वास्तवात होती हे स्वीकारायला पाहिजे. आर्यांनी आक्रमण करून सिंधुसंस्कृतीचा नाश केला या सिद्धांताचा पाठपुरावा करणाऱ्यांनी इन्द्राने नष्ट केलेली पुरे म्हणजे सिंधुसंस्कृतीची नगरे-मोहंजोदारो-हरप्पा ही होती असे प्रतिपादन केले आहे. (देशमुख १९६६) पण ही वस्तुस्थिती आहे काय ?

वैदिक वाङ्मयात दासांच्या पुरांविषयी आलेल्या अनेक संदर्भांचा परामर्श घेऊन पुरांच्या स्वरूपाविषयी जर्मन संशोधक विल्हेम राऊ यांनी खालील निष्कर्ष काढले आहेत.

अ) दासांच्या पुरांना तटबंदी नव्हती.
(सिंधुपुरांना तटबंदी होती)

आ) त्यात विटांचे बांधकाम, रस्ते इत्यादी नव्हते.
(सिंधु शहरांमध्ये विटांचे बांधकाम, आखून दिलेले रस्ते होते.)

इ) ते मातीच्या ढिगाऱ्यांसारखे दगडमातीचे, तात्पुरते शाकारल्यासारखे होते.
(सिंधु शहरांचे बांधकाम पक्क्या स्वरूपाचे होते.)

ई) पुरांचे वर्णन ''आयसी पुरः'' - तांब्याची पुरे असे केले आहे.
(सिंधु शहरांना हे वर्णन लागू पडत नाही.)

उ) ते एकात एक कंकणाकृती-समकेंद्री (Concentric) होते.
(सिंधु शहरांना हे वर्णन लागू पडत नाही.)

(कंसातील सिंधु शहरांशी तुलना प्रस्तुत लेखकाची आहे.)

प्रस्तुत लेखक राऊ यांच्या, पुरे एकात एक समकेंद्री होती या विधानाशी सहमत नाही.

राऊ यांनी पुरे एकात एक समकेंद्री होती या विधानाच्या पुष्ट्यर्थ संदर्भ वेद संहिता आणि ब्राह्मण ग्रंथांमधून दिले आहेत. ते मुळातून तपासले असता तसा उल्लेख मिळाला नाही. त्यांचे वर्णन शतभुजी असे केले आहे. त्याचा अर्थ समकेंद्री असा मुळीच होत नाही. दुसरा आधार राऊ देतात तो म्हणजे अग्नी एकाच वेळी अनेक पुरांमध्ये वसती करत होता. त्यामुळे ते समकेंद्री होण्याची शक्यता नाहीच कारण अग्नी एकाच वेळी अनेक ठिकाणी असू शकतो. त्यावरूनही राऊ यांच्या विधानाला पुष्टी मिळत नाही. मात्र शतपथ ब्राह्मणात त्यांचे वर्णन "अश्म पुरम्" दगडांची पुरे असे आले आहे. (श. ब्रा. ३.१.३.११)

### सिस्तान प्रांतात दासांची पुरे

प्रस्तुत लेखकाला सिस्तान या अफगाणिस्थानातील प्रदेशात असणारे दगडमातीचे ढिगारे म्हणजे दासांची पुरे आहेत असे प्रतिपादन करायचे आहे. सिस्तान प्रांतात पुरातत्त्वीय अवशेष शोधण्यास गेले असता फेअरसर्व्हिस यांना नैसर्गिक रीत्या वाऱ्याच्या वेगाने वाहण्यामुळे तयार झालेल्या टेकड्या दिसल्या. त्यांची तुलना चंबळच्या खोऱ्यात असणाऱ्या टेकाडांशी करता येईल. ह्या टेकाडांच्या आडोशाने चंबळचे डाकू पोलिसांचा सामना करत हातावर तुरी देऊन पळून जात. तोच प्रकार सिस्तान प्रांतातही इतिहासपूर्व काळापासून घडत असावा असे फेअरसर्व्हिसही नमूद करतात. रूद-इ-बियाबान या आता सुकलेल्या नदीच्या परिसरात त्यांना पाण्याचे पाट आणि हजारो वर्षे जुन्या वस्त्यांचे अवशेष ह्या दगडमातीच्या ढिगाऱ्यांखाली दिसून आलेत. फेअरसर्व्हिस यांनी मुळात केलेले वर्णन खाली दिले आहे.

In the other pre-historic sites a checker board like appearance has resulted from the accumulation of habitation debris in the rooms of the villages. With the wind erosion of the mudbrick walls of the house, the debris within sank in place, making interiors which the walls once surrounded. Broken pottery, like the slag, frequently has acted to preserve the surface beneath from the erosion, so that as the surrounding soil was swept away by the fierce and constant winds, the sherd or slag capped areas rose out of landscape like towers. Indeed shortly after the time of Christ, the then rulers of Siestan used the pre-historic "towers" as the foundation for a limes or protective line across the southern delta. Wonderful is the work of wind in such situation, for when we stumbled on to a pre-historic Cementary in a veritable maze of bults, we discovered that some of the graves were above our heads.

**(Fairservis 1971:119)**

वर दिलेल्या वर्णनावरून दिसते की, सिस्तान प्रांतातील ते ढिगारे दासांच्या पुरांच्या वर्णनाशी जुळतात.

१) ते बहुसंख्येने आहेत ज्यामुळे त्यांचे वर्णन ९९,९९९ असे करता येईल.

२) ते दगडमातीच्या ढिगाऱ्यांचे बनले आहेत.

३) वाऱ्याच्या गतीने त्यांची झीज होऊन ते कंगोरेरहित गोलाकृती झाले आहेत.

४) त्यावर तांब्याचा धातू ओततांना गळलेल्या मळीचे तांबूस रंगाचे थर खालच्या दगडमातीच्या थरांना घट्ट पकडून ठेवताना दिसतात.

५) इतिहासकाळात ज्याप्रमाणे त्यांचा चकमकींमध्ये आडोशासाठी उपयोग झाला तसाच तो इतिहासपूर्व काळात ही झाला असावा.

याशिवाय अवेस्ता या पारशी लोकांच्या धर्मग्रंथात दासांचा प्रदेश म्हणून दस्युस्थान असे उल्लेख आहेत. Encyclopedia Iranica Vol IV पृ ५८१ वर आलेल्या मजकुरां

प्रमाणे ''दहाए (अवेस्तात)-दास (सं) याचा अर्थ माणूस असा होतो. हा एक जनसमूहही होता असे उल्लेख अलेक्झांडरच्या वेळच्या लिखाणात आढळतात. त्याच्या निवासस्थानाचे नाव दहन-ये-गोलामान असे दिले असून सिस्तान मधील झाबोल पासून ते ३० कि. मी. अंतरावर आहे. हा भाग हेलमंड नदीच्या खोऱ्यात येतो आणि अफगाणिस्थानच्या सरहद्दीला लागून आहे.

इराणी विश्वकोषातील मजकूर ही दास/दस्युंच्या प्रदेशाचे अस्तित्व अफगाणिस्थान सरहद्दीलगतच्या प्रदेशातच असल्याचे दर्शवितो.

वर दिलेले पुरावे पाहता आर्यांशी ज्या दास/दस्यूंचे संघर्ष झाले ते दास जनसमूह हे मूलतः अफगाणिस्थान मधील सिस्तान प्रांताचे रहिवासी होते. त्यांचे धार्मिक-आचारविचार वैदिक आर्यांपेक्षा वेगळे होते. दासांची जी पुरे इन्द्राने नष्ट केली ते ह्या सिस्तान प्रांतात नैसर्गिक वातावरणामुळे तयार झालेले ढिगारे होते. त्यामुळे सिंधु संस्कृती ही दासांची संस्कृति होती या निष्कर्षाला धक्का पोहचतो. दास हे भारतातील रहिवासी नव्हते हे पाहता आर्यआक्रमणाचा सिद्धांत पुन्हा तपासला पाहिजे.

## इन्डो-इराणी जनसमूहाचे मूळ

वैदिक आणि इन्डो-इराणी किंवा आता पारशी जनसमूहांचे मूळ एकच होते याबाबत दुमत असू नये. एकेकाळी वैदिक आर्य आणि इन्डो-इराणी लोक असुर या महान देवतेचे पूजक होते. पुराणांमध्ये दोघांनीही मिळून केलेल्या समुद्रमंथनाची गोष्टही येते. अथर्ववेदातही त्यांच्या सहअस्तित्वाचा उल्लेख पूर्वी दिला आहे. तसेच पिप्पळी नावाची वनस्पती देव आणि असुर दोघेही करीत असल्याचा उल्लेख अथर्व वेदात ४.१०९.३ मध्ये आला आहे. अथर्ववेदात इन्द्राने सरस्वती नदीच्या काठावर नांगर चालविल्याचा उल्लेख आहे.

देवा इमं मधुना संयुतं एवं सरस्वतामधि मणावचर्कृपुः ।
इन्द्र आसीत् सीरपतिः शतक्रतुः कीन्नाशा आसन् मरुत सुदानवः ॥ अ.वे.६.३०.१

शेतीचे मूलभूत काम नांगरणे आणि जमिनीची मशागत करणे आहे. वरील ऋचेत ''अचर्कृपुः'' असा शब्द आला आहे. त्याचा मूळ धातु ''चर्प्'' असा आहे. हा शब्द युरोपीय भाषा शास्त्राप्रमाणे गेर्स अथवा गेरो शब्दांशी साम्य दाखवितो. त्याचप्रमाणे ''हारी'' हा शब्द मध्यप्रदेशात वेळूचे टोक लावलेल्या नांगरासाठी वापरला जातो. तो तसाच्या तसा इन्डो-युरोपीय शब्द समूहात वापरला जातो. त्याचा अर्थ वेळू अथवा बाम्बू आहे. संस्कृत मध्ये प्रचलित असलेला नड/नल हा शब्द इराणी अथवा हिटाईट भाषांमध्ये तसाच्या तसाच वापरला गेला आहे. तसेच तो हंगेरीच्या दक्षिण भागातील सर्म्याशियन भाषेतही बाम्बू याच अर्थी वापरला जातो. ह्या शेतीसंबंधित शब्दसमूहांवरून असे दिसते की त्यांचा संबंध द्रविड भाषेतील शब्दांशी जोडला जाऊ शकत नाही. श्री. वोजतिल्ला यांच्या मताप्रमाणे अणकुचीदार टोकाच्या नांगराचा निर्देश करणारे हे शब्द संस्कृतोद्भव आहेत. ऋग्वेदात या प्रकारच्या शेतीचा उल्लेख आला आहे-''यर्व वृकेण वपंता-'' (ऋ १.११७.२१). ऋग्वेद काळात जमीन खोदून बी पेरण्याची नांगरणीपूर्व परंपराही पहायला मिळते - खनित्रैः खनितम् (ऋ १.१७९.६).

वोजतिल्ला (Wojtilla 1986 : 27-31) यांनी आपल्या लेखात लॅटिन भाषेतील अरुम आणि वैदिक अरित्र याचे साम्य दाखविले आहे. या शब्दांचा अर्थ वल्हे असा होतो. त्याचे धातू मुळ - ''अर'' मात्र युरोपीय भाषांमध्ये मिळत नाही. युरोपातील नांगरणीचा सर्वात प्राचीन पुरावा इ.स.पूर्व १६०० च्या आसपास ज्यूटलँड मध्ये मिळाला आहे. याउलट भारतात कालीबंगन येथे इ.स.च्या तिसऱ्या सहस्रकातील पूर्ण नांगरलेले शेतच मिळाले. त्याचा अर्थ सिंधुसंस्कृतीचा समाज कमीत कमी हजार वर्षे पूर्वी नांगरणीच्या प्रगत शेतीतंत्राशी परिचित होता.

कृषिक्षेत्राशी संबंधित पुरातत्वीय पुराव्यांच्या आधारे म्हणता येते की, देवपूजक वैदिक आणि असुर पूजक इन्डो इराणीय जनसमूहाचे विभाजन हे इ.स. पूर्व तिसऱ्या शतका

दरम्यान झाले. ह्या दोन्ही जनसमूहांच्या प्राचीन वाङ्मयात असलेली सरस्वती नदी याच दरम्यान सुकू लागली. इन्डो इराणी आणि वैदिक जनसमूहांची मूळ भूमी सरस्वतीचे पात्र हीच होती. ब्राह्मण ग्रंथातील पुराव्यानुसार वैदिक मतानुयायी गंगेच्या आणि पूर्वेच्या दिशेने आपल्या वस्त्या वाढवीत गेले तर इन्डो-इराणी जनसमूह स्थलांतर करीत इराणमध्ये स्थिरावला. सरस्वती नदीकाठी फार जास्त उत्खननाचे काम झालेले नाही. तेथे अधिक उत्खनन झाल्यास वैदिक आणि इन्डो-इराणी जनसमूहांच्या साहचर्य आणि निकट संबंधावर अधिक प्रकाश पडू शकेल.

**आभारप्रदर्शन**

प्रस्तुत संशोधनपर लेख के.आर.कामा प्राच्य विद्या संस्थेतर्फे केलेल्या संशोधन प्रकल्पाचा अंश आहे. लेखक के.आर.कामा प्राच्यविद्या संस्थेच्या संचालकांचा आभारी आहे. तसेच लेखकाचे मार्गदर्शक प्रा. सुरेश उपाध्याय संचालक, प्राच्यविद्या संस्था, भारतीय विद्या भवन, मुंबई यांनी केलेले मार्गदर्शन आणि प्रोत्साहन यासाठी त्यांचा ऋणी आहे.

**संदर्भ साहित्य**

**मराठी संदर्भ**

देशमुख प्र.रा. (१९६६) सिंधु संस्कृति, ऋग्वेद आणि हिन्दु संस्कृति प्राज्ञ पाठशाळा, वाई.

पाठक प्र. वि. (१९९३) सिंधु खोऱ्यातील भूपृष्ठचालन उत्पात आणि ऋग्वेदातील वृत्रवध कथेचा अन्वयार्थ, विदर्भ संशोधन मंडळ, वार्षिक क्र. ३५ पृ. ३६-६६.

Literature Cited

Branstone Brian, (1957) The Lost Gods of England

Thames & Hudson, London.

During Caspers E.C.I., (1971) "Some motifs as evidence for maritime Contact between Sumer and the Indus Valley," Persica Vol 5 Pp 101-118.

Fairsewis W.A. Jr., (1971). The roots of Ancient India : The archaeology of Early Indian Civilization Mac Millan, New York

Gadd C.J. (1932) "Seals of the Ancient Indian Style at Ur," Proc of British Academy Vol 18 Pp 8-22 Reproduced in Possehl (1979) Pp 115-122

Gajjar Iren N., (1971) Indian art and the west D. B. Taraporewala Sons and Co. Mumbai.

Guha A., (1971) Central Asia : Movement of Peoples and Ideas from time Pre-historic to Modern. Barnes and Noble Inc., New York.

Joshi J.P. & Parpola Asko, (1987) Corpus of Indus Seals and Inscriptions in India, Memorials of ASI-86 Delhi.

Mackay E.J.H., (1938) Further excavations at Mohenjodaro 2 Vols, Govt of India, New Delhi.

Mellowan M.E.L., (1965) Early Metsopotamia and Iran, Thances and Hudson, London.

Pathak P.V. (1994) Looking for the Aryans : A reappraisal, Purnatrayi Vol. XXI Pp 88-102.

Possehl G.L.Ed., (1979) Ancient Cities of the Indus, Vikas Publishing House, Mumbai.

Ratnagar Shireen, (1981) Encounters : The Westerly trade of the Harappa Civilization, Oxford Uni Press Mumbai.

Rau Wilhem (1976) "The meaning of Pur in the Vedic Literature," Wilhelm Fink Verlay, Munchen,

Tiessier Beatrice, (1984) Ancient Near Eastern Cylinder Seales, Uni. of California press, Berkley.

Wojtilla G.Y.(1986) "Notes on Indo-Aryan Terms for Ploughing and plough," J. Indo-European studies Vol. 14 No. 1-2-Pp 27-37.

• • •

# ''धर्मप्रसाराचे काही नमुने''

प्रो. डॉ. वसंत हरी वेडेकर

''देशाटन'', ''पंडितमैत्री'' व ''सभेत संचार'' केल्यामुळे होणाऱ्या फायद्यांबद्दल सुभाषितांमध्ये ऐकले होते. स्वतःच्या धर्माबद्दल विशेष माहिती मिळण्यासाठी त्यांचा फायदा मला हॉलंडच्या वास्तव्यात झाला. अभ्यासासाठी ॲम्स्टरडॅम, रॉटरडॅम, हेग व लायडन् नावांच्या शहरांत जावे लागले. त्याशिवाय बऱ्याच लहान गावांत पण फिरलो होतो. तिथली संग्रहालये पहाणे हा मुख्य उद्देश होता. त्या शिवाय गिरिजाघरे, केवळ वास्तुकलेचे नमुने म्हणून पाहिली. ते करत असताना काही मजेदार अनुभव आले, माझे भारतीयत्व उठून दिसत असावे. त्यामुळे तिथल्या रहिवाश्यांचे लक्ष माझ्याकडे जाई. परदेशी पांथस्थाकडे निर्विकारपणे पहाणारे भेटत. पण हा द्विपाद प्राणी पर्यटक असेल व बाहेरून आणलेले द्रव्य त्यांच्या देशात खर्च करीत असेल ह्या आशेने किंचित सुहास्य करून माझ्याकडे पाहणारे बरेच होते. जर तो दिवस रविवार असेल तर वेगळे अनुभव मिळत. गिरिजाघरांच्या बाहेर पडत असलेल्या रोमन कॅथॉलिक भक्तगणांच्या नजरेत, त्यांच्या नजरेला मी पडल्यावर वेगळी चमक दिसून येई. त्याची कारणे पण कळून चुकली. रविवार असून सुद्धा कुठल्याही गीरिजाघरांत नसणाऱ्या व हातांत बायबल न बाळगणाऱ्या एका कृष्णवर्णीयाला येशूच्या कळपात योग्य स्थान मिळवून देण्याची त्यांना घाई होत असावी. मला चांगले डच भाषेत बोलता येत नाही हे लक्षात आल्यावर मोडक्या तोडक्या इंग्रजीचा प्रयोग करून मी भारतीय हिंदू असल्याची खात्री केली जात असे. माझा जुना जीर्ण धर्म सोडून देऊन जगातला उत्तमातला उत्तम धर्म मी लवकरात लवकर घ्यावा असा आग्रह केला जाई. सुबक बांधणी व छपाईचे बायबल माझ्या हातात कोंबले जाई. हिंदूंच्या देवदेवतांपेक्षा येशु किती महान व मानवतावादी होता हे पटवून देण्याचे प्रयत्न सुरू होत असत. जवळ असलेल्या कॉफीगृहात येण्याचे आमंत्रण मिळत असे. प्रथम ह्या प्रकारांकडे मी गांभीर्याने पाहिले नव्हते. पण तशा ''संडे टु संडे'' कार्यक्रमातील ''तोच तोच'' पणा कंटाळवाणा होऊ लागला. संग्रहालयाचे काम करणाऱ्यांच्या ओळखी वाढत गेल्या. ज्या वेळी त्यांच्या बरोबर चर्चा होत असे त्यावेळी मला त्यांच्या हॉलंड देशात विशेष कोणचे अनुभव आले अशी चौकशी होत असे. मी हिय्या करून त्यांना तिथे होत असलेल्या धर्मांतराच्या आग्रहाबद्दल सांगितले. त्यावेळी हसून अशा प्रकारांकडे दुर्लक्ष करण्याचा सल्ला मला मिळत असे. ''तुमच्या मागे लागणारे लोक चक्रम आहेत. रविवारी चर्चमधून बाहेर पडल्यावर त्या लोकांच्या धर्मप्रेमाला भरती येते. कुणाला तरी स्वधर्माकडे आकृष्ट केल्याशिवाय दिवस फुकट न घालवण्याचा ते निश्चय करत असावेत.'' असे मला सांगितले जात असे.

ॲम्स्टरडॅममध्ये दोन वेगळी विश्वविद्यालये निराळी आहेत. एक कॅथॉलिक प्रणीत व दुसरे प्रॉटेस्टंटवाल्यांचे. कॅथॉलिक धर्ममतांचा अव्हेर करणाऱ्या युरोपियन लोकांनी प्रॉटेस्टंट मतवादी हॉलंडमध्ये शेकडो वर्षे आश्रय घेतला आहे. ह्या दोन पंथांमधील फरक भारतामध्ये राहणाऱ्यांच्या सहज लक्षात येत नाही. पण ॲम्स्टरडॅममध्ये कांही महिने राहिल्यावर तो ठळक दिसू लागला. ज्या ख्रिस्ती डच लोकांशी ओळख झाली त्यांच्या तोंडून परपंथातील लोकांची नेहमीच टर उडवली जात असे. माझे प्रॉटेस्टंट मित्र नेहमी सांगत की कॅथॉलिक लोक सर्व हॉलंड देशाला कॅथॉलिक बनविण्याच्या मागे लागले आहेत. त्यांच्या देशांतील वेगळ्या वेगळ्या पंथांच्या जनसमूहाची आकडेवारी मला सांगण्यात येत असे व प्रॉटेस्टंटाचे प्रमाण कसे घटत जात आहे ह्यावर विशेष भर दिला जात असे. मला त्याबद्दल काही सोयरसुतक नव्हते. पण गंमत अशी की प्रॉटेस्टंट मित्र सुद्धा त्यांनी कॅथॉलिक पंथ स्विकारावा म्हणून केल्या जाणाऱ्या खटपटीची माहिती देऊन मला सांगत की जर माझ्यामागे धर्म बदलण्याबद्दल कुणी आग्रह धरला तर त्यांत काही नवल नाही. मी अशा प्रकारांकडे

फार गांभीर्याने पाहून सर्व डच लोकांबद्दल वाईट मत करून घेऊन भारतात परत जाऊ नये असा सल्ला मिळत असे.

पूर्वी नेदरलंडचे अधिपत्य असलेला ''सुरीनाम'' देश दक्षिण अमेरिका खंडात आहे. तिथे संमिश्र वस्ती आहे. त्यात भारतातून गेलेले बरेच लोक आहेत. त्यातले कित्येक जण व्यवसाय किंवा शिक्षणासाठी ॲम्स्टरडॅम मध्ये वास्तव्य करत असतात. मला रस्त्यात पाहून मी भारतीय आहे ते ओळखून माझी प्रेमाने चौकशी होत असे. माझे हॉलंडमधले अनुभव काय आहेत असे विचारले जात असे. त्यावेळी मी रविवारी मला ख्रिस्ती करण्याबद्दलाच्या खटपटींबद्दल सांगत असे व त्यांना पण हिंदू धर्म सोडण्याबद्दल आग्रह होतो का असे विचारत असे. माझ्या आठवणीप्रमाणे जरी असे प्रयत्न सुरीनामच्या हिंदूच्या बाबतीत केले गेले तरी त्यांचा काहीही उपयोग होणार नव्हता. शेकडो वर्षापूर्वी स्वदेश सोडून गेलेल्या सुरीनामी लोकांनी आपल्या हिंदू परंपरा निष्ठेने टिकविलेल्या आहेत. त्यांना त्यांच्या हिंदू संस्कृतीचा खूपच अभिमान आहे. सुरीनामचे जे रहिवासी ॲम्स्टरडॅममध्ये रहात आहेत त्यांची सांस्कृतिक अभ्यास मंडळे आहेत. माझ्या सारख्यांना आमंत्रण देऊन त्यांची भाषणे अशा अभ्यास मंडळात आयोजित केली जातात. सुरीनाम देशांतल्या हिंदूबद्दल बरीच माहिती ट्रॉपिकल संग्रहालयात भरवलेल्या सुरीनाम देशावरच्या एका संस्मरणीय प्रदर्शनामुळे झाली.

चीन, दक्षिण अमेरिका, आफ्रीका व भारत ह्या भूभागांतून सुरीनाम देशांत गेलेल्या लोकसमुदायांच्या जीवनपद्धतींमधील वेगळेपणा दाखविण्याचा प्रयत्न त्या प्रदर्शनात केला होता. सुरीनाममध्ये राहणाऱ्या हिंदुची भाषा जरी हिंदी असली तरी कित्येक शतकापूर्वी बोलल्या जाणाऱ्या पद्धतीची ती हिंदी आहे. त्या हिंदीच्या कॅसेट तिथे लावल्या होत्या. सुरीनामी हिंदूंच्या घरांचे नमुने तिथे दिसले. त्यांच्या वेशभूषेची कल्पना आली. सतत बदलून दाखविल्या गेलेल्या रंगीत स्लाईडमुळे व मोठ्या रंगीत फोटोंमुळे तिथले हिंदू संस्कार व विधी ह्यांची उत्तम कल्पना मिळाली. ज्या देवदेवतांवर तिथले हिंदू भक्ती करतात त्यांचे पण दर्शन प्रदर्शनामुळे झाले. अंतर्मनात हिंदू निष्ठांची पाळेमुळे खोल पसरली असल्यामुळे व धार्मिक संस्कारांचे सतत खतपाणी मिळत राहिल्यामुळे सुरीनामी हिंदू जनतेवर परधर्मीय प्रचाराचा दुष्परिणाम होत नव्हता ते पटले.

ते प्रदर्शन आणखी एका कारणाने संस्मरणीय झाले. सुरीनामचे पर्यावरण ॲम्स्टरडॅम पेक्षा फारच वेगळे आहे. ट्रॉपिकल संग्रहालयात येणाऱ्या डच लोकांना सुरीनाममधील परिस्थितीचे आकलन होण्यासाठी त्या प्रदर्शनाच्या एका भागात एक विस्तीर्ण काचघर निर्माण केले होते. त्याचे आतील तापमान व बाष्पाचे प्रमाण जसे सुरीनाममध्ये असते तसे कृत्रिम रीत्या निर्माण केले होते. सुरीनाममध्ये सापडणाऱ्या व उगवणाऱ्या वनस्पती ॲम्स्टरडॅममधल्या जगप्रसिद्ध वनस्पतिउद्यानांतून मागवून त्या काचगृहात दाखविल्या होत्या. इतकेच नव्हे तर ॲम्स्टरडॅमच्या प्राणि-संग्रहातून काही पक्षी व सरपटणारे चतुष्पाद प्राणी साखळीने बांधून त्या काचगृहात ठेवले होते. त्यांचे आवाज व हालचाल प्रेक्षकांत सुरीनामबद्दल कुतूहल जागे करीत होते. जरी संग्रहालयात इतर ठिकाणी फरशी होती तरी काचगृहात ३-४ इंच जाडीचा पाला पाचोळा आणून पसरला होता. प्रदर्शन बघणारे त्या वरून चालू लागले की सुरीनामच्या जंगलात झाले असते तसे पायाखालच्या पानांवर आवाज होत असत. मधूनमधून त्यावर पाण्याचा शिडकावा पण केला जाई. त्यामुळे नैसर्गिक जंगलामध्ये पडलेल्या पालापाचोळ्यामुळे पसरणारा थोडा कुजकट वास पण काचगृहात सुटला होता. दर आठवड्याला हा पालापाचोळा बदलण्याची खबरदारी घेतली होती. ह्या शिवाय प्रदर्शनात सुरीनामी पाककलेची माहिती व प्रात्यक्षिके आयोजित केली होती. काही भारतीय दिसणाऱ्या पदार्थांची चव घेण्याची संधी मी सोडली नाही.

हॉलंडच्या वास्तव्यात एक ''आफ्रिका संग्रहालय'' पण पहायला मिळाले. तिथल्या अधिकारी वर्गाशी चर्चा केली. त्यावेळी कळले की हॉलंडमध्ये आफ्रिका संग्रहालय निर्माण करण्याचे काय प्रयोजन होते. युरोपातून ख्रिस्ती मिशनऱ्यांचा ओघ आर्थिक व राजकीय दृष्ट्या दुर्बळ देशांकडे ४-५ शतके वळला आहे. ह्या मिशनऱ्यांचा खर्च युरोपमध्ये राहणारे लोक मोठ्या भक्तिभावाने करत आहेत. युरोपीय देशांतील कित्येक धार्मिक संघटना ह्या कारणांसाठी पैसा एकत्र करण्याचा उपद्व्याप करत आहेत. त्या संस्थांना

मदत करणाऱ्यांच्या खिशांतून पैसा नियमित जात असतो. त्यांची अपेक्षा असते की सैतानाच्या कचाट्यात सापडलेल्या, वाट चुकलेल्या आत्म्यांचा विनाश त्यांच्या पैशाच्या मदतीने टाळला जात आहे म्हणून जे हॉलंडवासी मिशनऱ्यांसाठी पैसा देत असतात त्यांना त्यांच्या त्यागाचे काय फलित मिळत आहे ते दाखविणे आवश्यक झाले आहे. ह्याच प्रयत्नांची एक फलश्रुती म्हणजे "आफ्रिका संग्रहालय" आहे. त्यामध्ये आफ्रिकेतील देशांमधून आणलेल्या उत्तमोउत्तम कलाकृतींचा दुर्मिळ संग्रह पहायला मिळतो. गंमत म्हणजे कोट्यावधी रुपये किंमत असलेल्या वस्तु फुकट मिळविल्या आहेत. युरोपियन व डच मिशनऱ्यांनी आफ्रिकेत जाऊन धार्मिक प्रचार चालू केला. येनकेन प्रकारे तिथल्या मूळ लोकांच्या पारंपारिक निष्ठांमध्ये आमूलाग्र फरक झाला. मिशनऱ्यांनी "तुमचे देव खोटे आहेत ते फेकून द्या व आमच्यासारखे व्हा." हा संदेश आफ्रिकेतील लोकसमुदायात मोठ्या प्रमाणात पसरवला. त्यांच्या यशाचे एक द्योतक म्हणजे ज्या हजारो लोककला धार्मिक हेतूंसाठी विकसित होत्या त्याचा नाश सुरू झाला. कला व समाज ह्यांचे खास नाते असते. व्यक्तीच्या सुखासाठी कलाकृती घडविण्याची कल्पना आधुनिक आहे. पारंपरिक कलांचा हेतू सामुदायिक अनुभूतीत असते.

मिशनऱ्यांच्या धर्मप्रचाराच्या कामातील यशामुळे आफ्रिकेतील जुन्या पारंपरिक कलांचे वळण बदलले. जी कला स्थानिक लोकांसाठी होती ती युरोप व अमेरिकेतील कलासंग्रहासाठी अमाप पैसा गुंतवणूक करण्यासाठी चालू राहिली. ह्याचा एक फार मोठा दुष्परिणाम म्हणजे अफ्रिकेतील जनसमुदाय त्यांच्या स्वतःच्या घरात व देवळात वापरत असलेल्या शिल्पांची हेटाळणी करू लागले. त्यांनी अवहेलना केलेल्या कलावस्तू अक्षरशः उकिरड्यावर पडू लागल्या. आधीच्या पिढीतल्या लोकांनी चुकीच्या धार्मिक कारणांकरिता जमा केलेल्या गोष्टींचा त्याग करणे हे किती योग्य आहे ते मिशनऱ्यांच्या शिकवणुकीने पटवून दिले गेले. पूर्वजांच्या धार्मिक चुकांच्या खाणाखुणा घरात बाळगण्याची शरम वाटून कलाकृतींची विल्हेवाट लावली गेली. त्यामुळे युरोपमधील कलारसिकांना अफ्रिकेतील कलाकृतींचे हजारो नमुने फुकट मिळू लागले. जरी युरोपातील मिशनरी ते स्वतःसाठी वापरू शकत नव्हते तरी ते गोळा करून मायभूमीला पाठवणे त्यांना शक्य झाले. ज्या हॉलंडवासी भक्तजनांनी मिशनसाठी पैशाची मदत केली होती त्यांना आफ्रिकेतून पाठविलेल्या कलावस्तूंचे दर्शन झाल्यावर समाधान झाले असावे. सैतानाच्या कचाट्यातून आफ्रिकेतील लोक मुक्त झाले आहेत व मिशनऱ्यांना दिलेल्या प्रत्येक "गिल्डर" चा पुरापुरा उपयोग झाला आहे. ते धार्मिक कार्य चालू ठेवले पाहिजे हे पण दात्यांच्या मनावर बिंबवले गेले असावे. त्या आफ्रिका संग्रहालयातील वस्तू पाहून हॉलंडचे निष्ठावान त्यांच्या खिशांत परत परत हात घालत असावेत. बँकेची चेकबुके बाहेर काढून मिशनसाठी पैसा देण्यात खळखळ करण्याचे त्यांना कारण नव्हते. आफ्रिकेतील धार्मिक कलाकृती उकिरड्यावर फेकण्याचा वेग वाढत असे. आधुनिक काळातील आफ्रिकेतील कलाप्रेमींना त्यांचा सांस्कृतिक वारसा अशा मार्गाने युरोपात गेल्याची आता खंत वाटते. पण कोणत्या तोंडांनी त्या वस्तूंच्या पुनःप्राप्तीसाठी मागणी करणे त्यांना शक्य आहे? हॉलंडमधील आफ्रिका संग्रहालयातील कलासंग्रह कलाकार व रसिकांना नेत्रसुख देत असेल ह्यात शंका नाही. मिशनऱ्यांना द्रव्य देऊन आफ्रिकेतील धार्मिक निष्ठा वेचिराख करणाऱ्यांना कदाचित भूषणास्पद वाटणारी ही जागा आफ्रिकन संस्कृतिरक्षकांच्या दृष्टीने एक भेसूर संस्था झाली आहे ह्यात शंका नाही.

संग्रहालय परिषदेसाठी ऑस्ट्रेलियाला गेलो. तेव्हा संग्रहालयात काम करणाऱ्यांच्या घरी जायचा योग आला. त्याला स्वतःला व कुटुंबियांना भारताचे खूप आकर्षण होते असे कळले होते. मेलबोर्न शहराच्या बाहेर त्याचा सुंदर बंगला होता. जेवण झाल्यावर त्याने त्यांचे फोटोंचे अल्बम दाखवायला सुरुवात केली. कुटुंबियांच्या प्रत्येक भारत भेटीचे स्वतंत्र अल्बम केले होते. नुसते फोटोच नव्हते तर भारतातील प्रवासाशी संबंधित गोष्टी पण काळजीपूर्वक चिटकवून ठेवल्या होत्या. रेल्वे, बस व गंमत म्हणून कलकत्त्यांतल्या ट्रॅम गाडीची तिकिटे, पावत्या, सिनेमांच्या गाण्यांच्या पुस्तिका, कॅलेंडरे, रस्त्यात येणाऱ्या जाणाऱ्यांच्या हातांत कोंबतात तशा रंगीत जाहिराती,

इथल्या मुक्कामात वर्तमानपत्रांत छापून आलेल्या ऑस्ट्रेलियन लोकांना मजेदार वाटतील अशा बातम्यांची कात्रणे वगैरे असंख्य गोष्टी त्या अल्बममध्ये मला सापडल्या. ज्या लहानमोठ्या गोष्टी प्रवासात खरेदी केल्या होत्या त्यांच्या याद्या व जियून घेतल्या त्या दुकानांचे फोटो पण पहायला मिळाले. भारताच्या जीवनशैली व संस्कृतीबद्दल तोंड भरून स्तुती ऐकायला मिळाली. मी खूपच सुखावलो होतो पण थोड्याच वेळात माझा भ्रमनिरास झाला. त्या संग्रहालयाध्यक्षाची मुलगी दरवर्षी तिची वार्षिक सुट्टी भारतामध्ये घालवीत असते असे कळले. भारतातील ताजमहाल, फत्तेपूर सिकरी, मथुरा, वाराणसी, अजंठा वगैरे प्रेक्षणीय स्थळे पहाण्याचा त्या तरुणीचा हेतू नसे. भारतवासीयांमध्ये धार्मिक सुधारणा व्हाव्या ह्या उदात्त हेतूने प्रेरित होऊन ती भारतात येत असे. दरवर्षी महिना दोन महिने, भारतामध्ये कुठल्या मिशनरी संस्थेत सेवा करायची, ते आधीच ठरवलेले असे. स्वतःच्या खिशातून पैसे खर्च करून धार्मिक कर्तव्य बजावणारी ती एकच परदेशी मुलगी नव्हती. अशा सेवाभावी तरुणींच्या दृष्टीला जो भारत दिसतो तो फार वेगळा असतो. धार्मिक लोकांना पुण्य मिळवून देण्यासाठी जसे देवळाजवळ दान मागत दुतर्फा बसलेले भिकारी असतात तसे जे भारतीय रोगी, दुबळे व गरीब लोक सैतानाच्या कचाट्यातून अजून मुक्त झाले नाहीत त्यांच्या आत्म्याची हाक ऑस्ट्रेलियन युवतींना वर्षानुवर्षे ऐकू जाते. स्वतःच्या देशात सैतानापासून कुणाला भय राहिले नाही ह्याची त्यांना खात्री झाली असावी. म्हणून वेळ व पैसा खर्च करून त्या तरुणी भारताच्या वाऱ्या करीत आहेत. गंमत म्हणजे हे सर्व कुटुंबियांच्या सम्मतीने, कौतुकामुळे व प्रोत्साहनापायी शक्य होत आहे. भारतामध्ये येऊन पडेल ते काम करण्याची त्यांची तयारी कौतुकास्पद आहे. इथल्या मूक-बधिरांसाठी सुरू केलेल्या शाळांमध्ये काम करता यावे म्हणून तिथून निघण्यापूर्वी आमच्या ऑस्ट्रेलियन मित्राच्या कन्येने खास प्रशिक्षण घेण्याचे कष्ट पण घेतले होते. इथल्या रुग्णालयात परकीयांची थुंकी व परसाकडणे जमा करण्याची तयारी असलेल्या त्या तरुणीशी बोलल्यावर असा प्रश्न मनात आला की किती भारतीय तरुणी तशाच प्रकारचे काम स्वतःच्या खर्चाने त्यांच्या वार्षिक सुट्टीत हिंदू धर्माचा प्रचार व प्रसार करण्यासाठी ऑस्ट्रेलिया इथे जाण्याचा हट्ट धरतील? व कुणी धरलाच तर किती मुलींचे पालक व कुटुंबीय आमच्या तरुणींचे कौतुक करतील?

आपल्या हिंदू धर्मात इतर धर्मीयांना जास्तीत जास्त संख्येने सामील करून घेण्याबद्दल भारतामध्ये सर्वसाधारणपणे औदासीन्य दिसते. पण ह्या बाबतीत जन्माने हिंदू आहेत त्यांच्यात व धर्मांतराने हिंदू झालेल्यांमध्ये ठळक फरक दिसून येतो. काही वर्षांपूर्वी बडोद्यामध्ये भक्तिवेदांत स्वामी प्रभुपादांनी स्थापन केलेल्या "इस्कॉन" संस्थेची चळवळ मोठ्या प्रमाणांत सुरू झाली. कृष्णाचे मोठे मंदिर बांधण्याचे काम सुरू झाले. त्यासाठी पैसे जमा करण्यासाठी जी भक्तमंडळी बडोद्यात फिरू लागली त्यात अमेरिकेत जन्मलेल्या व हिंदू धर्माचा स्वीकार केलेल्यांची संख्या जास्त होती. रिकाम्या हातांनी मदत मागण्यासाठी लोकांच्या भेटी घेण्याऐवजी ती भक्तमंडळी उत्तम प्रतीची रंगीत चित्रे असलेली धार्मिक विषयांवरची पुस्तके घेऊन येत असत. इतक्या सुंदर पुस्तकांची किंमत फारच थोडी होती. ती नाकारणे जीवावर येत असे. त्यांच्या देवळात जाऊन, उत्सवात व प्रवचनकीर्तनात भाग घेण्याचा आग्रह चालू असे. जरी कुणी गेले नाही तरी चिकाटीने परत परत भेटून ह्या नवहिंदूंचा प्रचार चालू असे. केवळ फॅशन म्हणून किंवा अमेरिकेतील ऐश्वर्यातील फोलपणाचा उबग येऊन ती मंडळी भारतामध्ये हिंदू धर्माचा प्रचार करत नव्हती हे त्यांच्याशी जास्त ओळख झाल्यावर लक्षात आले. भारतामधल्या हिंदूंमध्ये धर्माबद्दलचे औदासीन्य दिसून येते त्याबद्दल नवहिंदूंना वाईट वाटत होते. नव्या जोशाने व उत्साहाने हिंदुधर्माचा महान संदेश जगभर पसरावा अशी प्रखर तळमळ त्यांच्यामध्ये दिसत होती. अमेरिकेत यशस्वी झालेले प्रचारतंत्र हिंदूंनी वापरायला हवे असे त्यांना वाटत होते, धर्माचा प्रचार युद्धपातळीवर करण्याची भाषा त्यांच्या तोंडून ऐकताना मजा वाटे. धर्मप्रचाराच्या बाबतीत सर्व धर्मांमध्ये स्पर्धा आहे व ती वाढतच जाणार असे गृहीत धरूनच हे नवहिंदू काम करताना दिसतात. अत्याधुनिक व्यवस्थापनशास्त्राची तंत्रे हिंदू धर्माच्या प्रचारासाठी वापरण्याची प्रात्यक्षिके पहायची असतील तर इस्कॉनच्या संस्थेतच जायला हवे. कॅथॉलिक मिशनऱ्यांनी भारतात

(पान क्र. ३३ वर)

# हनुमान देवत्व विकास

डॉ. सौ. मीनाक्षी पंडित

हनुमान-एक शक्तिदेवता. युगानुयुगे अखिल भारतात त्याची उपासना चालू आहे. रामरूपी अंतरात्मा दर्शने दोष नासती। अशी ख्याती असलेल्या रामभक्त हनुमानाची उपासना समर्थ रामदासांनी वृद्धिंगत केली. रामभक्ती व रामनामाचे असाधारण महत्त्व आपल्या आचरणाने प्रस्थापित करणारी ही देवता भक्तराज आहे. हनुमंताच्या रूपाने देव व भक्त एकरूप झाले. समर्थांच्या शब्दांत सांगायचे झाले तर "हा तो ईश्वरी अवतार। भीम सकळांसि आधार। रामध्यानी निरंतर। भक्तराज। (रामदासांचा सारथी : : अकरा हनुमंताशी हितगुज पृ. २०९) समर्थ रामदासांनी हनुमंताला मुख्य दैवतच मानले. ते म्हणतात, "हनुमंत आमची कुळवल्ली।" हनुमंताची देवळे त्यांनी गावोगाव स्थापली. अकरा मारुती स्थापले. भीमरूपी स्तोत्र आणि त्याची आरती रचली. आजही गावोगावी जागोजागी हनुमान मंदिरे आढळतात ती म्हणजे त्याच्या शक्ती-युक्ती-भक्ती या त्रिविध सामर्थ्य एकवटलेल्या तिन्हींचे प्रतीक. सप्तचिरंजीवांमध्ये मानाचे स्थान लाभलेला हा हनुमान म्हणजे रामोपासनेचा परमादर्श।

त्याची उपासना व्यक्तीव्यक्तीत आत्मविश्वास उत्पन्न करते, ईशचिंतनाची प्रेरणा फुलविते, पराक्रमाची स्फूर्ती देते. हनुमानाच्या जीवनातील प्रत्येक कृती ही अनुसरणीय आहे. त्याची प्रखर बुद्धिमत्ता, त्याचा पराक्रम त्याचे रामदास्य, त्याची निस्सीम रामभक्ती ही चिंतनीय तर आहेतच पण आचरणीयही आहेत.

भारतीय लोक मारुतीला "महावीर" समजतात. यक्षांचा नियंत्रक तो मानला जातो. यक्ष म्हणजे शीघ्रगामी. हनुमान हाही शीघ्रगामी आहे. वैश्रवण यक्षाप्रमाणेच त्याच्या हातात गदा व पायाखाली राक्षस दाखविलेला असतो.

वाल्मिकी रामायणासारख्या महाकाव्याने हनुमान देवत्वाचा अंश म्हटले आहे. "तो वायुपुत्र असून सर्वांना पूज्य आहे." असे सागर मैनाक पर्वताला सांगत असल्याचाही उल्लेख आहे.

किष्किंधाकांडातही जांबवत हनुमानास म्हणतो :

हनुमन्हरिराजस्य सुग्रीवस्य समो ह्यसि।
राम लक्ष्मणयोश्चापि तेजसा च बलेन च॥ (वा.रा. ४.६६.३)

प्रत्यक्ष विष्णूचा अंश राम व लक्ष्मण यांच्या तेजाशी हनुमंताच्या तेजाची बरोबरी केली. यावरुन हनुमानात दैवी तेज असल्याचे सिद्ध होते.

अप्सराप्सरसां श्रेष्ठा विख्याता पुञ्जिकस्थला।
अंजनेति परिख्याता पत्नी केसरिणो हरेः॥
विख्याता त्रिषु लोकेषु रूपेणप्रतिमा भुवि।
अभिशापादभूतात कपित्वे कामरूपिणी॥ (वा.रा. ४.६६-८९)

हनुमानाच्या लोकोत्तर व्यक्तिमत्त्वाचे अलौकिक वर्णन वाल्मिकी रामायणाच्या युद्धकाण्डात केले आहे. अशा या तेजस्वी, धैर्यशाली, यशवंत, जागरूक, सामर्थ्यसंपन्न, नम्र, नीतिज्ञ, बलसंपन्न, बुद्धिवंत हनुमानाबद्दल सीतेला सुद्धा परम आदर वाटून तिने तो व्यक्त केला आहे.

तेजो धृतिर्यशो दाक्ष्यं सामर्थ्य विनयो नयः।
पौरुषं विक्रमो बुद्धिर्यास्मिन्नेतानि नित्यदा॥ (वा.रा.६.१२८.८२)

देहदृष्ट्या तु दासोऽहं जीवदृष्ट्या त्वदंशकः।
आत्मदृष्ट्या त्वमेवाहमिति मे निश्चया मतिः॥ (अध्यात्म सं.)

याठिकाणी हनुमंताने रामाला म्हटले की देहदृष्ट्या मी तुझा दास आहे पण आत्मभावाने विचार केलास तर मीही तूच आहेस. याचाच अर्थ हनुमान व राम एकच

आहेत. त्याची रामावर इतकी भक्ती होती की रामोपासकही म्हणतात की माझी उपासना केलीच पाहिजे असे नाही तर रामाची उपासना केली तरी मी पावेनच.

स्थितं त्वामनुयास्यंति भोगाः सर्वे ममाज्ञया।
इत्युक्तो मारुतिस्ताभ्यामीश्वराभ्यां प्रहृष्टधीः ॥ (अध्यात्म सं. ६.१६.१०)

इ.स. चौदाव्या ते पंधराव्या शतकात लिहिल्या गेलेल्या या ओळी वाचल्या की हे लक्षात येईल की, रामानेच मारुतीस आपल्या बरोबरीने स्थान दिले, आपल्या बरोबरीने सर्व भोग मिळतील असे सांगितले.

पठंति रामकवचं हनुमत्कवचं विना।
अरण्ये रोदनं तैस्तु कृतमेव न संशयः ॥ (आनंद (सं.) ८१२.१०४)
मैदो भर्गतनुः साक्षात् हनुमान् भगवान् स्मृतः ॥ (अ. सं. ८.१६.१९)

प्रत्यक्ष गरुडाने अशा शब्दांत हनुमानास साक्षात भगवान म्हटले आहे. सीतेनेही प्रसन्न होऊन हनुमानाची अचूक शक्ती सूचित करणारा वर दिला की, हे हनुमंता, तुला सर्व भोग्य पदार्थ प्राप्त होतील. गावागावातून विघ्नशांतीसाठी तुझ्या मूर्तीची पूजा होईल. तुझ्या नामस्मरणामुळे भूत, प्रेत, पिशाच दूर होतील.

ग्रामरामपत्तनेषु व्रजखेटकसद्मसु।
वनदुर्गपर्वतेषु सर्वदेवालयेषु च॥
नदीषु क्षेत्रतीर्थेषु जलाशयपुरेषु च।
वाटिकोपनाश्वत्थवटवृंदावनादिषु॥
त्वन्मूर्तिं पूजयिष्यंति मायया विघ्नशांतये।
भूतप्रेतपिशाचाद्या नश्यंति स्मरणात्तव ॥ (आ. सं. १.१२.१०)

हनुमंताची पूजा सर्वत्र होईल असाच वर तिने दिला आहे. हनुमंताला मिळालेल्या विविध वरदानाने हनुमंताच्या देवस्वरूपाची ओळख पटते.

संतविजयात हनुमानास रुद्राचा अकरावा अवतार म्हटले आहे.

हे देखोनी अंजनीचे आर्त। काय म्हणती कैलासनाथ।
मी अकरावा रुद्र निश्चित। होईन सुत तुझा ॥ (संत विजय. अ. १८.८६.१२८)
जनी ते अंजनी माता। जन्मली ईश्वरी तनू। (मारुती उपासना पृ. ३८)

हनुमान हा मानव नाही, वानर तर नाहीच नाही, पण देवतास्वरूप आहे-

हे वरील विवेचनावरून दिसून येते.

या पृथ्वीवर सज्जनांचे रक्षण आणि दुर्जनांचा नाश करण्यासाठी परमेश्वर अवतार घेतो. प्रत्येक युगात ईश्वराने विविध अवतार घेतले आहेत. त्रेतायुगात लंकाधिपती रावणाने आपल्या पराक्रमाने व कार्याने दहशत बसविली होती. त्याच्या नाशासाठी भगवान विष्णूने रामरूप धारण केले. श्रीरामाच्या सहाय्यासाठी सर्व देवतांनाही विविध योनीत पशुपक्ष्यादी अवतार घेतले. प्रत्यक्ष रुद्राने अंजना वानरीच्या उदरी हनुमानरूपात जन्म घेतला. त्याने नंतर संजीवनी आणून लक्ष्मणाचे प्राण वाचवले कारण तो रुद्रावतार आहे. काही ठिकाणी हनुमानाला विष्णूचा अवतार मानल्याचे उल्लेख असले तरी प्रामुख्याने अनेक ठिकाणी तो रुद्रावतार म्हणून मानला गेला आहे.

निळकंठाचार्यांनी ऋग्वेदाच्या १०, ६४, ८ या ऋचेचा अर्थ लावताना हनुमान रुद्रावतार असल्याचे खालील ऋचेत म्हटले आहे.

कृशानुमस्तृन् तिष्यं सधस्थ
रुद्रं रुद्रेषु रुद्रियं हवामहे॥ (ऋग्वेद १०.६४.८)
रामोत्तरतापिनीय उपनिषदात म्हटले आहे.
ॐ यो वै श्रीरामचंद्रः स भगवान् ये चैकादश रुद्रा।
भूर्भुवः स्वस्तस्मै वै नमो नमः ॥

अगस्त्यसंहितेत हनुमान रुद्रावतार असल्याचे नमूद केले आहे.

उर्जे कृष्णचतुर्दश्यां भौमे स्वात्यां कपीश्वरः।
मेषलग्नेऽञ्जनागर्भात् प्रादुर्भूतः स्वयं शिवः।

यशोवितानधवलीकृतजगालितयाय च।
वज्रदेहीति चोक्ता हि रुद्रावतारपदं तथा॥ (अगस्त्यसंहिता अ.३२ श्लो. १२)

अनेक पुराणांतील कथांनुसार हनुमान शिवावतार मानला आहे.

अंजनीगर्भसंभूतो हनुमान् पवनात्मजः।
यद्रा जातो महादेवो हनुमान् सत्यविक्रमः॥ (वायु पु. ६०.४३)
पवनात्मा बुधैर्दैव ईशान इति कीर्त्यते।
ईशानस्य जगत्कर्तुर्देवस्य पवनात्मजः॥ (लिंग पु. १३.९)

शिवाने रुद्ररूपात केसरी वानराच्या मुखात प्रवेश केला. मग अंजना आणि केसरीला हनुमान हा पुत्र झाला.

अंजनीगर्भसंभूतो रुद्रांशो हि धरातले।
ततो नंदी प्रतिहारी रुद्रांशमपि तं कपिम्॥ (स्कंद पु.अं.७९ श्लोक ६)

पूर्वी श्रीविष्णूंनी मोहिनीरूप घेतले असताना त्या मोहिनीच्या लावण्याने शिवाचे वीर्य पतन पावले. सप्तर्षींनी ते अंजनीच्या कानात ठेवले आणि तिला हनुमान पुत्र झाला. (शिवमहापुराण, शतरुद्रसंहिता अ.२०) शिवाय शिवमहापुराणाच्याच रुद्रसंहितेत, आदित्यांना वासुदेवो हनुमान वानरेषु च। (युद्धकांड २.५९) असा उल्लेख आहे.

याशिवाय संस्कृत, मराठी नाटके, काव्ये यातूनही हनुमानाचे शिवावतार म्हणून वर्णन केलेले आहे.

सर्व वानर सीताशोधासाठी निघाले असताना दक्षिणेचा महासागर दृष्टीस पडला त्याच्या पलीकडील लंकेत जाणे कोणालाही शक्य नव्हते. तेव्हा जांबवंत म्हणाला ''तुम्ही सर्वजण रुद्ररूप असणाऱ्या हनुमानाची स्तुती करा. तो रुद्राचा अवतार आहे म्हणून तोच निश्चित समुद्र ओलांडील.

ततो जाम्बवान्-देव। रुद्रावतारोऽयं मारुतिः। रुद्रस्तुतिः क्रियताम्॥ (हनुमाननाटक अंक ६)

नंतर त्या हनुमानाने अनेक संकटांवर मात करून तो सागर ओलांडला व लंकेत प्रवेश केला. या ठिकाणी त्याने केलेला हा पराक्रम असामान्यच होता. ''लंकादहन'' ही एकच घटना हनुमानाच्या व्यक्तिदर्शनातील तेज व वायुतत्त्व या दिव्य गुणांचा साक्षात् प्रत्यय देते म्हणूनच ''लंकादहन'' हा महापराक्रमी हनुमानाच्या देवत्व विकासातील एक अविभाज्य घटक आहे. हनुमानाला शिवाप्रमाणे विष्णूचा अवतारही काही ठिकाणी मानले जाते यासंबंधी काही कथा आहेत.

एकदा सुवर्चला नावाच्या अप्सरेच्या नृत्यात दोष आढळल्याने ब्रह्मदेवाने तिला गृध्री होण्याचा शाप दिला. तिने उःशाप मागितल्यावर त्यांनी सांगितले ''अयोध्येतील कैकयीला मिळालेले पायस पर्वतावर फेकलेस की तू निजरूपात जाशील. पुढे दशरथाने पुत्रकामेष्टी यज्ञ केला. अग्नीतून प्रकट होऊन यज्ञपुरुषाने दशरथाला पायस दिले व त्या पायसाच्या भक्षणाने त्याच्या राण्यांच्या पोटी विष्णू अवताररूपाने जन्म घेतील. यावेळी कैकयीच्या हातातील पायस गृध्रीने पळवून अंजनेच्या हातात नेऊन टाकले व तिने भक्षण केल्यावर तिच्या पोटी विष्णूचा अंशावतार हनुमानाचा जन्म झाला. पण ८व्या ते १०व्या शतकात हनुमानाला रुद्रावतार मानले जाऊ लागले. राम स्वतः विष्णुचा अवतार व रामाच्या साहायासाठी अकरावा रूद्र हनुमानरूपात अवतारला ही कल्पना अधिक प्रचलित झाली.

हनुमान हा वायुपुत्र होय. त्याच्या उपासनेने वायुरूप देह धारण करणारी जी पिशाचयोनी यांच्या बाधेपासून मुक्तता मिळते. म्हणून ''हनुमत्कवच'' यातून दक्षिणमुखी मारुतीला प्रदक्षिणा घालण्याची सेवा, बाधा झालेल्या व्यक्तीला सांगण्यात येते. हनुमंताची पंचमुखी मूर्ती ही पंचप्राणांचेच प्रतीक आहे. पंचतत्वांच्या या सृष्टीत हनुमान ही तेज आणि वायू या तत्वांची देवता आहे. तेजतत्वातील आभास सिंदूरवर्णाचा असतो. हनुमानाचा वर्ण शेंदरीच आहे. यानंतर वायुतत्त्व येते. हनुमान वायुसुत असल्याने या ठिकाणीही त्याचे दर्शन होते. वायुतत्त्वाचा वेग तेजतत्त्वापेक्षा अधिक आहे. म्हणून हनुमंताला ''मनोजवं मारुततुल्यवेगं'' असे म्हटले आहे.

लांगूलउपनिषद हे तंत्रविद्येचे उपनिषद अथर्ववेदाशी संबंध आहे. त्यात हनुमंताची मानसपूजा सांगून शत्रुनाश,

आरोग्यप्राप्ती, भूतबाधा दूर होण्यासाठी प्रार्थना केली आहे. हनुमंत हा ईश्वराचाच अवतार असल्याचे स्पष्टपणे म्हटले आहे. हनुमान ही देवता आहे. दैनंदिन जीवनात स्थैर्य आणि मानसिक समाधान देणारी त्याची उपासना आहे. ही उपासना लौकिक कामनांची पूर्तता करणारी आहे. त्याचप्रमाणे भक्तिप्रदान करणारीही आहे. म्हणूनच अनेक सांप्रदायिक भक्तजन हनुमानाची उपासना भाविकतेने करताना दिसतात. हनुमंताचा स्वतःचा असा स्वतंत्र कोणताही पक्ष-पंथ-संप्रदाय नसताना इतक्या मोठ्या प्रमाणावर हनुमंताची उपासना केली जाते यातच त्याच्या उपासनेचे साफल्य सूचित होते. ही अमोघ फलदायी उपासना व्यक्तीव्यक्तीत आत्मविश्वास जागृत करते. म्हणूनच सर्व पंथोपंथांनी हनुमानाचा आपल्या दैवतोपासनेत समावेश केला आहे.

श्रीरामाचे उपास्यदैवतच रामकार्यासाठी श्रीरामाचा अनन्यसेवक हनुमानस्वरूपात अवतरले म्हणूनच रामभक्तांची कामना पूर्ण करण्याचे अभिवचन हनुमानाने रामरहस्योपनिषदात दिले आहे. एवढेच नव्हे तर कोणीही ऐहिक जीवनातील इच्छाआकांक्षाच्या पूर्ततेसाठी हनुमानाचेच स्मरण करावे असा फलदायी आशीर्वाद हनुमानाने दिला आहे तो असा

ऐहिकेषु च कार्येषु महापत्सु च सर्वदा।
नैव योज्यो राममन्त्रः केवलं मोक्षसाधकः।
ऐहिके समुनुप्राप्ते मां स्मरेद्रामसेवकम्॥

जैन धर्म संप्रदायानुसार हनुमान हा चोवीस कामदेवांपैकी अठरावा कामदेव आहे. तो वानरवंशीय असून याच्या राजध्वजावर वानराचे चिन्ह होते म्हणून त्याचे कुल वानरवंश नावाने प्रसिद्ध झाले. हनुमान हा गृहस्थाश्रमानंतर संन्यासी होऊन तपश्चर्येच्या बलावर त्याच जन्मात परमात्मा झाला असे जैनधर्मीय मानतात. रामायणातील हनुमानाप्रमाणे यातील हनुमान अत्यंत शूर आहे. सीतेचा लंकेत जाऊन शोध घेणे, लक्ष्मणाला शुद्धीवर आणण्यासाठी विशल्याला घेऊन येणे ही अत्यंत अवघड कामे त्याने केली.

मध्व संप्रदायानुसार हनुमान हा चोवीस कामदेवांपैकी अठरावा कामदेव आहे. वायुदेवाने विष्णूच्या कार्यासाठी तीन अवतार धारण केले.

प्रथमो हनुमान्नाम द्वितीयो भीम एव च
पूर्वप्रज्ञस्तृतीयस्तु भगवत् कार्यसाधकः॥

वायुदेवाच्या या तिन्ही अवतारांचा एकच हेतू होता तो म्हणजे धर्मरक्षण.

बाल्योर्बलाद् ज्ञानबलाच्च रक्ष्यो धर्मः।

स्वतः मध्वाचार्यांनी हनुमानाची भक्ती ही मनोवांछित सिद्ध करणारी असल्याचे म्हटले आहे. ज्ञान, वैभव, किंवा राज्यपद सुद्धा या भक्तीने प्राप्त होते, असे त्यांचे आश्वासन आहे.

वल्लभचार्यांच्या शुद्धाद्वैत परंपरेत देवता म्हणून हनुमानाला महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. शारदीय नवरात्रात श्रीराम व श्री हनुमान यांचे चार दिवस या संप्रदायात उत्सवाचे असतात. स्वतः श्रीमत् वल्लभचार्यांनी चित्रकूटावर राहून हनुमानाच्या साक्षीने वाल्मीकी रामायणाचे पारायण केले.

श्री चैतन्य महाप्रभू यांच्या संप्रदायाने हनुमानाला दास्य भक्तीचा आदर्श मानला आहे. स्वतः चैतन्य हे भगवान कृष्णाचा अवतार असून ते जगन्नाथपुरी येथील जगन्नाथाच्या रूपात विचरत आहेत तसेच त्यांच्या पट्टशिष्य मुरारी गुप्त हा प्रभूंची सेवा करण्यासाठी झालेला हनुमंताचा अवतार आहे असे म्हटले आहे.

शीख संप्रदायात गुरू गोविंदसिंहाचे ''गोविंद रामायण'' प्रसिद्ध आहे. यात गुरुंनी हनुमानाला इतके महत्त्व दिले आहे की हनुमानावाचून श्रीराम असहाय्य असलेला दाखवला आहे. तसेच त्यांनी हनुमानाला आपला गुणादर्श मानला आहे.

रामसनेही संप्रदायाने हनुमानाला ब्रह्मज्ञानी, गुरू, नामप्रेमी भक्त, कथारसिक श्रोता, आदर्श सेवक, शक्तिप्रमाण आणि तत्त्वप्रेमी स्वरूपात मानले आहे. रामानंदांनी आपल्या साहित्यात

आसुरी संपत्ती नष्ट करणारा शूर वीर योद्धा

भक्तरक्षकरूपी म्हणून हनुमानाचे वर्णन केले आहे. हरीचे (हनुमान) स्मरण केल्याने हरीची (राम) कृपा होते. जन्ममृत्यूचे भय उरत नाही. मनाची गती स्थिर झाल्यावर पंचप्राण सहायक होऊन साधक ब्रह्मानंदात मग्न होतो, ब्रह्मरूप होतो. ही ज्ञानाची अंतिम अवस्था आहे. ती ''ज्ञानिनामग्रगण्य'' हनुमानाच्या कृपेनेच साध्य होते अशी रामसनेही सांप्रदायिकांची श्रद्धा आहे.

रामकथा अर्थात रामायण हे केवळ ब्राह्मण किंवा वैदिक परंपरेची संपत्ती म्हणून प्रचारात राहिली असे नाही. इ.स. पूर्वी चारशे ते पाचशे वर्षांपूर्वी भारतातील मुख्य वैदिक समाजप्रवाहापासून फुटून बौद्ध आणि जैन यासारखे संप्रदाय वेगळे झाले.

या संप्रदायातील आचार्यांनी आपापले तत्त्वज्ञान लोकांपुढे मांडले. त्याचा खूप प्रचार केला व हे दोन्ही संप्रदाय चांगले विकसितही झाले. त्या काळी रामासंबंधीच्या कथा इतक्या लोकप्रिय झाल्या की नवसंप्रदायांना त्यांची उपेक्षा करणे शक्य नव्हते. रामाबरोबर हनुमान देखील लोकप्रिय झाला. वैदिक संप्रदायात त्याला स्वतंत्र देवता म्हणून मान्यता प्राप्त झाली आहे. रामोत्तरतापिनीय उपनिषदात हनुमानाला अकरावा रुद्र मानले आहे.

ॐ यो वै श्रीरामचन्द्रः स भगवान।

ये चैकादश रुद्रः भूर्भुवस्तस्मै वै नमो नमः ॥ (रामो.उप.३३)

श्रीमत् आद्य शंकराचार्यांनी आपल्या ''हनुमत्पंचरत्नस्तोत्रात'' हनुमानाची स्तुती केली आहे. तसेच त्याला आदर्श संन्यासी म्हटले आहे.

जातककथांवरून असे दिसते की , यक्ष हे रक्षणकारी देव मानले जात असत. ते द्वारपाल, संतान प्रदान करणारे, वृक्षांवर निवास करणारे मानले जात. प्राचीन काळी विघ्ननिवारण आणि भूतप्रेतपिशाच यांपासून रक्षण व्हावे असा उद्देश हनुमान पूजनात आहे असे दिसून येते. हीच परंपरा पुढे चालू राहिली, विकसित झाली याचे पुरावे आनंदरामायणात मिळतात.

हनुमान हा मूळचा शंकराचा सेवक होता अशी कल्पना बंगालकडील जैन संप्रदायात रूढ झाली. ''शिवराम'' युद्ध का झाले त्याचा परिणाम काय झाला यासंबंधी असे सांगण्यात येते की, वनवासात असताना लक्ष्मण नेहमी रामासाठी फळे आणि कंदमुळे आणण्यासाठी वनात जात असे. एकदा तो त्यासाठी शंकराच्या उद्यानाजवळ गेला. त्या उपवनाचा द्वारपाल हनुमान होता. त्याने लक्ष्मणाला अडविले तेव्हा दोघांत युद्ध झाले. लक्ष्मणाला उशीर झालेला पाहून राम त्याला शोधीत त्या ठिकाणी आला. तिकडून शंकरही आला. त्याचा परिणाम म्हणून राम व शंकर यांचे युद्ध झाले. दोघेही समान योद्धे ठरले. समेटाच्या अटीप्रमाणे हनुमान हा शंकराकडून रामाकडे सेवक म्हणून पाठविण्यात आला. त्या दिवसापासून हनुमानाचा शंकराशी असलेला संबंध संपुष्टात आला व तो रामभक्त बनला. या वरील सर्व गोष्टींवरून हनुमान हा रुद्राचा अवतार मानला जातो ही कल्पना फार प्राचीन काळापासून रूढ झाली आहे. दुसरी गोष्ट अशी हनुमानाचा, सेवक म्हणून का होईना शंकरासारख्या देवाशी संबंध मानला गेला आहे. दुसऱ्या कोणत्याही वानराचा नाही.

रामभक्ती आणि रामपूजा भारतात शेकडो वर्षे चालत आली आहे. परंतु रामाव्यतिरिक्त स्वतंत्र रीतीने देवत्व मानले जात असेल, पूजा केली जात असेल, शेकडो मंदिरे बांधली गेली असतील तर ती फक्त हनुमानाची. संख्येच्या दृष्टीने पाहिले तर, राममंदिरापेक्षा हनुमान मंदिरे भारतात अधिक आहेत. लक्ष्मण आणि हनुमान यांच्या कार्याची तुलना केली तर लक्ष्मणापेक्षा हनुमान हा अधिक रौद्रस्वरूप, वेगवान, संकटनिवारक सिद्ध होतो. हनुमंताच्या चरित्रातला अद्भुताचा अंश हा सूर्याला धरण्याच्या प्रयत्नातून, पर्वतच्या पर्वत एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेण्यातून प्राधान्याने व्यक्त होतो. परंतु हा सर्व कल्पनेचा खेळ आहे असे झंझावाताचे वर्णन करणाऱ्या डॉ. हेमंत विंडो यांच्यासारख्या वैज्ञानिकांच्या उल्लेखावरून म्हणता येणार नाही. (कोपता महाभूते मराठी आवृत्ती) यात त्यांनी म्हटले आहे की झंझावातात इतकी शक्ती सामावलेली असते की संबंध गाडीच्या गाडी इंजिनपासून वेगळी होऊन दुसऱ्या बाजूला फेकली जाते. तसेच ग्लॅडिएटर नावाच्या प्राण्याचे वैशिष्ट सांगताना त्यांनी म्हटले आहे की तो आकाशात खूप उंच झेप घेऊ शकतो. मग वानर जातीतील हनुमंताला आपल्या

शरीराचा आकार एकदम लहान मोठा करणे आपले पुच्छ वाढविणे या सर्व गोष्टी अगदी सहज शक्य होत्या.

पुराणांतून आणि संस्कृत नाटकांतून त्याच्या रुद्रत्वाच्या गुणांमुळे त्याने जेव्हा रावणावर एकच मुष्टि प्रहार केला तेव्हा रावणाचा आत्मविश्वास ढासळू लागला. हनुमंतात शिवशक्ती सामावलेली आहे व सबंध जगाचा संहार करण्याची शक्ती आहे असे पुराणातील अनेक कथातून दिसून येते. पैशाची तीर्थ, किष्किंधातीर्थ, हनुमत्केश्वर ही तीर्थक्षेत्रे हनुमंताच्या देवत्वविकासातील प्रमुख स्थाने ठरली, बृहन्नारदीय पुराणातून "नमो हनूमते मारुतसूनवे" अशा रीतीने उल्लेख करून त्याला वंदन केले आहे.

इ.स. पंधराव्या शतकापासून ते सतराव्या शतकाच्या कालात ग्रंथांनी पुरस्कृत केलेल्या सांप्रदायिक रामभक्तीच्या काळात राम आणि नारायण म्हणजेच विष्णू यांचे पूर्ण ऐक्य प्रतिष्ठित झाले आहे. यामुळे हनुमंतासारख्या उच्च कोटीच्या सर्वगुणसंपन्न भक्तांना देवत्व प्राप्त झाले. रुद्रावतार असलेल्या हनुमंताची रामभक्ती ही पुराणकालाने आपल्या पद्धतीने पुरस्कृत केलेल्या शिव आणि विष्णू यांच्या मूलभूत ऐक्याची निदर्शक आहे.

वरील सर्व वर्णनानुसार हनुमान वायुदेवाचा पुत्र म्हणून हळू हळू देव मानला जाऊ लागला. ही त्याच्या देवत्वाच्या विकासाची पहिली पायरी होय. दुसरी पायरी म्हणजे हा रुद्राचा अवतार मानला जाऊ लागला. रामभक्ती व भक्तीमुळे रामायणात प्राप्त झालेले त्याचे महत्त्वाचे स्थान ही तिसरी पायरी. रामलक्ष्मणाबरोबर त्याला स्थान मिळाले व वायुपुत्र हनुमान व रुद्रपुत्र हनुमान यांचे ऐक्य स्थापन झाले ही त्याच्या देवत्वाच्या विकासातील चौथी पायरी. नंतर हनुमानाला रामादिकांचा सपिण्ड बंधू समजू लागले ही त्याच्या देवत्वविकासातील पाचवी पायरी. दशरथाने पुत्रकामेष्टी यज्ञाच्या वेळी जो पायसाचा भाग आपल्या राण्यांना दिला त्यातलाच भाग गृध्रीने उचलून तो खाली पाडल्यावर वानराच्या पत्नीने अंजनीने खाल्ला. राण्यांना गर्भ राहिला तसेच अंजनीलाही राहिला व हनुमानाचा जन्म झाला म्हणून ते सपिण्ड बंधू ठरतात. (आनंदरामायण) (रचनाकाल सुमारे १४ वे शतक)

अशा प्रकारे हनुमानाला लाभलेले हे देवत्व त्याच्या अनेक गुणसमुच्चयामुळे आहे, हे तर खरेच, पण त्याच्या देवमूर्तीतील विविधता आणि भव्यता ही पण काही अंशी त्याला कारण आहे. त्याशिवाय भक्ती, शक्ती, मुक्ती, ईशशरणागती आणि त्या समर्पित भावामुळे होणारी कार्यसिद्धी या सर्वांचे हनुमान हे प्रतीक आहे. या प्रतीकभावनेमुळेच हनुमानाचे देवत्व सर्व संप्रदायांत व सर्व प्रकारच्या साधनमार्गात मान्यता पावले, स्थिरपर झाले, असे या हनुमानाच्या देवत्वविकासाच्या अभ्यासातून लक्षात येईल.

•••

(पान क्र. २७ वरून)

## "धर्मप्रसाराचे काही नमुने"

येऊन यश मिळविले आहे, हे नवहिंदूंना पक्के माहीत आहे. त्या मिशनऱ्यांची तंत्रे त्यांना पण ठाऊक आहेत. अशा बाहेरच्या सोनारांनी आमचे कान टोचायला सुरुवात केली आहे. जितके लवकर जागे होऊन आम्ही आमच्या धर्माचे रक्षण करू तेवढे चांगले हे लक्षात घ्यायला हवे. धर्मसंरक्षण व संस्कृतिसंरक्षण करणाऱ्यांची थट्टामस्करी करण्याचे दिवस संपले आहेत. आमचा धर्म सनातन आहे त्याला कुणापासून भीती नाही, हा भ्रम लवकरात लवकर टाकून दिला पाहिजे. "ॲलीस इन वंडरलंड" मध्ये इतरांच्या पासून दूर ॲलीस जिथे होती ते स्थान टिकवून धरण्यासाठी सुद्धा तिला सतत धावण्याची जरूर आहे हे कळून चुकले होते. जगातील धर्मांच्या अनुयायांच्या टक्केवारीत सध्याच्या प्रमाणात आम्हाला रहायचे असले तरी दुसऱ्या धर्मातील लोकांना आकृष्ट करण्याची जरूर आहे ह्याची जाणीव सतत ठेवायला हवी. वेळ पडली तर पैसे जमा करून हिंदुधर्माच्या प्रचारासाठी इकडच्या लोकांना परदेशात दूरदूरवर पाठविण्याची वेळ आली आहे. तसेच कुठल्याही कारणामुळे, विशेषत: जबरदस्ती झाल्यामुळे मुळचे हिंदू धर्मांतरित केले जातात त्यांना अभय देऊन, त्यांना सामावून घेण्याची मनाची तयारी दाखविण्याची आपणा सर्वांवर वेळ आली आहे. ही सामुदायिक जबाबदारी आहे.

•••

# आवटी अभ्यास : एक दुर्लक्षित नाणकशास्त्रीय पैलू

पद्माकर प्र. प्रभुणे

## प्रास्ताविक

भारतविज्ञान वा भारतीय विद्या, पुरातत्त्वशास्त्र व इतिहास यातील एक गतिमान घटकशास्त्र म्हणजे नाणकशास्त्र होय. भारतीय संदर्भात नाण्यांचा पद्धतबद्ध शास्त्रशुद्ध अभ्यास जरी भारतीय प्रबोधन काळात, ब्रिटिश आगमनोत्तर सुरू झाला तरी त्याचे, राजांचा, राजवंशांचा इतिहास शोधणे असे मर्यादित कार्य होते. राजकीय इतिहास म्हणजेच ''इतिहास'' अशा विचारांचा प्रभावाच्या युगात नाण्यांचा विचार हा आर्थिक व सामाजिक संदर्भात होणे कठीण होते, पण आता मात्र तसा विचार सुरू झाला आहे. यामुळेच ''नाणे व ते काढणारा राजा'' असा दूरध्वनीच्या वादीसदृष विचार न होता नाणकशास्त्राच्या अध्ययनाने इतिहासातील संकल्पना आणि संस्था, इतिहासातील प्रवाह, परिवर्तनात्मक कालखंड, स्थितिबदल तसेच सातत्य बदल यांचा अभ्यास सुरू झाला.

## नाणी आणि राजकीय अर्थशास्त्र

नाण्यांवरील चिह्ने, आकृत्या, लिप्या अनेक गोष्टींबाबत माहिती देत असतील तरी मूलतः नाणे [१] हे आर्थिक क्रियादर्शक विनिमय माध्यम वा साधन आहे. नाण्यांमुळे समजणाऱ्या राजकीय इतिहासास त्याज्य न ठरवता, त्याचाही आधार घेऊन एकंदर राज्याच्या अर्थशास्त्राच्या दृष्टिकोणातून (पॉलिटिकल इकॉनॉमी) भारतीय नाणकशास्त्राचा अभ्यास झाला नसला तरी त्या दिशेने परिणामकारक ठरणारा अभ्यास दिसू लागला आहे.

## आधुनिक प्रयत्न

भारतीय संदर्भात विशिष्ट काळाच्या चौकटीत, एका राजवटीत झालेले नाण्यांचे एकूण उत्पादन, पर्यायाने चलनातील बहुंशी नाण्यांची संख्या व त्या आधारे राज्याच्या आर्थिक क्षमतेचा विचार अझीझा हसन व शिरीन मोसवीसारख्यांनी सुरू केला आहे. शिरीन मोसवींनी [२] १७व्या शतकाच्या पूर्वार्धात, सुरत टांकसाळीतून उत्पादित नाणकसंख्या, इतर टांकसाळीतील उत्पादन या संदर्भात मुघल कालीन नाणीउत्पादनसंख्या ग्रांथिक आधारांनी सिद्ध करण्याचा स्तुत्य प्रयत्न केला आहे. त्याबद्दल महत्त्वपूर्ण दुरुस्त्या जरी फ्रँक पर्लिन [३] यांनी सुचविल्या असल्या, तरी मूळ विचारचौकटीला त्यात धक्का नाही, उलट त्याचा विचार पर्लिन यांनीही केला आहे.

## सर्वंकष दृष्टिकोण

उपरिनिर्दिष्ट विवेचनाचे तात्पर्य असे की, नाण्याचे ''एकक'' पुरावा स्वरूपात अध्ययन न करता मोठ्या संख्येच्या संदर्भात व्यापक सर्वंकष दृष्टिकोण त्यांनी स्वीकारलेला दिसतो. आवटी अभ्यासासारखी तौलनिक दृष्ट्या अज्ञात अभ्यास पद्धती या बाबतीत मोठ्या प्रमाणात मार्गदर्शक ठरू शकते.

## आवटी आणि आवटी अभ्यास

या शब्दांमुळे कोणीही संभ्रमात पडण्याची शक्यता आहे, कारण ''डाय स्ट्रक'' या नाणेउत्पादनपद्धतीतील ''डाय'' (Die) या शब्दार्थ मराठी भाषेत केलेली ही सर्वप्रथम ''नव्यशब्दयोजना'' [४] आहे. यापूर्वी ''डाय''साठी ''ठसा'', ''शिक्का'' असे, मूळ वस्तूचे आसपास वर्णन करणारे पण अचूक नसणारे शब्द वापरत. ''डायस्टडीज्'' या, नाणकशास्त्रातील अत्याधुनिक अभ्यास पद्धतीसाठी प्रस्तुत लेखकाने ''आवटी अभ्यास'' असा शब्दवापर केला आहे. ''सेलवुड'' या विद्वानाच्या प्रयोगसिद्ध सर्वमान्य अशा, २:१ अशा प्रमाणाच्या आवटीतून साधारणतः १०,००० नाणी पडतात. या घटितावर ''आवटी-अभ्यास'' आधारलेला आहे. परदेशीय अभ्यासकांच्या मते, आवटी अभ्यास म्हणजे ''आवटीहत'' (डाय स्ट्रक) उत्पादन पद्धतीत खालची ऐरण आवटी (Anvil Die) जी ऐरण लाकडात, जमिनीत घट्ट बसवतात व वरील हातोडा आवटी (हॅमर डाय) जी हलकी

असते, त्यांच्यावर वांछित चिन्हे वा लिपीचे अर्धउठावात उलट दिशेने खनन केलेले असते. या दोन्हीत धातूची विशिष्ट आकाराची चकती वा गोळा ठेवतात व साधारणतः ३ ते ५ टनाच्या ताकदीचा घणाघात नाणे तयार करतो. या प्रक्रियेत ऐरण आवटी जास्त टिकते. ऐरण आवटीतून १०,००० नाणी पडतात तेव्हा हातोडा आवटी ५,००० नाणी पाडू शकते. म्हणजेच २ हातोडा:१ऐरण आवटी जोडीतून १०,००० नाणी उत्पादित होतात. मूळ ग्रीक तसेच ग्रीकोभारतीय नाण्यांवरील विद्वान कथित टांकसाळ चिह्ने (मोनोग्राम्स) मधील सातत्य व राजांच्या चेहऱ्यातील बदल यांच्या अध्ययनाने वरील प्रतिमान हे सर्व विचारान्ती भारतीय नाणकशास्त्रात उपयुक्त ठरू पाहत आहे. भारतीय अभ्यासकांत श्री. अमितेश्वर झा यांनी या अध्ययन पद्धतीचा विशेष अभ्यास आणि प्रसार केला आहे व मिनंडर या ग्रीको-भारतीय राजाच्या नाण्यांचा असा अभ्यास ' सर्वप्रथम त्यांनी केलेला दिसतो. जॉन डेयाल् (Deyell) यांनी त्यांच्या विख्यात प्रबंधात ''लिव्हिंग विदाऊट सिल्वर'', आवटी अध्ययन तंत्राचा आधार घेतला आहे. बैल आणि घोडेस्वार या प्रकाराची ४० लाख ते १ कोटी नाणी असावीत असा साधार तर्क केला आहे.

### उपलब्ध भारतीय आवटी

नाणकशास्त्रीय ग्रंथात प्रकाशित आवट्यांची संख्या नगण्य आहे. ''आहत'' नाण्याची, आहत नाण्यांच्या प्रचलन समकालीन वा किंचित उत्तरकालीन खोट्या नाण्यांची (Contemporary Forgery) आवटी नुकतीच दक्षिणेत कारूर येथे मिळाली आहे. ' ग्रीको-भारतीय नाण्यांच्या आवटी उपलब्ध आहे. उत्तरप्राचीन व पूर्वमध्य युगात प्रसिद्ध ''गधिया'' प्रकारच्या नाण्यांच्या ' आवटी प्रकाशित झाल्या आहेत. मध्ययुगातील ''शिवराई'' प्रकारच्या नाण्याच्या अत्यंत दुर्मिळ अप्रकाशित आवटी प्रस्तुत लेखकाच्या पाहण्यात आल्या आहेत. मराठा नाण्यांतील होळकरांसारख्या संस्थानिकांच्या नाण्यांच्या आवटी ' प्रकाशित आहेत.

### आवटीअध्ययन पूर्वअटी

या ठिकाणी एक गोष्ट लक्षात घेण्याची आवश्यकता आहे ती अशी की, ''आवटी अभ्यास'' हा आवटीहत (डाय स्ट्रक) नाण्यांच्या विशेष संदर्भात करण्याचा अभ्यास आहे. 'आहत पद्धती', 'साचा पद्धती', 'उत्पीडीताइक' वा 'पृष्ठोत्थापित' पद्धती इत्यादींत, साचा पद्धत वगळता इतरांत आवटीचा वापर असू शकतो पण दोन आवटींच्या अनुपस्थितीत मूलार्थाने त्याचा अभ्यास होत नाही.

प्राचीन व मध्ययुगीन नाणीउत्पादनपद्धतींचा विचार केला असता कमीत कमी ६० टक्क्यांच्या वर उपलब्ध नाणी ही आवटीहत (डायस्ट्रक) तंत्रोत्पादित आहेत हे सिद्ध आहे. प्राचीन व मुख्यतः मध्ययुगीन नाण्यांसंदर्भात ग्रांथिक पुरावे, मध्ययुगीन चित्रे ' नाणी यांचा बारकाईने अभ्यास केल्यास एक लक्षात येते की, मूळ तंत्रात विशेष बदल दिसत नाही. बदल जरूर दिसतो, पण तो ''आवटी खनन'' (डाय एनग्रेव्हिंग) ऐरण आवटी, ऐरण, लाकूड, जमीन कशात बसवायची असा तपशिलांचा फरक दिसतो. प्रस्तुत लेखकाच्या मते याचा मध्ययुगीन संदर्भात विचार जास्त साधार, ससंदर्भ ठरेल. आवटीअभ्यासात '' खरे तर, आवटीचा धातू (तो लोखंड किंवा पंचरसी धातू असतो), नाण्याचे उत्पादन शीत आहे का उष्ण आहे, धातूंचा विचार, धातूंची आभ्यंतर प्रसरणशीलता, विलयबिंदू आणि प्रसरण, धातूंची तन्यता (Ductility) तसेच 'आवटीहत' पद्धतीतून झालेले गमतीशीर उत्पादन, उदा. दुबार आवटीहतता, मुद्रासंकर, उभयावर्ती समरूपता (Brokage) आवटी सरकरण, (एखाद्या नाण्याच्या आवटी उपलब्ध असल्यास) त्यावरील बहुघणाघातोत्पन्न दातेरीपण, या सर्वांचा आवटी अध्ययनात समावेश होतो. या सर्व एकत्रित घटकांच्या संदर्भात अगदी एका प्रकारच्या नाण्याचाही अभ्यास झालेला नाही.

आत्तापर्यंतच्या कामांवरून लक्षात येते की, ''आवटी अभ्यास'' हा काही सुरेखित, उत्तम स्थितील, सुंदर नाण्यांसाठीच केला गेला आहे. मध्ययुगीन भारतीय नाणी ही प्राचीन ग्रीक नाण्यांइतकी सुरेखित नाहीत, त्यामुळे सूक्ष्म बदल व्यक्त करण्यास ती कमी पडतही असतील, पण याचा अर्थ, आवटीअभ्यासतंत्रास ती अस्पृश्य आहेत असा नव्हे.

भारताच्या राजकीय इतिहासाप्रमाणे,

नाणकशास्त्रीय इतिहासही ''उत्तरकेंद्रित'' असल्याने, भारतीय नाणकशास्त्रात मराठा नाणकशास्त्राची भरपूर उपेक्षा झाली आहे. प्रस्तुत लेखकाच्या मते, मराठा कालखंडात खाजगी टांकसाळ - उत्पादन मोठ्या प्रमाणात असतानाही, मराठा नाण्यांसाठी आवटीअभ्यासतंत्र वापरता येईल. मध्ययुगीन भारत व महाराष्ट्रातील आवटीहत नाणी मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहेत. ठक्कुरा फेरूच्या ''मुद्रापरीक्षे'' सारख्या ग्रंथांपासून पेशवेदफ्तरातील शेकडो टांकसाळ संबंधी मोडी कागदपत्रांपर्यंत लिखित साधने उपलब्ध आहेत, चित्रे आहेत. मराठा मिंटस् अँण्ड कॉइनेज'' '' सारखे ग्रंथ आहेत. त्यामुळे आवटी अभ्यास सुसंदर्भित ठरेल.

## नाणे स्वयंसिद्ध पुरावा

नाणकशास्त्राच्या तत्त्वज्ञानातील एका महत्वाच्या घटकाबाबत, रे अँबर वेगळ्या संदर्भात लिहून जातो, "Theories which rest on single coins, for example, and these not always perfect, need more confirmation from further discoveries."

याचे पुरेसे भान बाळगून नाणे काही करू शकते का? हे आपण पाहू. आवटींच्या २:१ जोडीतून साधारणतः १०,००० नाणी पडतात, यात प्रकारनिहाय संख्या शास्त्रीय विचार केल्यास, १) आवट्यांच्या अपघाती वा काही कारणाने खराब झाल्याने अगदी १०० नाणीही पडतील अथवा २) त्यातून कमाल १०,००० नाणीही पडतील. या दोन्हीबाबत अगदी मध्यही न धरता कमीत कमी ३,००० नाणी पडतात अशी संख्या गृहीत धरल्यास, पाडण्यात आलेल्या १ नाण्यावरूनही कमीत कमी ३,००० नाणी पाडली गेल्याचे गृहीतक तयार होऊ शकते व उपलब्ध संचय वा संग्राहक संग्रहांच्या अवलोकनाने ते सिद्ध करता येते. म्हणजेच मध्ययुगीन संदर्भात, साधारणतः अगदी एक आवटीहत नाणी हे स्वयंसिद्ध पुरावा (Axiom) ठरते.

## नाण्यांवरील चिह्ने वा अक्षरांचे अध्ययन

उदाहरण घ्यायचे झाल्यास, शिवराईसारख्या नाण्याच्या एकाच प्रकारची (टाईप) अनेक नाणी जमवून, त्यांच्या अक्षरांची जाडी, उत्तम स्थितीतील नाण्यांच्या अक्षरांची, यांच्या संदर्भात, भरपूर वापरून झिजलेल्या आवटीतून पडलेले एक नाणे, तत्पूर्व उत्पादित हजारो नाण्यांबाबत माहिती देते. प्रस्तुत अभ्यास लेखकाच्या वैयक्तिक संग्रहातील नाण्यांवर आधारित आहे.

## आधुनिक दृष्टिकोणातून उत्पादनचुका

मुद्रासंकर, दुबार आवटी-हतता (डबल डाय स्ट्रकिंग) उभयावर्ती समरूपता यांचा विचार मराठा नाण्यांबाबत अगत्याचा आहे. उदा. शिवराई प्रकारच्या एका प्रकारात ''राजा'' ही अक्षरे अपसव्य पद्धतीने पडलेली दिसतात. समोरील ''सव्य'' पद्धतीचा मजकूर ''अपसव्य'' कोरताना चुकून ''सव्य'' पद्धतीने कोरला गेल्याने त्या आवटीतून पडलेल्या नाण्यात ही गंमत दिसते.

बऱ्याच शिवराई नाण्यांच्या चकत्या नाणी पडताना सरकलेल्या दिसतात. पेशवेकाली बहुशः ''शिवराया'' या मुख्य आवटीच्या घेऱ्याच्या बाहेर (Off the flan) दिसतात, ही गोष्ट ज्याप्रमाणे वेगवान हस्तनाणेउत्पादन[11] द्योतक असू शकते, त्याप्रमाणे त्या प्रकाराच्या असीम लोकमान्यतेचीही द्योतक आहे. मूळ ग्रीकोभारतीय नाण्यांवरील राजप्रतिमेभोवतालचा ग्रीक लेख '' गुप्तकालीन राजप्रतिङ्कित नाण्यात ज्या परंपरेच्या अंधानुकरणाने निरर्थकपणे दिसतो, याची आणि मूळ शिवराई छापाचा मजकूर व उत्तर ब्रिटिश कालीन शिवरायांवरील फक्त ''राजा'' शब्द यांची तुलना करावीशी वाटते. उत्तर पेशवेकालीन शिवराईवरील सरकलेल्या मजकुराचे स्वरूप लक्षात न आल्याने, काही पूर्वसूरी अभ्यासकांनी मराठाकालीन शिवराया वापरून झिजल्या आहेत, असा चुकीचा तर्क केलेला होता.

छत्रपती शिवाजीच्या मूळ शिवराई नाण्यांवरील मजकूर परिवेष्टीत बिंदुमयता, ही नक्षी नसून, अर्वाचीन काळातील इंग्रजी नाण्यांवरील नाण्याचे, लेखन वा चिन्ह परिक्षेत्र निर्धारित करणाऱ्या ''कॉलर'' ची मध्ययुगीन पूर्वसूरी आहे, हे आवटी अभ्यासामुळे लक्षात येते. तसेच या ''कॉलर'' मुळे आवटीची यथातथ्यता समजू शकते. नाणी आणि आवटी अभ्यासाचा उपरिनिर्दिष्ट विचार आपण 'स्थालीपुलाक न्यायाने' करत आहोत.

## सारांश

राजकीय अर्थशास्त्राच्या अध्ययनास उपयुक्त अशा, चलनातील नाण्यांच्या संख्येच्या कमाल शक्यतेसाठी आवटी अध्ययनाचे प्रतिमान वापरता येते. काही मर्यादांसह ते मध्ययुगीन नाणकशास्त्रासाठी उपयुक्त ठरत आहे. 'परिकल्पित' आणि 'चिकित्सक' अशा दोन्ही इतिहास पद्धती ज्याच्यात समन्वयाने दिसतात, जे पद्धत म्हणून प्रयोगशील आहे[१५], अशा आवटीअभ्यास या प्रतिमानाच्या सहाय्याने नाणी, ग्रांथिक पुराव्यांसह नाण्यांचे 'विविध-प्रान्त-विशिष्ट-प्रकारनिहाय-संचय-संदर्भित अध्ययन' नाणकशास्त्रातील अनेक कोडी सोडवू शकते. अंतिमत: शास्त्राप्रमाणेच, "The important things in Numismatics is not so much to discover new facts, as to discover new ways of thinking about them."

असे म्हणता येईल. त्या दिशेने केलेला वरील विचार हा एक प्रयत्न आहे.

## संदर्भ आणि टीपा


१. ठराविक वजनाचा, त्यातील धातूच्या शुद्धतेविषयी वा मूल्याविषयी खात्री देणारी चिन्हे, लिपी, आकृत्या असणारा, खाजगी वा सरकारी अधिकाराने कायदेशीर रीत्या उत्पादित धातूचा तुकडा, जो विनिमय माध्यम म्हणून वापरतात, म्हणजे नाणे होय.

२. Shireen Moosvi, 'Money Supply and the Silver influx', pp.17-19.

३. Frank Prelin, 'Money use in late pre-colonial India', Appendix 4, The Imperial Monetary System of Mughal India, 1987, Oxford Pub. (Delhi) pp.342-343.

४. प्रस्तुत शब्द, ''डाय'' शब्दासाठी धातुकाम करणाऱ्या सर्व लोकांत प्रचलित असून अचूक अर्थवाही आहे. त्यामुळे प्रस्तुत लेखकाद्वारे ही नव्यशब्दघटना नसून ''योजना'' आहे.

५. Amitoshwar Jha, coins of Menander...: A Die study, 'Ex-Moneta, Ed. Biswajeet Rath, etc. (under Print)

६. P.V. Radhakrishnan, 'A punch-marked Die from Karur, studies in South Indian coins, Vol.IV, 1994, (Madras), pp.51-56.

७. M.K.Gupta, 'Two Dice of Gadhaiya coins' oriental Numismatic studies, Vol-I, 1996, (N.Delhi) p.13, plate VIII.

८. P.K. Sethi, S.K.Bhatt, R. Holkar, 'A study of Holkar State coinage, 1976, (Indore), pp. 68-88, 98, 100-103, plate XX.

९. (Striking coinage at Mint Calcutta, 1792, painted by Arthur William Den's) in, Denis R. Cooper, the art and craft of coinmaking, A history of Minting technology, 1988, Spink and Son, p.26, fig. 23.

१०. Phillip Gaierson, 'The Making of coin', 1975, Oxford Univ. Press, London, pp. 94-123.

११. K.K.Maheshwari, K.W.Wiggins, Indian Institute of Reasearch in Numismatic studies, 1988, Anjaneri, Nasik.

१२. समाविष्ट, शशिकांत धोपाटे, दुर्मिळ कृतज्ञता आणि एक दुर्मिळ नाणे, लोकसत्ता दि. १०.३.९१.

१३. B.N. Mukherjee, P.K.D.Lee, Technology of Indian coinage, 1988, Indian Museum (Calcutta), pp. 20-21.

१४. बॅसिलिअस सोतेरस मिनांद

वैयक्तिक संग्रहातील ग्रीको-भारतीय राजा मिनॅंडर याच्या नाण्यावरील लेख,

१५. ''ऐन-ए-अकबरी'' सारख्या ग्रंथातील वर्णनाबरहुकूम आपण आजही नाणी उत्पादन करून पाहू शकतो. आवटीच्या या अभ्यासात प्रयोगांची आवश्यकता आहे.



टीप : प्रस्तुत शोधनिबंधासाठी उपयुक्त ग्रंथ, लेखकास अंजनेरी येथील भारतीय शोध संस्थान या संस्थेत अभ्यासायला मिळाल्याबद्दल, तसेच तेथील संशोधक तज्ज्ञांसहित झालेल्या चर्चेबद्दल लेखक संस्थान, त्यातील तज्ज्ञ व ग्रंथपाल यांचा मन:पूर्वक आभारी आहे. त्याचप्रमाणे लेखक त्याचे पुणे येथील मानसशास्त्राचे व्याख्याता मित्र श्री. विवेक वेल्हेकर यांचाही आभारी आहे.


•••

# दिवस उत्साहाचे आणि उत्सवांचे !
# कार्यक्रमांचे आणि व्याख्यानांचे !!

**प्रा. मोहन पाठक**

डिसेंबर महिना जवळ आला की परिसरातील दिवस एका वेगळ्याच उत्साहाने उगवायला सुरुवात होते. निरनिराळे कार्यक्रम, 'डेज', स्नेहसंमेलने या सर्वांचे वेध लागण्यास सुरुवात होते. परंतु दिवाळीची सुट्टी संपली तीच मुळी परीक्षांचे टेन्शन घेऊन. शिवाय आपापल्या परीने प्रॉजेक्टस्‌ची जुळवाजुळव करण्यासाठीही धावपळ होतीच.

पण या धावपळीतही आता डिसेंबर उजाडताना थंडीच्या सुखद दिवसांत एक नवरंगी उत्साह वातावरणात तरंगेल, आकांक्षांना पुन्हा उत्सवांचे रूप येईल आणि विविध स्पर्धा, कार्यक्रमांत नाताळाच्या सुट्ट्या कधी लागतील ते समजायचेही नाही. तत्पूर्वी नोव्हेंबरपर्यंतच्या काही बातम्या अशा -

**विद्या प्रसारक मंडळाची व्याख्यानमाला**

विद्याप्रसारक मंडळ संयोजित करीत असलेल्या भावे राष्ट्रीय व्याख्यान मालेचे हे २६ वे वर्ष होते. ठाण्याचे जुने




डावीकडून भावे व्याख्यानमालेत बोलताना डॉ. वा.ना. बेडेकर व प्रा. सायनेकर (सोबत श्री. वसंतराव भावे व डॉ. सौ. विजया वाड)

रहिवासी कै. नाना भावे यांनी आपल्या दोन दिवंगत पुत्रांच्या स्मरणार्थ ठेवलेल्या देणगीतून व नंतर त्यांचे एक चिरंजीव श्री. वसंतराव भावे यांनी या रकमेत केलेल्या वाढीतून ही व्याख्यानमाला आयोजित केली जाते. यंदा दि. २५ रोजी डॉ. बेडेकर विद्यामंदिरात तर दि. २६ नोव्हेंबर रोजी थोरले बाजीराव सभागृहात या व्याख्यानमालेतील व्याख्याने संपन्न झाली.

दि. २५ रोजी शाळेत झालेल्या कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्थिनींनी सादर केलेल्या स्वागतगीत व ईशस्तवनाने झाली. त्यांना आशा वाड यांचे मार्गदर्शन लाभले होते. विद्याप्रसारक मंडळाचे कार्यवाह श्री. अ.धों. टिल्लू यांनी प्रास्ताविक करताना कै. नारायणराव भावे यांच्या दातृत्वाचा विशेष उल्लेख करून व्याख्यानमालेत आजवर येऊन गेलेल्या वक्त्यांची माहिती दिली. या वर्षीच्या वक्त्या डॉ. सौ. विजया वाड यांचा परिचय सौ. सुमेधा कुलकर्णी यांनी करून दिला.

स्त्री चळवळीविषयी बोलताना डॉ. सौ. विजया वाड म्हणाल्या, 'अनुकंपवादी व उदारमतवादी टप्प्यांतून आलेली स्त्री चळवळ आज परिवर्तनवादी टप्प्यात आहे' त्यांनी स्त्रियांवर आजही होणारे अन्याय अनेक किस्से व उदाहरणे सांगून स्पष्ट केले. बलात्कार, हुंडा, स्त्रीची मिळकत, वारसाहक्क, अशा अनेक कठीण वाटणाऱ्या समस्यांच्या संदर्भात त्यांनी विचारमंथन केले. राष्ट्रीय विकासातील स्त्रीची भूमिका स्पष्ट करून सांगताना त्या म्हणाल्या, मुलींमध्ये

निर्णयक्षमता वाढविण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न पालकांनी करावयास हवा.''

समारंभाच्या अध्यक्षस्थानी असणारे आदरणीय डॉ. वा.ना. बेडेकर आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले, ' कै. नारायणराव भावे यांच्या अनेक आठवणी मला आजही आठवतात. विद्याप्रसारक मंडळ त्यांनी व्याख्यानमालेसाठी दिलेल्या या ठेवीबद्दल त्यांचे कायम कृतज्ञ आहे. मंडळाचे कार्याध्यक्ष श्री. श्री.वि. करंदीकर यांनी आभारप्रदर्शन केले. तर सौ. वीणा जोशी यांनी पसायदान सादर केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. सुनिता केळकर यांनी केले. पहिल्या दिवशी कार्यक्रमास विद्याप्रसारक मंडळाचे कार्यकारिणी सदस्य, बांदोडकर महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. सी.म. सारंग, डॉ. बेडेकर विद्या मंदिरचे माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक श्री. अ.वि. सहस्त्रबुद्धे, ए.के. जोशी, इंग्रजी माध्यमाच्या मुख्याध्यापिका सौ. कालिंदी कोल्हटकर व अन्य मान्यवर उपस्थित होते.

## दुसरा दिवस

दुसऱ्या दिवशी विद्या प्रसारक मंडळाच्या जोशी बेडेकर महाविद्यालयातील इंग्रजी विभागातील वरिष्ठ प्राध्यापक मुरलीधर सायनेकर यांचे ईश वास्योपनिषद या विषयावर व्याख्यान होते. या दिवशीच्या कार्यक्रमाचे प्रास्ताविक माननीय कार्याध्यक्ष श्री. श्री. वि. करंदीकर यांनी केले. सायनेकर सरांचा परिचय मी करून दिला.

प्रा. सायनेकर म्हणाले, ' अध्यात्माच्या संदर्भात समाजामध्ये विपुल अज्ञान आणि निष्क्रियता आहे. आपल्या कर्तव्यापासून दूर जाणे याचा अर्थ अध्यात्म नाही. खरी प्रगती साधावयाची असेल तर आपल्या मूळ आध्यात्मिक संचिताकडे वळण्याची भारतात गरज आहे. चारित्र्यसंपन्नता नसेल तर प्रगतीला अर्थ नाही ही माझी जीवननिष्ठा आहे.''

प्रा. सायनेकर यांनी ईशवास्योपनिषदातील अठरा श्लोकांमधील अर्थ विशद करून त्यावर विद्वत्ताप्रचुर भाष्य केले. आभारप्रदर्शन माननीय कार्यवाह श्री. अ.धों.टिल्लू यांनी केले तर कला वाणिज्य महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा. नारायण बारदे यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ.वा.ना. बेडेकर उपस्थित होते. कार्यक्रमास मंडळाचे सदस्य, बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य सी.जी. पाटील, कला वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य सदाशिवराव गोखले व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाची विद्यार्थिनी कु. मधुरा मोडक हिच्या पसायदानाने कार्यक्रमाचा समारोप झाला. दोन्ही दिवसांच्या आयोजनासाठी विद्या प्रसारक मंडळाच्या कार्यालयातील सौ. जोशी, सुगंधा चव्हाण, कावणकर आदी सहकाऱ्यांनी विशेष कष्ट घेतले.

## एक वेगळा प्रकाशन समारंभ

डॉ. बेडेकर विद्यामंदिर माध्यमिक विभागाचे पहिले मुख्याध्यापक व तत्कालीन कार्यकारिणीचे उपाध्यक्ष कै. धो.व. टिल्लू हे अत्यंत व्यासंगी अभ्यासक म्हणून प्रसिद्ध होते. त्यांच्या हयातीत त्यांनी संपादित करून ठेवलेल्या कवींनी केलेल्या काव्यविषयक व कवितांविषयक कवितांचे आगळेवेगळे हस्तलिखित आमच्या संस्थेचे विद्यमान कार्यवाह व कै. धों.व. टिल्लू यांचे सुपुत्र श्री. अ.धों. टिल्लू यांच्या हस्ते झाले. त्यानंतर बरीच वर्षे माननीय टिल्लूसर व मी हा काव्य संग्रह यावा या प्रयत्नांत होतो. मराठीतील थोर कवी कविवर्य मंगेश पाडगावकर यांची उत्कृष्ट प्रस्तावना काव्यसंग्रहास लाभली. त्यानंतर कला वाणिज्य महाविद्यालयाच्या मराठी विभागाचे प्रमुख व व्यासंगी साहित्यिक प्रा. दामोदर मोरे यांनी काव्यदृष्टीचा मराठीतील विकास यावर उत्तम लेख लिहून काव्यसंग्रह सिद्ध होण्यास मोलाची मदत केली. मराठी विभागातीलच नवे प्राध्यापक संतोष राणे, फुलराणी प्रकाशनाचे श्री. प्रदीप गुजर, रूपारेल महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा. प्रदीप कर्णिक, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयाचे श्री. भगत, सौ. मीरा सावंत, सौ. नीता भोगल आदी अनेकांचे या काव्य संग्रहनिर्मितीत सहकार्य लाभले.

या काव्यसंग्रहाचे प्रकाशन २९ नोव्हेंबर रोजी ठाण्याचे मराठी ग्रंथ संग्रहालय व शारदा प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने संपन्न झाले. मराठीतील ख्यातनाम व युगप्रवर्तक कवी नारायण सुर्वे, प्रख्यात समीक्षक व अभ्यासक प्रा. रमेश तेंडुलकर या समारंभास उपस्थित होते. प्रकाशन श्री. सुर्वे यांच्या हस्ते झाले. त्यांनी व प्रा. रमेश तेंडुलकरांनी या आगळ्यावेगळ्या काव्यसंकलनाचे महत्त्व स्पष्ट करून सदर

काव्यसंग्रह अनेक भागांतून येण्यासाठी प्रकल्प हाती घेतला पाहिजे असे मत व्यक्त केले. प्रा. दामोदर मोरे, प्रा. संतोष राणे यांनी कार्यक्रमासाठी अथक प्रयत्न केले.

**बांदोडकर विज्ञान महाविद्यालय**

आमच्या महाविद्यालयातील एक वरिष्ठ प्राध्यापक डॉ. रघुनाथ आठल्ये (प्राणिशास्त्र विभाग) यांनी १९८८ साली पीएच.डी. या पदवीसाठी ठाण्याच्या खाडीमधील प्रदूषणासंदर्भातील Status of Macrobenthos in Detritus food chain of Thane Creek near Thane city हा प्रबंध तयार केला होता. या प्रबंधाच्या मार्गदर्शिका त्या वेळी या विभागात काम करणाऱ्या प्रा. डॉ. सौ. गोखले या होत्या.

या प्रबंधातील एक शोधनिबंध अलिकडेच मुंबई मधील प्रख्यात अशा बॉम्बे नॅचरल हिस्टरी सोसायटीच्या संशोधनपत्रिकेत (खंड ९५(२) ऑग.९८) प्रसिद्ध झाला आहे. या शोधनिबंधाचे शीर्षक प्रबंधाच्याच शीर्षकाप्रमाणे आहे. डॉ. आठल्ये यांचे हार्दिक अभिनंदन !

**देवयानी नगरकर**

आमच्या महाविद्यालयातील देवयानी नगरकर या विद्यार्थिनीने ५ नोव्हेंबर रोजी झालेल्या रंगभूमी दिनी कल्याण-डोंबिवली महानगरपालिका व डोंबिवली कला ॲकेडमीच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या कार्यक्रमात 'गिधाडे' या विजय तेंडुलकर लिखित नाटकातील 'रमा' चा प्रवेश सादर केला. नाट्यतपस्वी श्री. बापू लिमये, नटवर्य राम मुंगी व भालचंद्र कोल्हटकर यांनी तिला मार्गदर्शन केले होते.

लहानपणापासून अभिनयाची आवड असणाऱ्या देवयानी ने भवन्स, आय्.एन्.टी., उन्मेष अशा दर्जेदार आंतर महाविद्यालयीन स्पर्धांमध्ये भाग घेतला होता. भांडुप येथे झालेल्या वंदेमातरम् या एकांकिकेतील उत्कृष्ट अभिनयाबद्दल पारितोषिकही तिला मिळाले होते. नटसम्राट मधील कावेरी, शांतता कोर्ट मधील बेणारे, एकच प्याला मधील सिंधू आदी व्यक्तिरेखांचे प्रवेश तिने एकपात्री प्रयोगांतून सादर केले. विज्ञान शाखेत शिकत असतानाही तिने जोपासलेली अभिनयकला हा विशेष उल्लेखनीय भाग आहे.

**कला मंडळ-उद्घाटन**

प्राध्यापकांचा संप, नंतर परीक्षा इ. कारणांमुळे आमच्या महाविद्यालयातील कलामंडळाचे लांबलेले




देवयानी नगरकर - नाट्य प्रवेश सादर करताना.

उद्घाटन २१ नोव्हेंबर रोजी थोरले बाजीराव पेशवे सभागृहात झाले. सभारंभास उद्घाटक म्हणून ठाणे वैभवचे संपादक श्री. मिलिंद बल्लाळ तर अध्यक्ष म्हणून प्राचार्य सी.जी. पाटील उपस्थित होते.

या प्रसंगी बोलताना श्री. बल्लाळ म्हणाले,' कला मंडळासारख्या उपक्रमात भाग घेतल्यामुळे कोणतेही न्यून न राहता व्यक्तिमत्त्वाची निकोप वाढ होते.' कला मंडळाच्या प्रमुख प्रा. सौ. सुधा फाटक यांनी प्रास्ताविक केले. यानंतर कार्यक्रमाची सूत्रे विद्यार्थ्यांनी संभाळली.

स्वागत समारंभ व सरस्वती पूजनानंतर बोलताना प्राचार्य सी.जी. पाटील यांनी विद्या प्रसारक मंडळ व महाविद्यालय करीत असलेल्या सर्वांगीण प्रगतीचा आढावा घेतला. या विद्यार्थ्यांतूनच एखादी लता मंगेशकर, एखादा सचिन तेंडुलकर निर्माण होण्याच्या शक्यता असतात त्या दृष्टीने अभ्यास तर असे हे उपक्रम महत्वपूर्ण असतात असेही त्यांनी सांगितले.

कार्यक्रमास विद्यार्थ्यांबरोबरच प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारीही मोठ्या संख्येने उपस्थित होते. पदवी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. सी.म. सारंग, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य मकरंद दीक्षित, पर्यवेक्षक आर्.टी. कुलकर्णी व प्रा. सौ. फाटक व्यासपीठावर उपस्थित




**कला मंडळाचे उद्घाटन : डावीकडून प्राचार्य सी.जी. पाटील, मिलिंद बल्लाळ व एक नृत्यक्षण.**

होते. उद्घाटनाच्या औपचारिक कार्यक्रमानंतर विद्यार्थ्यांनी गीत, नृत्य आदी मनोरंजनाचे कार्यक्रम सादर करून आपल्यातील कलागुणांची झलक दाखविली.

**जोशी बेडेकर महाविद्यालय**

जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या स्टाफ अॅकॅडमी तर्फे बी.ए.आर.सी.चे संचालक श्री. अनिल काकोडकर यांना व्याख्यानासाठी आमंत्रित करण्यात आले होते. प्राध्यापक व विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद कार्यक्रमास होता.

दिवाळीच्या सुटीनंतर नवरंगचे वेध लागलेले असले तरी परीक्षांनी वातावरण थोडे अभ्यासलेलेच होते. पुढील महिन्यात गणेश खराडेच्या काश्मीर सहलीसह नवरंगचे वृत्त अपेक्षित आहे.

**सौ. आनंदीबाई जोशी विद्यालय**

आमच्या या शाळेतील ७वीत शिकणाऱ्या अक्षय लोखंडेला गतवर्षी शाळेने सर्वोत्तम खेळाडू हा मानाचा किताब दिला होता. यंदा जिम्नॅस्टिक फेडरेशनने १४ वर्षांखालील विद्यार्थ्यांसाठी ठाण्याच्या राबोडीतील सरस्वती विद्यालयात आयोजित केलेल्या स्पर्धेत तो जिल्ह्यातून सर्वप्रथम आला. अंधेरी येथील शहाजीराजे क्रीडा संकुलात झालेल्या स्पर्धांत तो राज्य स्तरावर प्रथम आला व हैद्राबाद येथील सामन्यांसाठी राज्याच्या संघाचा नायक म्हणून त्याची निवड झाली. हैद्राबादच्या लालबहादूर स्टेडीयमवर झालेल्या स्पर्धांत राष्ट्रीय स्तरावर तो ९वा आला तर त्याचा संघ २० राज्यांतून ५व्या क्रमांकावर आला.



**अक्षय लोखंडे. जिम्नॅस्टिक्स्चे प्रात्यक्षिक**

अक्षय विजया मागे विजय संपादन करीत आहे. ऑक्टो. ९८ मध्ये १४ वर्षांखालील चँपियनशिपसाठीच्या राज्य शासनाने आयोजित केलेल्या स्पर्धेतही तो जिल्ह्यातून प्रथम आला. नाशिक विभागातूनही उत्तम संघनायक म्हणून अक्षयची निवड झाली. सुवर्णपदकाचा मानकरी ठरलेला अक्षय आमची उद्याची आशा आहे. ऑलिम्पिकमध्ये अक्षयने कामगिरी बजावून देशाचे व आमच्या संस्थेचे व शाळेचे नाव उज्ज्वल करावे या सदिच्छेसह त्याला 'दिशा' पूर्ण सदिच्छा !

एवढ्या लहान वयात अक्षयची जिम्नॅस्टिक्समधील ही प्रगती अवाक् करणारी आहे. ९ वर्षांचा असताना म्हणजे १९९४ मधे त्याने जिम्नॅस्टिक्सला सुरूवात केली. व दरम्यानच्या चार वर्षांत असंख्य स्पर्धांत असंख्य पुरस्कार मिळवले; प्रथम क्रमांक मिळवले. शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. कोल्हटकर मॅडम त्याच्या या यशाबद्दल त्याचे विशेष अभिनंदन करताना म्हणाल्या, ''अक्षय लोखंडे हा आमच्या छोट्या आणि मोठ्या विद्यार्थ्यांचा आदर्श आहे.''

•••

## विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

# थोरले बाजीराव पेशवे सभागृह

३०० आसने, आधुनिक दृक्श्राव्य यंत्रणा उपलब्ध,
प्रसन्न वातावरण, उपाहाराची व्यवस्था,
वहाने उभी करण्यासाठी प्रशस्थ जागा.

संपर्क

कार्यवाह,
विद्याप्रसारक मंडळ, ठाणे
दूरध्वनी : ५४२ ६२७०